आणखी इलाज—कठीण फोड बाहूवर किंवा अंडावर हो-तात. या बेमारीस तवक ह्मणतात. कुटकी अर्धाशेर, काळीं जिरें अर्धाशेर, अजवान खाण्याचे अर्धाशेर, सुहाचें बीं अर्धाशेर, बच पावशेर, वावाडिंग पावशेर, राई पावशेर, मिरच्या दोन तोळे,व सहा-मासे बईकमना,हीं सर्व औषधें घेऊन वस्त्रगाळ करावीं. प्रत्येक दि-वशीं सांगितल्याप्रमाणें रात्रीस दवा एकेक मूठ घेऊन तव्यांत घालून थोडें पाणी घालून शिजवावें. ह्मणजे सर्व औषधें नरम होतील. रात्रीं तसेंच ठेवून सकाळीं घोड्यास द्यावें. याप्रमाणें सात दिवस करावें. अनुभव आहे.

आणखी इलाज—रुईचे झाडावरचीं पिकलेलीं पानें दोन२ दुधांत गरम करून खाण्यास द्यावीं. बरें होईल. त्यावर दाणा देऊं नये. तीन दिवसपर्यंत पाणी एकवेळ दिवसांतून द्यावें.

दुसरा इलाज.—चित्रकमूळ अतपाव, भिलावे अतपाव, गूळ अतपाव,बारीक करून आवळ्या एवढया गोळ्या करून एकेक गोळी सकाळीं व संध्याकाळीं दाणा देण्याचे पूर्वीं घोडयास खाण्यास द्यावी. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—हाळद पावशेर, हिरडे पावशेर,व अस्कंद पांच टांक,हीं तिन्ही बारीक करून अच्छेर गुळांत एकत्र करून चवदा गो-ळ्या कराव्या, नंतर दोनप्रहरीं पाणी दिल्यावर खाण्यास द्यावें. सात दिवसांत बरें होईल. अनुभव आहे.

चौथा इलाज.—काळींजिरें, काळींमिरें, सुंठ, बडिशोप, कुटकी, व हिंग हे प्रत्येक पांच पांच टांक घेऊन रुईचे झाडाचीं पिकलीं पानें सर्व एकत्र करून रात्रीस छटाक द्यावें. अनुभव आहे.

पांचवा इलाज.—हळद तीन तोळे,काळींजिरें छटाक,व गजग्याचा (सागरगोट्याचा) मगज तीनतोळे,हें सर्व बारीक करून बकरीचे मुतांत सर्व रात्रभर भिजवावें. सकाळीं धत्तुराचीं पानें एक टांक दोन बकरीचे

काळजा जवळचें पित्त असतें तें सर्व संध्याकाळीं व सकाळीं द्यावें. पुष्कळ अनुभव आहे.

संख्या सोमल एक टांक, शिंगरूफ सहा मासे, गूळ सहा मासे, तेलीया सुहागी एक टांक,काथ दोन तोळे,व लसूण एक टांक,हीं सर्व बारीक करून गुळांत हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. एक टांक सुंठीचें पाणी करून पिण्यास द्यावें. नंतर लेप करावा.

पिंपळी छटाक, गेरू छटाक, पाण्यांत एकत्र करून लेप करावा. अनुभव आहे.

दुसरा प्रकार.—तबली ह्मणजे पोटावर तबल्यासारखा आवाज होतो. वायु पोटांत होऊन असें होतें. इलाज—

अजवान—खुरासनी पावशेर, काळीं मिरें चार पैसेभार, अंबेहळद दोन पैसेभार, व भिलावे दोन पैसेभार, मनुष्याचे मूत्रांत घालून जमीनींत सात दिवस गाडून ठेवावें. नंतर काढून सात दिवस घोड्यास एक वेळ द्यावें. अनुभव आहे.

इलाज २ रा.—दारू एक शेर, पिंपळी पावशेर, गंधानचा वेल पावशेर,व अजवान पावशेर, दारूंत घालून दोन तास झाल्यावर काढून बारीक करावें. बाजरीचे पिठांत चवदा गोळ्या कराव्या, व दर दिवशीं एक गोळी द्यावी. पाहिजे तर सकाळसंध्याकाळ मिळून दोन द्याव्या. अनुभव आहे.

दुसरें औषध.—गेरू अतपाव,व कडूभोपळ्याचें पाणी एकत्रकरून फोडावर चोळावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—दरम्यान सर्दी होते त्यावर. रुईचे झाडाच्या मुळ्यांवरची साल एक शेर, काळीं मिरें एक शेर, व आलें एक शेर, सर्व बारीक करून सागरगोट्या एवढाल्या गोळ्या कराव्या. संध्याकाळीं दाणा दिल्यावर एक गोळी द्यावी. पाणी एक वेळ गरम द्यावें.

तिसरा इलाज.—सफेद गुंजा एक तोळा, सोमलखार एक तोळा, शिंगरूफ एक तोळा, काथ छटाक, व बचनाग एक तोळा, निरनिराळे कुटून बारीक करून अल्याचे रसांत मिळवावें. गोळ्या हरभऱ्या एवढ्या कराव्या. सकाळीं दाण्याचे पूर्वीं एक गोळी द्यावी. चार दिवसपर्यंत. अनुभव आहे.

आणखी इलाज.—काळीं जिरें एक शेर कच्चीं, दाणा दिल्यावर रात्रीस घोड्यास खाण्यास द्यावीं. व सकाळीं पावशेर लाल मिरची बाजरीचे पिठांत द्यावी. ती दाणा देण्याचे पूर्वी द्यावी.

शिंगरूफ, फटकी, सुहागी भाजलेली, जंगला भाजलेली प्रत्येक एक पैसाभार. सर्व बारीक करून अल्याचे रसांत हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. सकाळीं एक व संध्याकाळीं एक दाणा दिल्यावर खाण्यास द्यावी. अनुभव आहे. सर्व गोळ्या एक शेरपर्यंत कराव्या.

जहरबंद—पोटाखालीं व अंडावर फोड येतात. गाई बैल वगैरे चार पायांचे जनावरांसही हा रोग होतो. हा फारच वाईट आहे. त्यावर औषध.

सुंठ पावशेर, इंद्रजव पावशेर, सुहागी पावशेर, बच पावशेर, गजग्याचा मगज पावशेर, पळसपापडी पावशेर, समुद्रफळ पावशेर, अजवान पावशेर, सुहाचें बीं पावशेर, काळीं जिरें पावशेर, गंधानचीं पानें व फुल व झाडें, राई पावशेर, वावडिंग पावशेर, हिंगणसाल पावशेर, मऊफळ छटाक, हिरडे मोठे पावशेर, पिंपळमूळ पावशेर, काळाबोळ पावशेर, रिंगणीचें झाड पावशेर, धतूर पिंवळा याची साल छटाक, अकलकारा तोळे दोन, लसूण एक, मठाचें पीठ भाजकें अर्धशेर, गुग्गुळ पावशेर, कोष्ठकोळिंजन पावशेर, इसगंध पावशेर, पिंपळी पावशेर, हिंग तोळे दोन, रूईचे झाडाची साल छटाक, कायफळ छटाक, अजमोदा छटाक, पोथी अळिता एकपाव, गूळ अर्धा शेर.

हें सर्व बारीक करून गुळांत पाणी घालून कालवावें. मग त्याचा पाक करून त्यांत सर्व औषधें घालून प्रत्येक गोळी छटाक करावी. सकाळीं एक गोळी दाण्याचे पूर्वी द्यावी. व दुसरी रात्रीस दाण्याचे पूर्वीं द्यावी. अनुभव आहे. या औषधानें बरें न झालें तर डाग सांगितल्याप्रमाणें द्यावा.

जहरबंद होऊन सर्दी झाली तर हळद अर्धा शेर, गूळ पुराणा अर्धाशेर, हिरा गुग्गुळ पावशेर, साबण पावशेर, अफू एक तोळा, सुहागी तेलीया छटाक भाजलेली, फटकी भाजलेली छटाक, गेरू पावशेर, व विड्याचीं पानें शंभर, हीं अफू पाण्यांत खलून मग सर्व वस्तु बारीक करून एकत्र कराव्या. अफूचे पाण्यांत लिंबा एवढ्या गोळ्या कराव्या. एक गोळी सकाळीं व एक गोळी संध्याकाळीं याप्रमाणें द्यावी. घोड्यास तहान लागते त्यावेळेस पाणी गरम करून द्यावें व गवत सुकलेलें द्यावें.

फोड फारच कठीण असल्यास हिंगणाचे झाडाचा कांटा आणून त्यांणीं फोडावा. नंतर मनुष्याची विष्ठा तीन दिवसपर्यंत दर्दास लावून लेप करावा.

दुसरा इलाज.—काळींजिरें पावशेर, गाईचे पित्तांत सर्व रात्रभर भिजत ठेवून दाण्याचे पूर्वी सकाळीं खाण्यास द्यावीं. दुसरे दिवशीं त्याचप्रमाणें द्यावें. तिसरे दिवशीं त्याचप्रमाणें द्यावें परंतु काळींजिरें सात दिवसपर्यंत भिजविलीं पाहिजेत. याप्रमाणें अंडावर फोड झाले तर बरे होत नाहींत. नरम झाले तर तंग बांधावा व कठीण असले तर डाग द्यावा.

घोड्याचे बेंबींत फोड होतात किंवा बेंबी वाढली तर फोड होतात त्यावर लेप.

जैतूनचें तेल गरम करून, जिरें, इसबंद, सळगमाचें तेल, व गेरू

त्यांत घालून सर्व कढवावें आणि बेंबीवर चोळावें. मनुष्याचें किंवा जनावराचें हाड तुटलें तर अरमनीचें फूल व मटाराचें पीठ, अंड्याची सफेदी, व चिंच, एकत्र करून पाण्यांत कढवून वर लेप करावा.

दुसरा इलाज.—सनोवर १ झाड, २ मच्छि, माजूफळ, गुलनार, गुलअरमनी, सर्व बराबर घेऊन पाण्यांत कढवून हाडावर चिकटवावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—फुलांचें तेल,पांढरें जिरें,अंड्याचें पिवळें बलक, व पांढरा काथ, हीं सर्व घेऊन बेंबीवर लेप करावा.

मूत्ररोग.

घोड्याचें मूत्र गुंतलें ह्मणजे साफ होत नाहीं. व मलशुद्धिही साफ होत नाहीं. त्यास उपचार—सुंठीची बारीक पूड करून ती पाण्यांत भिजवून त्याणें वात माखावी. ती वात घोड्याचे शिश्नांत अगर घोडीचे योनींत अगर गुदरद्वांत घालावी ह्मणजे मूत्र किंवा मलशुद्धि साफ होईल.

मिरपूड अगर चिंचेची पूड पाण्यांत कालवून चिरगुटाचा कांकडा करून त्यांत भिजवून तो कांकडा घोडीचे योनींत अगर घोड्याचे शिश्नांत घालावा. ह्मणजे मूत्र साफ होईल. व हाच काकडा गुदद्वारांत घातला असतां मळ साफ होईल.

वरचेवर मूत्र फार होतें व अगदीं कृश होतो त्यास उपाय.

कोथिंबिरीचें बीं (धने), वाळूक, कालिंगन(कलिंगड) व द्राक्षेयां तिहींच्या बिया,खजूर,आणि पित्तपापडा हे सर्व जिन्नस सहा टांक घेऊन चूर्ण करून मध पावशेर आणि दूध शेर ह्यांत मिसळून सात दिवस पाजावें.

घोड्यास मूत्रद्वारें रक्त पडतें त्यास उपचार—कोथिंबिरीचें बीं

(धने), कोलश्रीचें मूळ, साखर, व दूध हीं समभाग घेऊन एकत्र करून पोटांत तीन दिवस द्यावीं.

बारीक तांदुळांचें पीठ पांचशेर, आणि गाईचें दूध १ शेर हें एकत्र शिजवून सात दिवस द्यावें. किंवा पादेलोण, केळीचा कांदा, भुईकोहळे, तवकील हें एकेक टांक प्रमाणें घेऊन कुटून घोडें पाहून द्यावें.

मूत्ररोग झाला असतां अंगास सुस्ती येते, आणि बल धरीत नाहीं. त्यास औषध—हिरवीं वाळकें, भुई कोहळे, कोथिंबीर, मेथी, चारोळ्या, द्राक्षें, बेळा, व नाबद हीं सर्व औषधें समभाग घेऊन, चूर्ण करून गाईचें दुधांत सात दिवस द्यावें.

मूत्रभेद.

रक्त मुतत असेल तर.—पावडर क्याटीच्यू (कात) अर्धा औंस, फठकडी अर्धा औंस, क्यासग्योरिलियाचे सालीची पूड एकपासून दोन द्राम, काकबी, व लिमरिक पावडर एक गोळी बनण्यापुर्ती घेऊन ती गोळी दिवसांतून दोन वेळ द्यावी.

फारच मुतत असेल तर.—अफू अर्धी द्राम, जिंजर पावडर दोन द्राम, ओकबर्ग एक औंस, फटकी त्या मानानें लागेल तितकी, व क्याममाइल टी एक पाइन्ट (अर्धी बाटली) हीं सर्व मिळवून पाजावें.

घोडा रक्त मुततो त्यावर इलाज.

तांदूळ व दूध ००।. पावशेर, व काकडीचें बीं व खिरा सहा पैसे भार या सर्वांस एकत्र करावें. आणि घोड्यास तीन दिवसपर्यंत द्यावें. अनुभविक आहे.

दुसरा इलाज.—घोड्याचे तोंडांतून, नाकांतून, व गुदद्वारांतून व शिश्नांतून रक्त पडतें, छातींत कफ जमतो, उष्ण होतें, त्यामुळें रक्त पडतें आणि घोड्याचें सर्व शरीर विस्तावसारखें भाजतें ह्मणून तो

घांस दाणा खातनाहीं. जर रक्त तोंडांतून व गुदद्वारांतून आलें नाहीं व त्याचे नाकांतून व शिश्नांतूनच आलें तर त्यास उपाय.–

अगोदर घोड्याचे शरीरास तिळाचें तेल लावावें नंतर नदींत घेऊन जाऊन खूप चोळून चोळून धुवावें. घोडा बुडे इतके पाण्यांत त्यास धुण्यास न्यावें. मग त्याजवर थंड वस्तु नीळवडी वगैरे लावावी. धने व बडिशेप याचा अर्क त्यास चोळावा. नंतर पोटांत खाण्यास देणें. केळीं पावशेर, दूध पावशेर, खडिसाखर आणि तवकीर नऊ पैसेभार, यां सवांस बारीक करून एकत्र करावें. व दरदिवशीं अर्धा शेर मध उत्तम घेऊन त्यांत घालून घोड्यास सकाळीं तीन दिवसपर्यंत द्यावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज—घोडा रक्त मुततो त्यास. पित्तपापडा, व मिरच्या, प्रत्येक सहा सहा पैसेभार बारीक करून अर्धशेर मधांत एकत्र करून दररोज घोड्यास द्यावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—गरमीमुळें घोडा रक्त मुततो त्यावर—मेंदी, कितराचा गोंद, सुखलेले धने, अमला, पांढरें जिरें, व पांढरा काथ, सर्व दोन दोन पैसेभार घेऊन एकत्र करून पाण्यांत घालून एक रात्र ठेवावे. दुसरे दिवशीं सकाळीं पाण्यांतून दुसरे पाण्यांत घालावें. मग दोन प्रहर झाल्यावर घोड्यास द्यावें. याप्रमाणें तीन दिवस दर दिवशीं तीन वेळ घोड्यास द्यावें. त्याची सर्वगरमी जाऊन स्वच्छ होईल. अनुभव आहे.

दुसरी रीत.—वायु किंवा उष्णता घोड्यास होते. ह्मणून तो लाल मुततो किंवा पिंवळें किंवा एकेक थेंब मुततो, त्यास—अजमोदा व कोरफडीचें फूल हीं सहा सहा पैसेभार आणि खडिसाखर अर्धशेर, हीं सर्व एक वेळ घोड्यास द्यावीं. त्यांपैकीं अर्धशेर साखर प्रत्येक वेळेस निदान असलीच पाहिजे. सकाळीं घोड्यास हें

औषध देणें. अनुभव आहे. परंतु खडिसाखर बारीक करून त्यांत मध नऊ पैसेभार घालून घोड्यास तीन दिवसपर्यंत देणें.

इलाज दुसरा.—घोड्याचे पोटांतील रक्त नासतें, वायु आणि कफ होऊन घोडा सुस्त होतो, घांस किंवा दाणा कमी खातो, व पाणी हळु हळु पितो त्यास उपाय.—

नागरमोथें, नरकाचूर, काळाकुडा, अजवान (ओंवा) इंद्रजव, बच, अजमोदा, धने, तबाशीर, धावड्याचें फूल, सुपारीचें फूल, बाळबोळ, व चिंच, ह्यां सर्वांस बारीक करून सात दिवस द्यावें.

दुसरा इलाज.—रक्त बंद होत नाहीं त्याजवर. सोरा छटाक बारीक करून पावशेर खाण्याचें मीठ व अर्धशेर ज्वारीचें पीठ हे सर्व जिन्नस एकत्र करून पाणी देतें वेळेस त्यांत घालून सकाळीं एक वेळ प्रमाणें तीन दिवसपर्यंत द्यावें अनुभव आहे.

दुसरा उपाय.—घोड्याचें रक्त काळें होतें व मासा सारख्या गोळ्या होऊन तें बाहेर पडतें. कारण त्याचें काळीज व गुदद्वार यांस इजा होते, त्यामुळें रक्त नासतें त्यास उपाय.—

अवळकठी एकशेर थंड पाण्यांत रात्रभर ठेवून सकाळीं पांढरें जिरें अर्धशेर पाण्याबरोबर व तांदूळ एकशेर शिजवून आणि साखर पावशेर हीं सर्व एकत्र करून सकाळीं दर दिवशीं देणें.

दुसरा इलाज.—रक्त पडतें त्यास. बांबूचीं पानें, पांढरें जिरें, वाळा, व दहिंवर पडतें त्याचें पाणी हीं सर्व सात दिवस द्यावीं.

दुसरें औषध.—दोनशेर कडूलिंबाचें पाणी, नऊ पैसेभार तूप, मध चार शेर कच्चे, व नऊ पैसेभार साखर पांढरी, हीं सर्व एकत्रकरून त्याचे गुदद्वारांत घालावीं. व त्याचे शरीरावर पांढरा चंदन, किनार झाडाचे पानाच्या रसांत उगाळून त्याचे शरीरास लावावें. व घोड्यास खाण्यास साखर व चर्बी द्यावी.

घोडा रक्त मुततो त्यावर.-तांदूळ एकशेर शिजवून त्यांत चारशेर

अंबट दहीं घालून तीन दिवसपर्यंत घोड्यास सकाळीं द्यावें. अनुभव आहे.

लघवी होत नाहीं त्यास.

घोड्यास कांहीं दर्द असो अगर नसो लघवी होत नाहीं त्यास उपाय.—हिंगण झाडाचीं पानें अर्धाशेर घेऊन खाण्यास द्यावीं. ह्मणजे लघवी होईल. अनुभव आहे.

काळ्या धोत्र्याचें एक फूल आणून बिया काढून त्यांत सहा मासे हिंग घालावा. त्यावर कणीक लावून विस्तवांत शिजवावें. शिजल्यावर काढून थंड करून खाण्यास द्यावें. आणि दोन तास मालीस करावें.

पांढरे चित्रकमुळावरची साल बारिक करून घोड्याचे शरीरांत दोन्ही ठिकाणीं (गुदद्वार वा शिश्न यांत) घालावी. त्यामुळें त्याजला लघवी होईल.

दुसरा उपाय. अवळकठी आतपाव, वाईकमळ छटाक, खोडबच तोळा एक, अजवान खुरासनी चार तोळे, अजवान चार तोळे, लवंग जंगली तोळे दोन, काळाबोळा एक तोळा, काळाकुडा एक तोळा. गंधान एक तोळा, कोष्टकोलिंजन एक तोळा, मुरडफळी चार तोळे, वावडिंग दोन तोळे, काळें मिठ छटाक, कुटकी एक तोळा, लेंडीफळ चार तोळे, हिंग पंधरा मासे, गुग्गुळ पंधरा मासे, काळीमिरीं एक तोळा, अंबेहळद अतपाव, व आलें अतपाव, हीं सर्व बारीक करून गुळांत गोळ्या कराव्या, किंवा बाजरीचे पिठांत एक किंवा दोन आठवडे द्याव्या. अनुभव आहे.

घोडें खळूं लागलें ह्मणजे त्याची धातु पडूं लागली तर त्यास औषध.

काळेधोत्र्याच्या मुळीची साल, व अलमगीर अतपाव घेऊन त्यांत

मीठ ओंजळभर घालून द्यावें. अथवा केखंड दोन पैसेभार कुटून बाजरीचे पिठांत कालवून द्यावें.

कागदी लिंबाच्या बिया दोन टेंचूण पिठांत दळून दोन किंवा तीन दिवस दिलें ह्मणजे खळणें राहील.

पतंगाचे लांकडाचें चूर्ण वस्त्रगाळ करून दाणालाख८८८९,व साखर ८८८९, दोनशेर दुधांत १४ दिवस द्यावें.

घोडा माजला असेल आणि खळत नसेल तर त्यास थंड पाडावयास औषध.

(१)तुरटी,कापूर,सोरमीठ,आवळकटी,नीळ, धने, व जिरें, हें एकेकटांक घेऊन निरनिराळें कुटावें. ह्याचें वस्त्रगाळ चूर्ण करून, लिंबाचे रसांत कालवून, दगडाचे खलांत खलून गोळ्या ३ मासे वजनाच्या कराव्या. प्रातःकाळीं एक गोळी देत जावी. ३ दिवसांत गुण येईल. न येईल तर दोन्ही वेळ देत जावी. (२) मेंदाचीपाला एकशेरभर, पांढरे कांदे ९,व पांढरा काथ१तोळा, दररोज एकत्र कुटून देत जावें. असें सात दिवस करावें. गुण आल्यावर आणखी चौदा दिवस द्यावें. (३) तुरटी, मोरचूत, शेराचा चीक, सुरमा, व जोंधळ्याचें पीठ हीं १ टांकप्रमाणें घेऊन शेराच्या चिकांत खलावीं आणि गोळ्या कराव्या. शेराच्या चिकांत गोळ्या न झाल्या तर पाणी घालून कराव्या. १ मासा वजनाची गोळी करावी. सकाळीं एक गोळी देत जावी. गुण न आल्यास सकाळीं दोन गोळ्या द्याव्या. हें औषध फार कडक आहे ह्मणून प्रकृति पाहून द्यावें.

घोड्याचे लघवीविषयीं.

हे चार प्रकारचे रोग आहेत: बवाशीर,लिंगावर लाल फोड होतात ते, हाळक, व घोड्यास लघवी होत नाहीं.

बवाशीर ह्मणजे फोड कणकीप्रमाणें होतात. शरीरावर ह्मणजे लिंगावर, नवसागर, व कलई, जैतुनाचे तेलांत घालून लावावे. बरें होईल. फोड येतात त्यांना कंडू येते त्यावर शीर काढावी. लिंगावरचें रक्त पावशेर काढून थंड पाण्यानें धुवावें. तूप लावावें. लिंबाचीं पानें नऊ पैसेभार, व शेर खारका दोन्ही एकत्र करून एक आठवडाभर खाण्यास द्यावीं. अनुभव आहे.

दुसरा प्रकार—जख ह्मणजे लिंगावर मस होतात. त्यास एलवा ह्मणजे बोळ, बारीक करून गाईचे तोंडांतील लाळेंत मिळवून. त्यांत बदामाचें तेळ, निंमे गरम करून तीन किंवा पांच किंवा सात दिवसपर्यंत पिण्यास द्यावें.

घोडा दिवाणा होतो त्यावर जो उपचार करतात तो यावरही करावा.

तिसरा प्रकार—हाळक ह्मणजे लिंगावर काळें कातडें होतें. घोडीवर घोडा चढल्यावर चमडा जातो. शरीर लाल होतें. त्यावर चकंदरचा भाजी व बुराअरमणि या दोन्हीचें पाण्यांनीं धुवावें. नंतर धन्याचे पाण्यानें धुवावें. व शिरका व केशर लावावें.

दुसरा इलाज—शरीराचे(शिश्नाचे)तोंडांत गुलाबपाणी एक शेर सोडावें. त्यावर तिळाचें तेल, व लाळ फुलोंचे तेळ सोडावें. अनुभव आहे.

चौथा प्रकार—घोड्यास लघवी होत नाहीं; झाली तर थोडी थोडी होते. किंवा अजि होत नाहीं हे दोन प्रकार आहेत.

पोटांत दर्द होतो किंवा सर्दी होते किंवा माती खाण्यांत किंवा पारा पोटांत गेल्यानें किंवा लांकूड खाल्ल्यानें व संगरेजा पोटांत गेल्यानें होतो. त्यावर इलाज.

कांकडी बागायती किंवा जंगली, भवाई पठा, धने, मेथीचें बीं, चारोळी, अंगूर ह्मणजे द्राक्षें, इलाची मोठी, व माळकांगोणी हीं बरावर घेऊन गाईचे दुधांत एकत्र बारीक करावीं. चार

दिवसपर्यंत मोठे घोड्यास पावशेर व लहान घोड्यास छटाक याप्रमाणें सकाळीं द्यावें. अनुभव आहे.

घोड्याचें बहुमूत्र बंद होण्याविषयीं.

बरगमुळी व एक किंवा दोन भाजीच्या मुळ्याचीं पानें यांचा रस काढून त्यांत कांहीं पाणी घालावें. खडीसाखरेचा पाक करावा. मग दोन्हीं एकत्र करून घोड्यास पाजावें. मूत्र एका घडींत बंद होईल. घोडा मुतता बंद होत नाहीं त्यावर मुळ्याचीं पानेंच द्यावीं. घोड्याचे तोंडांत फोड होतात. काठी मोठी आणावी. त्या काठीला छेद करावें व ती काठी घोड्याचे तोंडांत घालावी, त्यांणीं फोड फोडावे. नंतर त्यावर इलाज.—

सरसु ह्मणजे शिरस, मिरच्या, व हळद हीं सर्व बरोबर घेऊन बारीक करून गाईचे दुधांत एकत्र करावीं. व तीं घोड्याचे तोंडांत घालून तोंड बांधावें. तें दोन तास ठेवावें. कोणी चार दिवसपर्यंतहि ठेवतात. अनुभव आहे.

घोड्याचें मूत खुलें होण्यास.

गाईचें तूप घोड्याचे शरीरावर चोळावें. गाईचें शेण एरंडाचे पानांत गरम करून चिराइताचें बीं, इलायची, गोखरू, रुईचे बीं, व पठा झाडाचें बीं, हे प्रत्येक जिन्नस सहा पैसेभारप्रमाणें घेऊन बारीक करून वस्त्रगाळ करावे. गुळाचे शिरक्यांत मिळवून घोड्यास खाण्यास द्यावें. किंवा दारू गुळाची यांत द्यावें. व त्यावर एक शेर गुळाची दारू द्यावी. दारू न मिळेल तर मठ्ठा दोन शेर द्यावा. अनुभव आहे.

दुसरा इलाज—पिसात्र बंद होतो त्यावर—पिंपळी, पिंपळमूळ, काळीं मिरें, व दारू बंदुकीची हें सर्व बारीक करून त्याचे शरीरांत घालावें.

निफ्रायटिज.

हा रोग शिस्नांत गरम सूज आल्यानें होतो. ह्याचे आक्यूट (भयंकर) आणि क्रानिक (हलका) असें दोन भेद आहेत.

कारण.—कमरेवर मार लागल्यानें, दाणा चारल्यानें, मूत्र आणणारीं औषधें दिल्यानें किंवा लावल्यापासून हा रोग होतो.

लक्षण.—कंबर कडक कमानी सारखी होते, दावली असतां स्वस्थ राहतो, मूत्र थोडेंथोडेंच विटकरीच्या रंगासारखें खराब करतो, किंवा रक्तासारखेंही मूत्र होतें, मूत्र होण्याची तजवीज करतो, ओरडतो व ताप फार येतो.

इलाज.—शिरांचें रक्त काढावें, जुलाब द्यावे, गरम पाण्याची पिचकारी मारावी, मेंढ्याचें कातडें कमरेवर लावावें, टारटर इम्याटिक आइन्टमेन्ट लावावें, किंवा राईचें प्लस्तर मारावें, लिनसिड चहा द्यावा, किंवा पाण्यांत गोंद मिश्रण करून द्यावा.

अखेर.—घोडा बरा होतो, किंवा क्रानिकनें हलका होतो, किंवा आंत पू होऊन सूज फार येते, किंवा पूं वाहूं लागतो, शिश्न सडून जातें, दोन्हीही रोग झाल्यास घोडा मरतो.

क्रानिक.

लक्षण.—हा रोग कशापासून होतो हें खास समजत नाहीं. परंतु एखादे वेळेस कालिक (तिडिक) फार होते, मूत्र थोडें किंवा रक्तानें मिश्रित असें होतें, कंबर कडक राहते, परंतु काम घेतल्यानें कंबर बरी होते.

इलाज.—टारटर इम्याटिक आइन्टमेंन्ट लावावें, पिचकारी मारावी, लिनसिड चहा द्यावा, जर चांगला झाला नाहीं तर शिश्न सुजून जातें व सडतें, किंवा दगडासारखें कठीण होतें. राळ तोळा एक, व पांढरें जिरें तोळा एक, उंबराचे चिकांत गोळी करून द्यावी.

ठाणामध्यें मोकळा ठेवावा. विलायची, सफेतजिरे, व काथ, हें सर्व चारचार भाग घेऊन गोळी करून द्यावी, किंवा कमरेवर सोन्याचा लेप करावा.

ब्लयाडर.

हा रोग शिस्न फाटल्यानें किंवा फुगल्यानें होतो. लक्षण—रेकटसमध्यें (गुदद्वारांत) हात घालून पाहिल्यास ब्लयाडर सुजलेला दिसेल. जर फाटलेला असला तर ब्लयाडरची सूज कमी होते, घामास मुत्रासारखी वाईट घाण येईल.

इलाज.—घोड्यास फिरवते वेळेस ब्लयाडर खाली करून पाडावा. दुसरा उपाय चालत नाहीं.

अलब्यूमन (खर).

हा रोग मागील कांहीं रोगांमुळें मूत्रद्वारें वाहतो. हा रोग झाल्यामुळें फायबर्स एका ठिकाणीं जुळण्यास हरकत होते, कारण त्यांचीं सर्व तोंडें अलब्यूमन आणि फायब्रन (धागे) ह्यांच्या योगानें झालीं आहेत. अलब्यूमन हें बहुतकरून अंड्याच्या सफेदीसारखें असून तें डोळ्याच्या पहिल्या पडद्यांत आणि ड्रापसीमध्यें असतें. ज्या वेळेस खर पडूं लागल्यानें घोडा दुबळा होतो, किंवा ज्या वेळेस कांहीं अजार नसतांना घोडा दुबळा होतो त्या वेळेस घोड्याचें मूत्र घेऊन, क्यारोसिव्ह सबलीमेन्ट लोशन तयार करून त्यांत मूत्र घालावें. ह्याप्रमाणें तीन वेळ केल्यास मूत्र एका ठिकाणीं जमून जातें, किंवा नायट्रिक आसिडमध्यें मूत्र घातलें असतां त्याचा रंग पिंवळा होतो. किंवा खर पडते असें माहित पडल्यास, नायट्रो म्यूऱ्याटिक आसिड एक ड्राम आणि पाणी एक शेर, ह्यांचें मिश्रण करून सकाळीं व संध्याकाळीं द्यावें; घोडा बरा होईल. किंवा अकल-

कारा, पठाणी मीठ, बायकुंबा, व सफेद मुसळी, गुळांत मिश्रण करून गोळी करून द्यावी.

एखादे वेळेस शिश्न फाटून जातें त्यास थोडें शिश्न फाटलें असल्यास मूत्र थोडें होतें किंवा सर्वच फाटलें असल्यास चारी पाय एका ठिकाणीं जुळतो आणि कंबर कमानी सारखी होते, व मूत्र होत नाहीं.

कारण.—पुष्कळ दिवस मूत्र न झाल्यामुळें होतो.

इलाज.—यावर इलाज चालत नाहीं.

हेमोठोरिया.

हा रोग मूत्रद्वारें रक्त आल्यानें होतो. हा तीन ठिकाणीं होतोः एक शिश्नास, एक गुदद्वारास, आणि एक मूत्र होणारे नळीस. हा रोग लवकर बरा होत नाहीं.

लक्षण.—शिश्नांत रक्त येतें.

इलाज.—कंपाउन्ड टिंकचर ऑफ सिन्यामन (दालचिनीचा अर्क) तीन औंस, डायल्यूट सलफ्यूरिक आसिड पांच औंस, व पाणी एक बाटली, या सर्वांचें मिश्रण करून दिवसांतून तीन वेळ एकेक औंस द्यावा. राजन व कात हीं द्यावींत, आणि फुटाण्याचीं टरफलें, राळ, व भाजलेली फटकी, असें मिश्रण करून द्यावें.

क्यालक्युलाय.

हा रोग शिश्नांत दगडासारखी वस्तु बनल्यानें होतो. हा चार ठिकाणीं होतोः शिश्नास, युरेटर (नळीस), ब्ल्याडर (गुद), आणि युरिथ्रा (मूत्र होणारी नळी). लक्षण.—पहिलीचें काम करतांना तिडकीसारखी इजा होते, मूत्र झाल्यावर दर्द बंद रहातें, व मूत्र होतांना बारीक बारीक दगडासारखी वस्तू निघते.

इलाज.—लिनसिड चहाचे आंत ओपियम एक ड्राम मिश्रण करून द्यावें, पुन्हा नायट्रो म्युऱ्याटिक आसिड दोन ड्रामप्रमाणें दिवसांतून तीन वेळ पाण्यांत बरा होईपर्यंत द्यावें.

दुसऱ्याचें लक्षण.—मूत्र होतें, किंवा बिलकुल होत नाहीं, रेक्टममध्यें हात घालून पाहिल्यास समजेल.

इलाज.—ओपियम एक ड्राम पाण्यांत दोन दोन घटकेनें देत जावी, किंवा अर्धे अर्धे घटकेनें ऊन पाण्याची पिचकारी रेकटममध्यें मारावी, नंतर हात घालून ब्ल्याडरचे आंत दगड असतो तो काढावा.

तिसऱ्याचें लक्षण.—मूत्र करितां करितां एकदम बंद होतें.

इलाज—नाहीं.

चवथें लक्षण.—शेपटी उचलून पाहिल्यास दगडासारखी वस्तू नजरेस येईल.

इलाज.—कापून काढावी. मेथी, सपाल, लाहोरी मीठ, नवसागर, चुन्याची कळी, कुसतासाक, तोतिया, तखटाचें बीज चार रुपयेभार सर्वांस कुटून गोळी करून रोज एक गोळी द्यावी. किंवा नवसागर, बचनाग, अफू व हिंग, दारूंत मिश्रण करून घोटून गोळी करून द्यावी.

वृषणरोग.

वृषण सुजतात, निबर होतात आणि चेपलें असतां दुखतात त्यास उपचार—सज्जीखार, जवखार, सुंठ, पिंपळी, सैंधव, व रायहाळद, हीं सर्व प्रत्येकीं ३ टांक आणि सोमल १ टांक हें घेऊन चूर्ण करून तेलांत कालवून त्याचा वृषणावर लेप करावा. मग चिंचेचा पाला मीठ घालून ठेंचून त्याची पोतांडी करून त्यांनीं वृषण शेकावें. असें तीन दिवस करावें. मग कंकोळ, नागकेशर, व गूळ हें प्रत्येक पावशेर घेऊन एकत्र करून चूर्ण करावें. आणि ३ दिवस पोटांत द्यावें.

घोड्यास अंडरोग होतात त्यामुळें दाणापाणी टाकून कृश होतो

त्यास औषध-(१) प्रथम ३ दिवस मोहऱ्या अर्धाशेर, व बाजरी अर्धा शेर याचे वेगळाले तीन भाग करावे. त्यांतील निमे भाजावे व मिमे कच्चे ठेवावे. ते दळून त्याची भाकर करून प्रातःकाळीं चारावी. (२) गुग्गूळ १ तोळा, आणि गूळ पावशेर एकत्र करून चारावें. (३) कणीक पावशेर, गूळ अच्छेर,आंबेहाळद व हाळद, एकेक तोळा, मैदालकडी, सेंधेलोण, हीं दोन प्रत्येक दोन तोळे कुटून म्हशीच्या मुतांत भिजवून पुरचुंडी करून शेकावें. पुन्हा त्याचा लेप अंडास करावा. हा लेप तीन दिवस ठेवून चौथे दिवशीं ऊन पाण्यानें धुवावा.

घोड्यास वृषणरोग होतो त्याचें लक्षण—वृषण दोन्ही थोर होऊन लोंबतात, सुजेसारखे दिसतात परंतु सूज नव्हे. त्यास औषध. तेल ००।, व तूप ००।. याचा लेप वृषणास करावा. व वरती मिठाचे पोटलीनें शेकावें. निर्गुडीचा रस ०००९, तरवडाचा रस ०००९, वांबीचा रस ०००९, गव्हाचें पीठ ००।., हाळद ३ टांक, एकत्र करून शिजवून चार दिवस वृषणास लेप करावा. पोटांत देण्याचें औषध—शेपा, चित्रकमुळाची साल, सुंठ, सज्जीखार, टांकणखार, जवखार, सेंधेलोण, सांबरलोण, डांगर, काळेलोण, पापडखार, माईखार, सोलेला लसूण व गजग्याचें बीं,हें सर्व नऊ टांक व सिंगरूफ ४टांक, एकत्र करून आल्याचे रसांत सुपारी एवढ्या गोळ्या कराव्या. एक सकाळीं व एक संध्याकाळीं याप्रमाणें एकवीस दिवस द्याव्या.

वृषणाचा दुसरा प्रकार.—ओव्याची राख ००॥, गजग्यांचें बीं ००॥, चित्रकमुळाची साल पावशेर, लसूण अर्धाशेर, सुंबळखार ४ टांक, पत्रेहरताळ ४ टांक, आणि सिंगरूफ ४टांक व सोमलाची राख एकत्र करून आल्याचे रसांत रिठ्याच्या बीयेवढी गोळी करून निर्गुडीचे पाल्यांत सकाळीं व संध्याकाळीं दाणा खाल्ल्यावर एक याप्रमाणें एकवीस दिवस औषध द्यावी. सदरील सोमल घालण्याविषयीं लिहिलें आहे तो सोमल जाळण्याचा प्रकार—सोमलाचा खडा खा-

परामध्यें ठेवून त्याजवर सज्जीखार ८८|. पावशेर चूर्ण करून त्यांत घालावा. आणि खापरावर झांकण ठेवावें. खापराखालीं दोन प्रहरपर्यंत दिपाग्नि लावावा. ह्मणजे सोमलाची राख होईल. हरताळ घालण्याविषयीं लिहिलें आहे ती पत्रेहरताळ जाळण्याची कृति—गव्हाचें पीठ व उडदाचें पीठ हें दोन दोन मुठी घेऊन तिंबून हरताळ तबकामध्यें घालून वीस किंवा तीस गोळ्या होतील त्या लोटक्यांत घालून त्यावर दोन किंवा चार मातकापड करावें. मग थाळीमध्यें घालून जाळावें. ह्मणजे गोवऱ्या थाळींत घालून त्यांत जाळावें. लोटकें लाल झालें ह्मणजे काढून लोटक्यांतील राख निघेल तेव्हां हरताळभस्म समजावें.

अंडावर बेमारी होते खास.

अंडावर फोड होतात. अंडाचे आंत सरद गरमी होते. त्यामुळें फोड होतात. दोन्ही पायांचे रसीच्या शिरा काढाव्या. रक्त पाहिजे तितकें काढावें. त्यावर लेपः ज्वारीचे पिठाचा खमीर करून कासनींचें पाणी घालावें. व पाण्याचा तवंग एकत्र करून लेप करावा, शिरा काढल्या त्यावर.—

गांडूळ बाटलींत किंवा गाडग्यांत पंधरा दिवस ठेवावें, सुकल्यावर बारीक करावें. अंडावर फोड होतील त्यावर कांहीं दिवस चोळावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.–सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, जवखार, हे सर्व जिन्नस सहा सहा पैसेभार घेऊन बारीक करावे. मग वस्त्रगाळ करून एक शेर पिण्याचे दारूंत एकत्र करावे. दिवसांतून तीन चार वेळ खाण्यास द्यावे. दारू न मिळेल तर मधांत घालावे. पांच दिवस एरंडीचें तेल किंवा तिळाचें तेल किंवा भुईमुगाचें तेल अन्डावर लावावें व गाईचें शेण, अंजिराचीं पानें, गरम करून अंडावर बांधावीं.

तिसरा इलाज.-पिंपळमूळ, पिंपळी, पिंपळ्याजवखार, चवक, शेतरज, चित्रक, व सुंठ, प्रत्येक पांच पांच टांक घेऊन बारीक वस्त्रगाळ करावें. दोन शेर मुगांत शिजवावें. सर्व औषधें, त्यांत घालून सकाळीं घोड्यास खाण्यास द्यावें. एक दिवसांत दोन वेळ द्यावें. कडबा किंवा सुकें गवत, वैरण किंवा हरभरे हे खाण्यास द्यावे.

अंडावर मोठे फोड होतात त्यावर.

ऊद, अफू, चिरंजी(चारोळ्या), व खजुराचें बीं, ह्या सर्वांस बारीक करून कोंबडीचे अंड्याचे सफेदींत घालावें. त्याचा लेप अंडावर करावा. त्यावर अंजिराचीं पानें बांधावीं. अनुभव आहे.

दुसरा इलाज.-दोन्हीं पायांच्या शिरा काढाव्या. वाइट रक्त गेल्यावर जमालगोटा ह्मणजे जेपाळ एक, दगडी मीठ छटाक, चमेलीचे तेलांत एकत्र करून पाणी घालून कढवून अंडावर लावावें आणि शेक द्यावा. कांहीं दिवसांत बरें होईल. अनुभव आहे.

पोटाखालीं व अंडावर फोड होतात त्यास.

तेलीया सुहागी एक पैसाभार, भाजलेली फटकी दोन पैसेभार, कुटकी दोन पैसेभार, काळीं मिरें पांच पैसेभार, गूळ पुराणा तीन वर्षांचा चार पैसेभार, हे सर्व बारीक करून गोळ्या कराव्या. एक गोळी देऊन पाणी पाजावें. नंतर दाणा द्यावा.

दुसरा इलाज.-रुईचें बीं एक पैसाभार भाजलेलें, तंबाखू एक तोळा, सुंठ एक तोळा, तिन्ही बारीक करून कांहीं पाणी घालावें. व शिजवावें आणि अंडावर तीन दिवस लावावें. फोड बसतील.

पिसाब व लीद बंद होते व पोट दुखतें त्यास.

शेपूट मारतो, पाय उचलत नाहीं, बेहोश होतो, चाबूक मारला

तरी होश (शुद्धीवर) नसतो, जीभ काळी पडते, तोंड सुकतें त्यावर इलाज नाहीं. परंतु पिंपळमूळ, सुंठ, व काजळ प्रत्येक तीन पैसेभार घेऊन गोमूत्रांत मिळवावें. त्या औषधांत बत्ती (वात) बुडवून शरीरांत ह्मणजे लीद व मूत्र या जागीं घालावी.

दुसरा इलाज.—दगडी मीठ, पिंपळमूळ, नागरमोथे, व शिरस,प्रत्येक पांच पांच पैसेभार घेऊन बारीक वस्त्रगाळ करून एक शेर कच्चा शिरका अर्धशेर तिळाचे तेलांत एकत्र करून खाण्यास द्यावें.

तिसरा इलाज.—रुईचीं पानें पांच, छिद्रासाल, जवखार, हिंग, चिंच, पिंपळमूळ, सुंठ हे सर्व चार चार टांक घेऊन, गुळाचे दोन शेर दारूंत द्यावें. जर दारू न मिळेल तर दुसरे कशांत देऊं नये. पिसाब बंद न होतां चालू झाला तर एक शेर तिळाचें तेल, दोन शेर मध, व नऊ टांक पिंपळमूळ, एकत्र करून घोड्यास,खाण्यास द्यावें. छाती जवळचे व मांडीजवळचे शिरांचें रक्त काढावें.

चौथा इलाज.—मोहाचे झाडाची साल बारीक करून त्यांत नर-मूत्र घालून शिजवावें. त्याचा अर्क घेऊन नळीनें घोड्यास पाजावें. मोहाची साल न मिळेल तर खेचर जनावराची उरलेली वैरण आणून भांड्यांत घालून शिजवावें. तें पाणी घोड्यास नळीनें पाजावें. हेंही न मिळेल तर संभाळूचीं पानें, व तिळाचें तेल नरमूत्र घालून खा-ण्यास द्यावें.

पांचवा इलाज.—कुटकी दोन टांक, काळीं जिरें दोन टांक, काय-फळ दोन टांक, पिंपळी दोन टांक, खोडबच दोन टांक, राई दोन टांक,वावडिंग दोन टांक,काळींमिरीं दोन टांक,हळद दोन टांक, अंबे-हळद दोन टांक, आणि बकरीचें पित्त वीस किंवा चवदा, सर्व बारीक करून वस्त्रगाळ करावें. व गाईचे पित्तात मिळवावें. सुक-ल्यावर दोन पैसेभार प्रमाणें सकाळीं सात दिवस द्यावें. अनुभव आहे.

एक अंड चढतो व एक खालीं होतो, वर चढलेला उतरत नाहीं त्यास उपाय.

हा आजार घोड्यास कफ होतो व रक्त नासतें तेणेंकरून होतो. किंवा एक पाय लंगडतो.जिकडे अंड चढतो तिकडे अंडावर रग असते. त्याचें रक्त काढावें. त्यावर तूप लावावें. नंतर गाईचें शेण, नरमूत्र, आणि मीठ एकत्र करून शिजवावें. नंतर अंडाचे खालीं एक तासपर्यंत लावावें., नंतर घोड्यास कुळथी व कण्हेराची साल पावशेर प्रमाणें दोन्ही घेऊन तिळाचें तेल पावशेर मिळवून पाणी घालून शिजवावें. पाणी एक शेर राहिल्यावर जिन्नस काढून घेऊन पाणी पिण्यास द्यावें.

गरमीमुळें घोड्यास लाल फोड होतात त्यास.

तूप लावावें, खिरणीचे झाडाची साल किंवा बेलाची साल किंवा बेरीची साल, पाणी घालून नरम करावी आणि ती अंडावर लावावी.

दुसरा प्रकार—फोड चिरून आंतील मळ काढावा. व वर सांगितल्यापैकीं, एकादें औषध लावावें.

त्वग्रोग—खरूज.

तुमल म्हणजे (फोड)—हे फोड सर्व घोड्यांचे शरीरावर मोठे किंवा लहान होतात, त्यांतून लसही निघते. हातांनीं नरम करावे. व ऊन पाण्यानें धुवावे, त्यावर चरबी चोळावी.

खरूज होऊन काळे डोळे होतात. घोड्याजवळ कोणीं गेलें असतां, तो ओरडतो. केंस झडून जातात, कातडी काळी होते व सुकते, टाळूवरून हात फिरवला असतां केंस झडतात. त्यावर उपचार.—

रक्त काढावें, तें रक्त मानेवरचें सुमारें दोन तीन रत्तल काढावें,

जरफाचें बीं, व बारतंगीचें बीं, बारीक कुटून पाण्यांत मिश्रण करून पाजावें. व हुरमोजी खाण्यास द्यावी.

कडू इंद्रावण बारीक करून, गाईचे दुधांत मिळवावें. व बदामाचें तेल घालून थोडें गरम करून दररोज घोड्यास पाजावें. हा उपचार तीन किंवा पांच किंवा सात दिवसपर्यंत करावा.

सफरा ह्मणजे (सर्व शरीर पिंवळें होतें), डोक्यावर फोड उठतात, त्यांतून पिंवळे पाणी निघतें. शरीरावरचे व कपाळावरचे केंस पडूं लागतात, याप्रमाणें झालें असतां सफरा झाला असें समजावें. त्याजवर उपचार—

मानेच्या शिरांचे दोन बाजूंचें रक्त काढावें. तें रक्त दोन किंवा तीन रत्तलपर्यंत काढावें.

खरजेचा एक प्रकार आहे, त्याजला पित्ती ह्मणतात. तो प्रकार सर्व शरीरावर एकाएकी होतो, आणि एका तासांत दृष्टीस फोड पडतात. त्या फोडामध्यें थोडी लाली असोन त्या फोडांतून पाणीं वाहतें. त्याजवर उपचार.—

रक्त काढावें. ह्मणजे शिरा खुल्या कराव्या त्या अशा कीं, मानेजवळच्या शिरा तोडून त्यांतून दोन किंवा तीन रत्तल रक्त काढावें. आणि लाल चादरीनें घोड्याचें सर्व अंग झाकावें. हा रोग होण्याचें कारण असें आहे कीं, घोड्याचे अंगांत गरमी होते त्यापासून हा रोग होतो, आणि सदरप्रमाणें रक्त काढल्यावर हिदवानाचें बीज, खिरपाचें बीज, खिऱ्याचें बीज. सदहू बिजें वाटून अथवा दुसरे प्रकारें खाण्यास द्यावीं. अथवा रेवाचिनी पाण्यांत वाटून पाजावी.

पावशेर मिरच्या, पावशेर तूप, मिरच्या वाटून फार बारीक करून तुपांत मिळवून पाजावें.

काळीज सुकलें तर खरूज होते, ती मानेवर आयाळीचे जागीं, कपाळावर शेंडीचे ठिकाणीं, व शेपूट इतक्या ठिकाणीं तांदुळाचा

कोंडा जसा असतो त्याप्रमाणें भुसा उत्पन्न होतो. त्याप्रमाणें घोड्याचे त्वचेवर ह्मणजे अंगावरही भुसा निघतो. नाकांतून दुर्गंधींचें पाणी निघतें, दांत व ओंठ सुस्त होतात (महिरतात). घोड्याचें सर्व शरीर वाळतें केंस पडल्याप्रमाणें होतात, हीं चिन्हें होऊन जी खरूज होते ती फार करून अंगास गरमी झाली तर होते. त्याजवर उपचार-मानेजवळच्या शिरांचें रक्त काढावें, तें रक्त दोन किंवा तीन रत्तल काढावें. जवसाचें (सातूचें) पीठ त्यांत जैतूनचें तेल मिळवून अंगास चोळावें व तीन दिवस तसेंच राहूं द्यावें. चौथे दिवशीं घोड्यास पाण्यानें धुऊन खराऱ्यानें चांगलें घांसावें. चांगलें अंग कोरडें झाल्यावर जैतूनचें तेल देऊन त्याचे वजनाबरोबर तितका वजनभार गुग्गुळ घेऊन त्यांत मिळवून घोड्याचे अंगास चोळावें, ख्यारदस्ती, बुराआरमणी, सारखे घेऊन द्राक्षांचे दारूंत पाजावें.

उंटाचें दूध, तिळाचें तेल, जैतूनचें तेल, राई, काळें मीठ, येणेंप्रमाणें पाण्यांत कढवावें व जेथें खरूज झाली असेल तेथें लावावें. व तीन दिवसांनंतर धुऊन टाकावें.

दहापंधरा भिलावे घेऊन बारीक कुटून गाईचे एक शेर दुधांत कढवावे. अछेर दूध राहिलें ह्मणजे भिलावे व तें दूध तीन दिवस अंगास लावावें. नंतर धुऊन घोडा छायेंत बांधावा.

अच्छेर तांदूळ, व निंबाचीं पानें अछेर बारीक करून शिजवावें. आणि एके ठिकाणीं करून घोड्यास खाण्यास द्यावें.

अगनबंद (भिलावे) याचें तेळ खरूज झाली असेल तेथें लावावें. दहीं लावावें. नंतर थंड पाण्यानें धुवावें.

खरजोहराचीं पानें घेऊन जैतूनचे तेलांत मिळवावीं आणि तें तेळ अंगास लावावें.

बावचीचीं पानें अछेर घेऊन बारीक करून तेलांत मिळवून अं-

गास लावावें. दोन घंटा चोळावें, उन्हांत बांधावें, दुसरे दिवशीं थंड पाण्यानें धुवावें. याप्रमाणें तीन दिवस करावें.

सरसाचें तेल, करंज्याचें तेल, आवळ्या गंधक, हे तिन्ही एके ठिकाणीं करून जेथें खरूज झाली असेल तेथें दगडांनीं घांसावें. लाल झाल्यावर तेथें औषध लावावें, चिंचेचीं पानें, सेंभाळूचीं पानें, एके ठिकाणीं करून कुटावें. आणि दिवसांतून चार वेळ चोळावें.

चोपचिनी व पळसाचें लांकूड, चिंचेची साल, व अघाडा घेऊन जाळून चुन्याचे कळींत मिळवून अंगास ३ दिवसपर्यंत लावावें. नंतर घोड्यास थंड पाण्यानें धुवावें.

घोड्याचे पायास गजकर्ण होतें. मनुष्याप्रमाणें टाकळीचें बीं, तिळाचें फूल, मीठ खाण्याचें, हळद, इंद्रायणीचें बीं, कोपलचें झाड, आकड्याचें ह्मणजे रुईचें बीं, व बावची, एकंदर घेऊन कुटून बारीक करून दह्यांत मिळवावें. आणि जेथें गजकर्ण झालें असेल तेथें लावावें. सात दिवस गजकर्ण, खरूज, गर तिन्हीवर लावावें.

गजकर्ण व खरूज याजवर--काळें जिरें ६ सहा मासे, काळें मिरें ६ सहा मासे, निळातोता ६ मासे, व सेंदूर ६ मासे, निरनिराळें कुटून नऊ टांक तुपांत कढवून नंतर निळातोता व सेंदूर यांची पूड घालावी. व काचेच्या कुंड्यांत सर्व औषध खलावें. तें मलम गजकर्ण व खरूज यांवर लावावें. व गरेचा रोग होतो त्यावरही लावावें ह्मणजे बरें होईल.

मनशिळ १ एक तोळा, व तिळाचें तेल १ एक शेर घेऊन त्यांत मिळवावें. सदर्हू मलम जेथें दरद झाली असेल तेथें लावावें आणि घोडा उन्हांत बांधावा, तीन दिवसपावेतों असें करावें. पुढें ऊन पाण्यानें धुवावें.

अंजिराचे झाडाचीं पानें, ताकांत वाटावीं. बारीक करून अंगास लावून उन्हांत बांधावें. तीन दिवसपर्यंत असें करावें नंतर थंड पाण्यानें धुऊन टाकावें.

फटकी अतपाव, हुरमोजी अतपाव, मनसिळ छटाक, लिंबाचा रस अच्छेर, मीठ खाण्याचें छटाक, लाल मिरच्या छटाक, हीं सर्व लिंबाचे रसांत मिळवून खरूज असेल तेथें लावावें. दोन प्रहरानंतर धुवावें, उन्हांत बांधावें. धुण्याचे वेळेस साबूण लावून धुवावें. अनुभव आहे.

चित्रक ८ टांक, फिल्फिल् गर्द ८ टांक, अंबेहळद ८ टांक, सज्जीखार अर्धा शेर, अकडयाचें ह्मणजे रुईचें लांकूड १ टांक, सराचें बीं एक शेर, बांवच्या एक शेर, व गंधक अर्धा शेर, हें बारीक करून नरमूत्रांत भिजवावें, व तसेंच साऱ्या रात्र भिजूं द्यावें. दुसरे दिवशीं तेलांत कढवावें व अंग खराऱ्यानें साफ करून त्यावर लावावें. तीन दिवसपर्यंत असें करावें.

अयाळेंत खरूज होते त्यावर उपचार—रक्त वाईट झालें तर किंवा उष्ण झालें तर रक्त काढावें. शेपटी जवळचे हडीजवळ रक्त चार रति काढावें. सकाळीं दररोज १ शेर खजूर खाण्यास द्यावा. पावशेर लिंबाचीं पानें खाण्यास द्यावीं.

दुसरा उपचार—तिळाचें तेल १ शेर, भिलावे, मीठ खाण्याचें पावशेर, व हळद थोडी, चाऱ्ही एक ठिकाणीं करून कढवावीं. व रस अंगास लावावा. उन्हांत बांधावा, निंबाचे गरम पाण्यानें धुवावें.

पारा एक टांक, गंधक एक टांक, मनशीळ एक टांक, हाळद एक टांक, सेंदूर एक टांक, पांढरें जिरें एक टांक, पिंपळमूळ एक टांक, व कलोंजी एक टांक, हीं बारीक करून पारा, गंधक प्रथम मिळवावे नंतर सर्व एके ठिकाणीं करावें, आणि अंगास लावावें, घोड्यास उन्हांत बांधावें, असें दोन तीन दिवस करावें, मग गरम पाण्यानें धुवावें.

राई चारशेर, साबू चारशेर, खाण्याचें मीठ नऊ टांक, हाळद चारशेर, लिंबाचा रस, आणि नरमूत्र, हीं औषधें खरारा करून रक्त काढावें

आणि नंतर तीन दिवस पर्यंत लावावीं, घोड्यास उन्हांत बांधावें. व तीन तासानंतर गरम पाण्यानें धुवावें.

मानेच्या डावे शिरेचें रक्त काढावें. बोळ दारूंत मिळवून लावावा, अगर अगीनबंद (भिलाव्याचें तेल) पारा दोन तोळे, तूप अर्धाशेर, एकत्र करावें आणि लावावें. कांहीं दिवसांत बरें होईल. मग थंड पाण्यानें धुवावें. काळें मिरें तीन मुठी, व कळीचा चुना दोन मुठी, तंबाखूच्या पानाचे रसांत मिळवावें. व खरारा करून लावावें. दुसरे दिवशीं गुरगुडीच्या पाण्यानें धुवावें व खरारा करून लावावें. अर्धाशेर तूप घेऊन २१ वेळ धुवावें. पारा एक तोळा घेऊन सात कपडे गाळ करून, तुपांत कढवावें व कापूर ६ मासे घालून हें मलम लावावें. दोन तीन दिवसांत बरें होईल. हरताळ ६ मासे, गंधक एक तोळा, मनशीळ एक तोळा, जोख एक तोळा, कांब्या सेंदूर ६ मासे, पारा ६ मासे, निला तोता भाजलेला तीन मासे, व लोणी अतपाव घेऊन त्यांत मिळवून दररोज लावावें. असें तीन दिवस करावें, व यापासून मनुष्याची व घोड्याची खरूज जाते.

सर्व अंगास कंड सुटून अंग घांसूं लागतो, अंगावर चट्टे पडतात, सर्व अंगावर बारीक गांठी होतात, त्यास उपचार—टाकळीचें बीं, तीळ, मीठ, हाळद, इंद्रावणीचें मूळ, बांवच्या, रुईचे झाडाचा चीक, अथवा हिरया, हीं सर्व औषधें पावशेरप्रमाणें घेऊन चूर्ण वस्त्रगाळ करावें. तें चूर्ण आंबट ताकांत कालवून एक दिवस आंबवून तीन दिवस अंगास चोळावें.

झशीचें शेण वस्त्रगाळ करून उंबराचा पाला, तिळाचें तेल, कांजी यांत वाटून ३ दिवस अंगास लाविलें असतां पुष्कळ दिवसांची खरूज जाईल.

काळें मिरें पावशेर घेऊन वाटून तेलांत कढवून ऊन असतां घोड्याचे अंगास चोळावें. असें तीन दिवस केलें असतां सर्व खरूज जाईल.

पांढरे रुईचीं फुलें, काळ्या कुड्याची साल, हाळद, व भद्रमोथा, हे सर्व समभाग घेऊन चूर्ण करून गोमूत्रांत एकत्र वाटून लावावें.

करंज्याचा पाला, व जोंरीची कज्जली समभाग घेऊन गोमूत्रांत खलून लावावी.

खांडकावरच्या लुती अथवा घायावरच्या लुती (लस) उठतात आणि फुटतात त्यांतून लस वाहते त्यास उपचार-शेळीच्या लेंड्या वाळवून त्याचें वस्त्रगाळ चर्ण करावें. त्यांत सैंधव आणि डांगरमीठ मिसळून बारीक वाटून लुतीस लावावें. वर चिरगुटें घट्ट बांधावीं. असा क्रम ४ दिवस करावा.

अघाड्याच्या पाल्याचा व सराट्याचा रस आणि शिंपांचा चुना व तिळांचें तेल एकत्र कालवून लावीत जावें.

खड (खांडूक)—घोड्याचे बेंबींत फोड येऊन त्यांतून पाणी (पू) वाहूं लागतो. त्यास उपचार—चिंचेच्यावरील टरफल घेऊन त्याची बारीक पूड करावी. व घोड्याची बेंबी अगोदर ऊन पाण्यानें धुऊन वर तूप लावावें. आणि वर ही टरफलाची पूड लावावी. जर त्या खांडकावरचे केंस गेले असतील तर म्हशीचें शेण घेऊन तें वस्त्रगाळ करावें. त्यांत पावशेर तूप व पावशेर चुना घालून एकत्र करून खलावें. आणि खापरांत घालून ऊन करावें. व हें औषध केंस गेलेल्या जागेवर केंस येईपर्यंत लावावें.

बदखोरची बाब—घोड्याच्या दांडीला गांठी येऊन वरचे केंस झडतात त्यास उपाय—जवखार, सज्जीखार, लोणाखार, धतुराखार हे सर्व जाळून त्याची राख करावी. आणि त्यांत बांगडखार सम भाग मिळवावा. सर्व एकत्र वाटून लिंबाचे रसांत कालवून दुःखावर लावावें.

अकला याजवर उपचार.

घोड्याचे चार खवाल्यावर दर्द होतें, त्याला बरसात ह्मणतात. हें दर्द बारा महिने राहतें. तें मज्या बिघडल्यापासून होतें. त्यावर घोड्याची लीद व मसुराचें पीठ मिळवून त्यावर बांधावें. दुसरें बुरा आरमणी ह्मणजे एक प्रकारचें मीठ आहे तें घेऊन कोंबड्याच्या एक अंड्याचा बलक घेऊन त्यांत मिळवून त्यावर बांधावें.

तेलीया सुहागी अर्धा तोळा, भाजलेली फटकडी एक तोळा, वावडिंग एक तोळा, निळा तोता एक तोळा, पळसाचें बीं, अवळकटी सुमारें दोन चार, हीं सर्व घेऊन बारीक करून बाजरीचे पिठांत सात दिवस घोड्यास द्यावी.

तिळाचें तेल तीन शेर, दहीं तीन शेर, लिंबाचे पाल्याचा रस पावशेर, उडदाची डाळ एक शेर, सर्व एकत्र करून भांड्यांत ठेवून जमिनींत सात दिवस पुरावें, नंतर काढून सकाळीं १४ दिवस तें औषध द्यावें.

केश झडतात, त्यास धुणें नाहीं, खरारा करीत नाहींत, या योगानें होतें. घाणानें होतें. जागा स्वच्छ ठेवावी, जागा बदलावी, सुगंध पदार्थ अंगावर घांसावे. तिळाचें तेल व लिंबाचा रस अंगास चोळावा.

मिरीएम ह्मणून एक झाड आहे, तीं पांच आणून कुटून जैतूनचे तेलांत मिळवून लावावें आणि दुसरे दिवशीं धवावें. तें गुलाबाचे पाण्यानें धुवावें, सफेत भोपळ्याचीं पानें खाण्यास द्यावीं.

लुतेप्रमाणें केंस झडतात, त्यावर उपचार-मायफळाचे सालीचें चूर्ण तिळाचे तेलांत पिण्यास द्यावें.

एगमन ह्मणून एक मछी समुद्रांत होते त्याची चरबी व उंदराची चरबी, अंगास चोळावी. व हत्ती जनावराची चरबी चोळावी.

ळसयुक्त अंग होतें त्यास वांद्राची व कुत्र्यांची चरबी अंगास चो-

लावी. वाघाची व डुकराची चर्बी चोळावी, अजमवून पाहिलें आहे. जातरान, व बुराअमणी मीठ दोन्ही मिळून तेलांत लावावीं.

बरसातीचे आजाराचा प्रकार—पाणी पिवळें जातें व रक्त जातें. फोड होतात. ते कांपून त्यांत मीठ भरावें. फोड लाल होतात, ते कठीण असून डोळ्याजवळ व पिसाबचे जाग्यावर होतात. कांहीं घोड्यांचे सर्व शरीरावर होतात. जवसाचें तेल अतपाव, कापूस दोन वर्षांचा आठ तोळे, मसुराची डाळ मूठभर, जवसाचे तेलांत चार तोळे लावावें. सकाळीं व संध्याकाळीं लेप द्यावा.

फठकडी भाजलेली, पापडखार भाजलेला, नवसागर भाजलेला, ताजा चुना, व मुड्दारसेंग, सर्व बारीक करून सर्व वजन बराबर करून लिंबाच्या रसांतचार किंवा पांच दिवस द्यावें.

सेंदूर एक तोळा, निळातोता भाजलेला २ व मासे, कापशीच्या पाल्याचा रस एक तोळा, एकत्रकरून दोन तीन दिवसपर्यंत लेप लावावा.

बरसातीचे ऋतुमध्यें जो रोग होतो त्यावर उपचार.—घोड्याची लीद ताजी, किंवा हत्तीच्या किंवा गाढवाच्या ताज्या लेंडचा, मनुष्याचे लघवीमध्यें शिजवून नंतर जखमेवर बांधावें. मुदत सहा दिवसपर्यंत. ह्मणजे रोग नाहींसा होईल.

चुना पाण्याशिवाय सुका असावा व तो निर्मळ ह्मणजे चांगला उत्तम व इडलिंबू. पहिल्यानें चुना दारूमध्यें घालून तो चुना थंड झाल्यावर त्यांत इडलिंबाचा रस घालावा. नंतर कापूस घेऊन त्याच्यावर औषध लावावें, नंतर तो लेप जखमेवर घालावा. तिसरे दिवशीं तो लेप काढून टाकणें. जर जखम बरी न झाली तर पुन्हा नवीन लेप सदहू प्रमाणें लावावा. व मखमालीचा रस काढून त्यावर चोळावा.

बिबवे आतपाव घ्यावे व मासे एकशेर, व हरभरे अतपाव घेऊन ते दोन वेळां भाजावे. व बिबवे आणि मासे एकत्र करून भा-

नलेल्या हरभऱ्याचें पीठ करून, बिबवे व मासे यांचें जें कांहीं केले-
लें औषध तें व पीठ हरबऱ्याचें हें एकत्र करून त्याच्या १४ चौदा
गोळ्या करून, दररोज सकाळीं एक देत जावी. असें चौदा दिवस क-
रावें. व ऊन पाणी पिण्यास द्यावें तें एक वेळ पाजावें. थंड पाणी
देऊंनये, व घास कडबा खाण्यास द्यावा. आणि कळीचा चुना भिज-
वून तपकीर त्यांत मिश्रित करावी व तें औषध घोड्याच्या जख-
मेवर लावावें.

धोतरा पिंवळा त्याच्या मुळ्या मुद्धां चार तोळे, व काळे मिरे तीन
तोळे, दररोज द्यावे, तीन दिवसांत बरें होईल.

कडू लिंबाचीं पानें एक शेर, व तांदूळ एकशेर, हें सर्व एकत्र
करून शिजवावें, नंतर त्यांत एकशेर दहीं घालावें, व एक तोळा
हिरडे, मोठी वेलची एक तोळा, सोनामुखी एक तोळा, जिरे पांढरी
पांच तोळे, हिरडे मोठे अतपाव, अवळे अतपाव, जुना ह्मणजे फार
दिवसाचा गूळ अर्धाशेर. सदर्हू एकत्र करून त्यांत दहीं, तांदूळ,
व कडू लिंबाचीं पानें एकत्र करून एक दिवस ठेवावें.व प्रत्येक दिव-
शीं घोड्यास खाण्यास आतपाव द्यावें.

मकईचें पीठ एकशेर, व बारीक मासे एकशेर हें तिळाच्या तेलांत
तळावे, तें इतके तळावें कीं, अगदीं जाळून टाकावें. व फटकी, नव-
सागर,त्यांत घालावें आणि त्याचें औषध करून तें लावावें.व जें कांहीं
औषध राहील तें मठाचें पिठांत घालून त्याच्या चाळीस गोळ्या क
रून सात दिवस घोड्यास द्याव्या.

हिरवा जंगला छटाक,व मोगरेल तेल च्यार पैसेभार घेऊन त्यांत
तो शिजवावा. आणि त्याचे लेप सात दिवस लावावे.

हिरवा जंगला६तोळे, कळीचा चुना६ तोळे, व पिंवळा धोत्रा या-
चीं मुळें हीं सावलींत वाळवावीं. व तीं दोन तोळे घेऊन बारीक करा
वी. सदर्हू बरसातींत जो रोग होतो त्याच्यावर सदरीं लिहिले-

ळें औषध एकत्र करून त्या जखमेस थंड पाण्यानें भिजवून साफ धुऊन टाकावें आणि त्याच्यावर सदहूं औषध लावावें, एका आठवड्यांत बरें होईल.

लेप करण्यापूर्वीं मनुष्याचे केंस जाळून त्या जखमेस लावावे नंतर औषध लावावें. दाहा पंधरा दिवसांत बरें होईल.

चिंच अर्धाशेर,बिब्वे अर्धाशेर, व गूळ तीन वर्षांचा अर्धाशेर एकत्रकरून १४• गोळ्या कराव्या. प्रत्येक दिवशीं सकाळीं एक गोळी खाण्यास द्यावीं.

ताजा चुना व तिळाचें तेल हें तरवड्याचे झाडाचें रसांत सज्जीखार चार पैसेभार घेऊन एकत्र करून लेप करावा.

बरसात.

जंगला छटाक, व मोगरेल तेल चार पैसेभार घेऊन त्यांत कढवून त्याच्यावर लावावें.

तपकीर अतपाव, व काळें मिरें चार पैसेभार कापसांत टाकून कच्चें भाजावें. चुना अतपाव, व फटकी दोन पैसेभार बारीक करून एकत्र करावी. एक दिवस अमर दोन किंवा तीन दिवस लावावें. प्रथम लिंबाचे रसानें बरसात चोळावी.

करंजाचीं पानें घेऊन कुटून चाळीस रोज पर्यंत, दररोज पावशेरप्रमाणें घोड्यास खाण्यास द्यावीं.

साबूण ३० पैसेभार, व तंबाखू ३० पैसेभार बारीक करून ३ तीन पैसेभार गोळी करावी. व सकाळीं एक आणि संध्याकाळीं एक, दाणा दिल्यानंतर द्यावी.

शिंगरूफ एक तोळा,व रुईची साल मुळ्यासुद्धां सावलींत सुकवावी. त्यापैकीं १॥ दीड तोळा घेऊन बारीक करावी,त्यांत शिंगरूफ मिळवा-

या. एकवीस पुड्या कराव्या, आणि सकाळीं एक, बारा वाजतां एक, आणि संध्याकाळीं एक याप्रमाणें पुड्या द्याव्या.

लहान शिंप घेऊन जाळून बारीक करावी. आणि चिंचेची साल, व पिंपळाची साल निरनिराळी जाळून राख करावी. तिन्ही गाईच्या दुधांत मिळवून बरसातीवर लेप करावा.

मीठ खाण्याचें छटाक, व फटकी छटाक, भाजून डोळ्यावर जखम असते तेथें दोन आठवडेपर्यंत लावावें.

तिळाचें तेल एक पैसाभार कढवून कळीचा चुना त्यांत मिसळून जखमेवर लेप द्यावा.

सोमल एक तोळा, मोगरेल तेलांत घालून जखमेवर सात दिवसपर्यंत चोळावें.

काळें मिरें अतपाव, हळद अतपाव, काळेंजिरें आतपाव, व गुग्गूळ एक पैसाभार हे सर्व बारीक करून नरमूत्रांत घालून जमीनींत सात दिवस पुरून ठेवावें. नंतर काढून थोडेंथोडें घोड्यास खाण्यास द्यावें.

जायफळ १ तोळा, लवंगा तीन मासे, मनशिळ एक तोळा, गुडगुडीचा मैल १ तोळा, व तंबाखू १ सर्व बारीक करून लिंबाचे रसांत बरसातीवर लावावें.

वेलदोडे एक तोळा, साहारी मीठ तीन तोळे, बाळहिरडे अतपाव, गूळ जुना अतपाव, चिंच अतपाव, हीं सर्व बारीक करून गुळांत मिळवावीं. एक तोळ्याची एक प्रमाणें गोळी करावी. नंतर लिंबाचीं पानें अच्छेर, व भात १ शेर हें रात्रीस शिजवावें. सकाळीं दहीं शेरभर घरांत केलेलें घ्यावें. नंतर दह्यांत भात कालवावा, गोळी अगोदर द्यावी नंतर भात द्यावा. याप्रमाणेंच संध्याकाळीं करावें.

रुईचा चीक व येरंडेल तेल एकत्र करून, कानावर टाकून डोळ्यावर पट्टी बांधावी. नंतर मोरचूत, व निळा जंगळा, भाजून बारीक करून तीन दिवस पट्टी बांधावी.

डोळ्यावर व खालीं बरसात होते त्याजवर उपचार—हरताळ, व निळाजंगला भाजलेला, बारिक वस्त्रगाळ करावा आणि बरसातीवर लावावा. कांहीं दिवस असें करावें, घोड्यास खाजवूं देऊं नये.

बरसातीवर जखम झाली तर त्याजवर उपचार—शेंदूर, खडीसाखर, दरयाचा फेंस, व बसरी दगड, हीं सर्व बारीक करून लिंबाचे रसांत मिळवावें, आणि बरसातीवर लावावें. नंतर वर लिहिल्याप्रमाणें पट्टी लावावी.

बकऱ्याचे पाठीची हड्डी घेऊन, त्यांतील मगज काढावा, व शिंगरूफ, आणि शेंदूर यांचा पट्टी डोळ्यावर लावावी.

नासरु हें डोळ्याचे कोनावर होतें, तेणेंकरून डोळ्यांतून पाणी फार वाहतें,व गू फार येतो. त्याजवर उपचार—रक्त काढावें, कतुरीवन ह्मणून एक नदीचे किनारीं मुळी असते ती, व काळें मीठ आणि जंगला बराबर घेऊन त्यावर लावावें.

नरकवटी भुकटी करून लिंबाचे रसांत लावावी.

मायफळ, कतुरीवन, भाजलेली फटकी, केशर, व अफू हें सर्व बारिक करून विंचू जाळून त्याची राख घेऊन वस्त्रगाळ करून, नासुरांत तीन दिवस भरावी.

बुराअद्‌मणी मीठ, इंद्रायणी मीठ, दर्याचा फेंस, व खडीसाखर,बराबर वजन घेऊन, नवसागर चवथा हिस्सा घेऊन, सर्व बारीक करून वस्त्रगाळ करावें. आणि आठ जवा इतकें नासुरांत भरावें.

घोड्यास गर होतात त्याजवर उपचार.

सर्व शरीरावर गर होतात, ते कांहीं मोठे व कांहीं लहान असतात. त्यापासून पिवळें पाणी निघतें, त्यास हातानें नरम करावें. आणि ऊन पाण्यानें धुऊन टाकावें. मेण आणि चर्बी हीं दोन्ही

मिळून वितळवावीं. आणि त्यांत तिळाचें तेल टाकावें. आणि तें त्या गरांस लावावें.

काळें मीठ पावशेर, बांगडखार, सज्जिखार, ओंवा (अजवान), हळद, आंबेहळद, बच, सुंठ, कुटकी, गुग्गुळ, अफू तीन मासे, पिंपळी, पिंपळमूळ, चारट, शेण व स्त्रियांचे विटाळाचें भिजवलेलें फडकें, खाण्याचें मीठ, व मध पावशेर. त्यापैकीं मध एक पैसाभार घोड्याचे जिभेस चोळावा. आणि ऊन पाण्यानें धुऊन टाकावें. नंतर बच (वेखंड) आणि आंबेहळद वजन ८८८९ हीं कुटून आणि शिजवून सकाळीं सातदिवस पर्यंत द्यावें. नंतर सदरीं लिहिलेला सर्वमसाला पावशेरप्रमाणें घ्यावा,व त्यास बारीक करून मधामध्यें त्याच्या गोळ्या कराव्या. त्या सकाळीं घोड्यास द्याव्या, असें दोन आठवडेपर्यंत करावें. ह्मणजे घोडा बरा होईल.

अगोदर काशीचे पाण्यानें त्यास धुऊन टाकावें. काशी आणि राजपुतक हीं दोन्ही एके ठिकाणीं मिसळावीं. व मेण आणि चर्बी यांणीं तें गरावर चोळावें. आणि त्याजवर राजपुतक व काशी हें लावावें.

गर मानेंत व शेपटींत कठीण व सुकें होतात, पाणी जात नाहीं, रंग पांढरा होतो त्यास उपचार—एक लहान बेटकुळी आणावी. दररोज एकप्रमाणें चार दिवस खाण्यास द्यावी. पांचवे दिवशीं डिकेमाली ८८८५ पांच टांक द्यावी. त्यांत एक साप सरडा मोठा रंगी बेरंगी असा आणावा. आणि गोडें तेल घेऊन त्यांत कढवावा. आणि गरावर लेप करावा.

दगडांनीं चोळून रक्त काढावें. नंतर सोबणखार, चुना, निळातोता व लिंबाचा रस यांचा लेप करावा. गुग्गुळ १ एकशेर, पावशेर काळें मीठ, आणि हळद पावशेर. १९ गोळ्या करून रोज एकप्रमाणें सकाळीं खाण्यास द्यावी.

बकरीचें मांस, कलमी सुहागी, हिंग व राई हे सारखे घेऊन काळे मिरे दहा पट, लाल मीठ दहा पट व बाजरीचें पीठ २० पट, सर्व मिळून १८ गोळ्या कराव्या. रोज सकाळीं एक द्यावी.

भाजलेला गुग्गुळ अर्धा शेर, व बैलाची चर्बी दहा शेर शिजवून ४० गोळ्या कराव्या. सकाळीं एक गोळी दाणा देण्याचें पूर्वीं द्यावी.

उडदाची डाळ अर्धा शेर, अंबेहळद पावशेर, तूप अतपाव, व बकरीचें मांस तुपांत शिजवावें, नंतर तीन गोळ्या कराव्या. प्रतिदिवशीं रात्रीं एक गोळी द्यावी. बरें झालें नाहीं तर सात दिवसपावेतों द्यावी.

पैसाभार चुना, व साबू पैसाभार, पाण्यांत मिळवून त्याचा लेप करावा. व विस्तवानें शेकावें.

तूप व मीठ, एकत्र करून अंगास चौदा दिवस लावावें.

दररोज सकाळीं शिळे पाण्यानीं धूत जावें.

गुरगुडीच्या पाण्यानें दररोज धूत जावें.

जोंधळ्याचें पीठ पावशेर, बिबे अर्धाशेर, बिबे कुटून जोंधळ्याचे पिठांत घालून, त्यांत पाणी घालून शिजवावें. त्या पिठाचा लेप घोड्यास करावा.

तिळाचें तेल १ शेर घेऊन त्यांत अर्धाशेर बिब्याचे तुकडे टाकून, दोन्ही जिन्नस एकत्र करून शिजवावें. त्या तेलाचा तीन दिवस घोड्यास लेप करावा. हें औषध खरजेसही उपयोगी आहे.

चित्रक पावशेर, आंबेहळद, हळद, गंधक, रुलीम, जमालगोटा, मोहरी, सज्जीखार, हे प्रत्येक पावशेर, व रुईचें लांकूड एक तोळा, हे जिन्नस आणून पूड करून माणसाचे मूत्रांत भिजवावें. आणि मग त्यांत तेल घालून शिजवावें. व घोड्याचें अंग खाजवून त्यावर हें औषध लावावें.

आवाड्याचे झाडाचीं मुळें व पाला जाळून त्याची राख करावी. ही राख तिळाचे तेलांत खलून गरेवर लावावी.

जोंधळ्याचें पीठ अर्धाशेर, व सोरमीठ अर्धाशेर, एके ठिकाणीं मिसळून त्याची भाकर करून चांगली भाजावी, नंतर ती भाकर कुटून त्याचा चांगला चुरा करून ती पूड वस्त्रगाळ करावी, ही पूड तिळाचे तेलांत मिसळून गरीवर लावावी. एक आठवड्यांत बरें होईल.

ह्या औषधानें गर बरी न झाल्यास, ज्या ठिकाणीं रोग झाला असेल त्या ठिकाणीं थोडेसें चिरून त्यांत रुईचा चीक भरावा.

सरफिट.

कारण.—अन्न जिरणारे कोठ्यांत कांहीं हरकत झाल्यानें, किंवा किडणीमध्यें हरकत झाल्यानें खराब वस्तु निघून सरफिट नांवाची इजा होते. नर्व्ह (शिरा) मध्यें ही हरकत झाल्यानें इजा होते, एकांत खरूज होते, व दुसऱ्यांत फोड येतात.

लक्षण.—खरूज होते, क्यूटिकल ह्मणजे कच्चे कांतडें निघून त्यांतून रक्त येऊन कांतडें सरकल्यासारखें होतें, फिरून खरूज बंद होऊन त्या लाल जागेवर पांढरे छिलटे येतात.

इलाज.—ब्रानम्याशमध्यें नायटर दोन ड्राम द्यावें, नरम रतीब लावावा, ठाणामध्यें मिठाचे खडे ठेवावे. व्हिनीगर लोषन लावावें, किंवा, सलफ्यूरिक आसिड लोषन लावावें. सलफ्यूरिक आसिड एक औंस व पाणी दोन बाटल्या पिण्यास द्यावें. त्या योगानें क्यूटिकल नरम होऊन नर्व्ह (शिरा) यांस अराम होतो, फुलर्स लोषन ऑफ आरसेनिक एक औंस पिण्यास द्यावें, किंवा ताक लावावें. काळी मिरची, व सोन गेरू एक एक तोळा, फटकीचें बीं एक तोळा, एक जागीं मिश्रण करून पिठांत द्यावें. उदाचा अर्क द्यावा, किंवा काळी माती लावून उन्हांत उभा करावा.

मणकस—ह्या प्रकारचा घोड्याचा रंग उत्पन्न होऊन घोडा अगदीं अशक्त होतो. त्यास उपचार–इरसाल आंब्यांचा रस काढून

तांदूळ, धुवासाखर व गाईचें तूप एकत्र करून दोन आठवडेपर्यंत द्यावें. ह्मणजे मणकस रंग बरा होईल.

त्वग्रोग सर्व शरीरावर होतो. मुख्यत्वेंकरून त्वचेस सूज असते. खांदा व कुशी खेरीजकरून बाकीचे अंगावर त्याचा प्रादुर्भाव होतो. अंगाचें पहिलें कांतडें वर आल्यासारखें दिसून त्वचा दिसूं लागते. नंतर थोडे दिवसांनीं खवलीं पडतात, त्यानंतर कातड्यावर कोंडा उत्पन्न होतो. आणि तो कोंडा त्वचेवरचे केंस घेऊन निघूं लागतो. हा रोग उन्हाळ्याचे जे महिने आहेत त्यांत व मेहनत करून आल्यानंतर अंगांत गर्मी असल्या वेळीं हिरवें गवत व थंड पाणी सेवन केल्यापासून होतो. या साठीं असें न होऊं देण्याकडे सर्व काळ लक्ष्य असावें. जर मेहनत करून आल्यावर लागलेंच घोड्यास हिरवें गवत खाण्यास दिलें किंवा थंड पाणी पिऊं दिलें तर केव्हां केव्हां पोटशूळही उत्पन्न होईल. या सदरीं सांगितल्याप्रमाणें त्वचेच्या रोगास सरफिट असें ह्मणतात. हा बरा होण्यास जुलाबाचें औषध पांच किंवा सहा दिवसांचे अंतरानें, देत जावें. व भुशाबरोबर कांहीं नैटर मोताद द्यावें. व घोडा फारच लठ्ठ असेल तर रक्त काढावें. हाही एक उपचार आहे.

म्यालंडर ह्मणजे गुडघ्याचे सांध्याचे पाठीवर कोंड्यासहवर्तमान ज्या पुळ्या उठून फुटतात त्याला म्यालंडर असें ह्मणतात. आणि हा रोग रक्त नासल्यापासून होतो. त्यास उपचार—आल्टरेटीव आणि कूलिंगफिजीक (सौम्यजुलाब) दिला पाहिजे. व नैट्रेट ऑफ सिल्वर ऑइंटमेंट लावावें. अथवा आर्‌ज्ञीज ऑइंटमेंट लावावें.

स्यांडर रोग (मांडीचे सांध्यासमोर) म्यालंडर प्रमाणेंच जो कांहीं रोग होतो त्याला औषध जें मॉलंडरच्या रोगास सांगितलें तेंच योजावें.

कातड्यावर सूज येते, किंवा गांठी होतात, बाजूस खांद्यावर गांठी

येतात व कांहीं गांठी जिरून डाग पडतात. गरमीचे दिवसांत हा रोग होतो, तसेंच घोडा बाहेरून फिरून आल्यावर गरमीमुळें व थंड पाणी किंवा हिरवें गवत दिलें तर हा रोग होतो. साधारण जुलाब ९ वे अगर ६ वे दिवशीं द्यावा. नैटर व ब्रांडमांस सात औंस भुशांत द्यावें. घोडा खाण्यानें लठ्ठ झाला असेल तर रक्त काढावें.

सुंभास किंवा टांचेस क्षत पडून दुःख झालें तर पाण्यानें धुण्यापासून जास्ती होतें. या करितां पूर्वीचें मलम लावावें. थंड जुलाब द्यावा. एक औंस नैटर भुशाबरोबर किंवा कोंड्याबरोबर जुलाब होण्याच्या पूर्वी द्यावें. नंतर थंड जुलाबाची गोळी द्यावी. व जुलाब बंद झाल्यावर नैटर १ औंस भुशाबरोबर द्यावें.

बोसावाद.

घोड्याच्या सर्व अंगावर गांठी होतात आणि गांठीचे आंतील मांस मोठें होतें त्यास उपाय—पळसाचें लांकूड, चिंचेच्या झाडाची साल, व आघाड्याचे झाडाची साल, ह्या सर्व क्षारी निरनिराळ्या जाळून त्यांच्या राखा व शिंपा जाळून त्याचा चुना हे सर्व समभाग घेऊन व पाण्यांत एकत्र कालवून लेप करावा. ३ दिवसांत उपशमन होईल.

ग्रीस रोग.

ग्रीस रोग (टांचेला जें क्षत होतें) त्यास ह्मणतात. हा रोग गाडीचे घोड्यास उत्पन्न होतो.

हा रोग तीन जातींचा आहे. सिंपल (साधा), अलसरव्हेटीव (नासुरा) सारखा, आणि ग्रेप्स (द्राक्षा) प्रमाणें होतो.

कारण.—अंगावर मळ ठेविल्यानें, खराब दाणा चारल्यानें, सर्दीपासून, पाण्यानें धुतल्यावर चांगला कोरडा न केल्यामुळें, आणि अशक्त घोडा असला तर हा रोग होतो.

सिपलचीं लक्षणें.—पाठीमागले पाय थोडे सुजतात, लंगडूं लागेल, परंतु कामाच्या वेळेस लंगडणार नाहीं, अंगावरचे केंस उभे राहतात. अंग तेलकट होतें, व कातडें नरम होतें.

इलाज.—खाण्यांत बदल करावा, तीन दिवसपर्यंत पोटिस बांधावें, तें सूज कमीं होईपर्यंत. आलम पावडर सुजेवर टाकावी, फिरवीत जावा; बरा होईल.

नासुरा सारख्या सुजेचीं लक्षणें.—मागील पायाचे गुडघ्यापर्यंत सूज येते, फार लंगडतो, तेलासारखा पदार्थ जास्त निघतो, नासरूंसारखें दिसेल.

इलाज.—ओपियम पावडर पोटिसांत घालून तें पेटिस तीन दिवसपर्यंत बांधावें. क्लोरेड ऑफ झिंक दोन स्क्रुपल, टिंचर ओपियम २ औंस, पाणी एक बाटली, यांचें मिश्रण करून दिवसांतून दहा-बारा वेळ लावावें. घाण येत असल्यास बारीक कोळसा दोन पौंड, खळ (कणकीची) एक बाटली, भुस्सा एक पाउन्ड, बारली एक पाउन्ड, व ओपियम पावडर मिश्रण करून पोटीस बांधावें. एकाच पायास सूज आल्यास ह्याचे चौथा हिस्सा तयार करून लावावें.

ग्रेप्सचीं लक्षणें—कातड्यावर द्राक्षासारखे गोळे येतात. तेलासारखा पदार्थ निघतो, ती जागा काळ होते, हात लावल्या बरोबर रक्त निघूं लागतें.

इलाज.—त्या गोळ्यास चाकूनें कांपावें, रक्त बंद होईल असा डाग द्यावा, कोळसा, आणि खमीर (आंबवलेली कणीक) यांचें पोटीस बांधावें.

जर लहान घोड्यास सूज आली तर, सहा पौन्ड भुस्सा आणि गाजरें खाण्यास द्यावीं, अन्न पचन होणारें व मूत्र साफ होणारें औषध द्यावें. जिनसन एक ड्राम, व नाइटर २ ड्राम, सुंठ आणि गूळ ह्यांत गोळी करून द्यावें, गाजराचें पोटीस बांधावें, रपेट द्यावी. लिंबोणी, फटकी, पाप-

डखार, पांढरें जिरें, अंबेहळद, गंधकाचा अर्क आठ आणे भार व सर्व औषधें तोळा तोळा घेऊन पाण्यांत उगाळून लेप करावा.

गजचर्म.

घोडा वारंवार अंग घांसतो, अंगावर चट्टे पडतात. अंग हत्तीच्या अंगाप्रमाणें खरखरीत होतें ह्मणून त्यास गजचर्म ह्मणतात. त्यास औषध—रूईच्या मुळींची साल,कुड्याची साल,निर्गुडीची साल,हळद, दारूहळद, कांच, संचळ, व गंधबीड, हीं सर्व औषधें पावशेरप्रमाणें घेऊन वाटून गोमूत्रांत एक दिवस भिजत घालावीं. दुसरे दिवशीं घोड्याचे अंगास लावावें.ह्मणजे बरें होईल. (२) अंकोल्याची ओली मुळी पावशेर आणून कुटून बारीक करावी. मग बिब्बे, बावंच्या, व खडशिंग, प्रत्येक २ शेर आणून चूर्ण करून तिळाचें तेल पावशेर, व अंकोल्याची कुटलेली साल घालून पातालयंत्रांत घालून तेल काढावें. तेल करपूं देऊंनये. हें तेल सात दिवस अंगांस चोळावें. असें लाविलें असतां गजचर्म, खरूज, खांडूक, मूत्रा, जखम, फोड व गरीचीं छिद्रें या सर्व रोगांवर गुणाकारी आहे. हळद गाईचे दुधांत कालवून पोटांत द्यावी.

रिंगवर्म.

हा रोग चकरीसारखे चट्टे पडून होतो, यांत किडे होतात त्यांस प्यारेसाइट ह्मणतात.

कारण.—एकापासून दुसऱ्यास हा रोग उद्भवतो, किंवा त्याच्या शरीराच्या फेरफारानेंही उद्भवतो. ह्याची लस दुसऱ्यास लागल्यास आठ पासून चौदा दिवसांत ही इजा होते; ह्याप्रमाणें न झाल्यास स्पर्शापासूनही इजा होत नाहीं.

याच्या दोन जाती आहेत. एक सुखी खरूज व एक ओली खरूज. ओलीचे आंत पिवळें पाणी निघून खरूज जास्त होते.

ओलीचा उपाय.—ब्ल्यू आइन्टमेन्ट लावावें, आणि पांढरा कपडा बांधून त्याजवर झूल घालावी.

सुखीचा उपाय.—साबूण आणि पाणी यानें साफ धुवावें, किंवा क्यांथ्रेडिस एक औंस व व्हिनीगर आठ औंस, भिजवून चवदा रोज लावावे, लिंबू चोळावें, किंवा लिंबु आणि मनसर मिश्रण करून दोन दिवस लावावें, म्हणजे बरी होईल.

लिस (ऊ).

उवा पडतात त्यांजवर.

इलाज.—सर्व शरीर धुवावें, किंवा तंबाखूचे पाण्यानें धुवावें, किंवा कारबालिक लोषन लावावें, सिताफळाचीं पानें, वाटून लावावीं.

घोड्याचे पहिले केंस उपटून दुसरे आणण्याचा प्रकार.

केश पांढरे झाल्यास त्याजला उपचार—प्रथम केंस उपटून त्यावर वडाचा चीक मर्दावा. व त्यावर पारंब्यांचे तुकडे आणि खापरी घोटून बांधावी. ३ दिवस सोडूंनये, चौथे दिवशीं सोडून वज्रीनें घांसावें. व वर लोजखार मर्दावा, आणि पुन्हां वडाचा चीक मर्दावा. त्यावर बिब्याचें तेल लावावें. व त्यावर बुरणुसाचा तुकडा एक दिवस बांधावा. नंतर सोडल्यावर पांढरे केंस जातील.

कपाळावरचे, मानेवरचे व डोळ्याच्या कोनाचे केंस झडतात त्यावर.

ऊन पाण्यानें किंवा मुलाचे अगर गाढवाचे मुतानें कपाळ व मान धुवावीं.नंतर त्या ठिकाणीं उंदराची अथवा शहामृगाची किंवा घोड्याची

चर्बी ऊन करून त्यांत नव्वद रति तिळाचें तेल, अर्धा रत्तल तीळ व अंबर चार जव घालावें. प्रथम जैतुनाचे तेलानें धुऊन मग वर लिहिलेले जिन्नस चोळावे ह्मणजे नवे केंस येतील. हनुभाविक आहे.

अंगावरचे केंस निघून जातात, ते येण्यास उपाय.

लोणी, नीळ, कांहीं साबण, कांहीं मीठ, पांढरा काथ, व लिंबाचीं पानें भाजलेलीं सर्व बारीक चूर्णाप्रमाणें करून लोण्यांत मिळवून दररोज दोनतीन वेळ केंस गेले असतील तेथें लावावें ह्मणजे केंस येतील. अनुभव आहे.

इलाज दुसरा.—खोबरें व दोन भिलावे जाळून नीळ १ तोळा, व जंगला भाजलेला सहा मासे, या सर्वांस बारीक करून लोण्यांत मलम तयार करावें, तांब्याचे भांड्यांत ठेवून दररोज तीन वेळ लावावें.-लौकर केंस येतील, अनुभव पुष्कळ आहे.

तिसरा इलाज—बकरीचा सुलुखा, मीठ, तूप, हळद, नीळ, सर्व मिळवून मलम करावें. दररोज दोन तीन वेळ लावीत जावें. केश पुष्कळ येतील. अनुभव आहे.

चौथा इलाज—केंस येत नसतील तर येण्यास. सज्जिखार बारीक करून मुळ्याचे रसांत मिळवून जेथें केंस गेले असतील तेथें लावावें. केश येतील.

पांचवा इलाज.-कांहीं कारणांनीं केश गेले असतील तर ते येण्यास उपाय. दारूपिण्याचे बाटलीचीं बुचें तीन चार घ्यावीं. नंतर तीं जाळून त्यांची राख तुपांत अगर तेलांत मिळवावी. मग केंस गेले ठिकाणीं दिवसांतून दोन तीन वेळ लावावी.

कोंबडीचे अंड्याचें तेल व माशीचा गू कांहीं बूच जाळून सर्व मिळवावें—जेथें केंस गेले असतील तेथें चोळावें—एक हस्तापर्यंत केंस येतील.

मस झाला तर त्यावर उपचार.

मस झाला तर चार पांच लिंबाचे रसानें त्यावर चोळावें. नंतर ताजा चुना घेऊन लिंबाचे रसांत लावावा.

सोमलखार, सितूर याचे तेलांत कालवून लावावा. कांहीं घोड्यास मस फार येतात व कांहीं घोड्यास कमी येतात. फार असल्यास शस्त्रांनीं कापावें. त्यावर सज्जिखार व कळीचा चुना ताजा, मनशीळ, सारखे घेऊन नरमूत्रांत भिजवून तीन दिवस लावावें. घोड्यास खाजवूं देऊं नये.

गूळ मसावर लावावा. त्याजवर लोखंड तापवून डाग द्यावा.

मस वस्त्रचांनीं छेदून टाकावें. आणि त्यावर नरविष्टा सात दिवस लावावी. डोळ्यावर मस होतात त्यास उपचार—सज्जिखार, शहाजिरें, हळद, सुहागी, व चुना ताजा, सारखें घेऊन बारीक करून लिंबाचे रसांत मसावर चोळून लावावा. असें कांहीं दिवसपावेतों करावें.

घोड्याची लीद ताजी शिजवून कळीचा चुना त्यांत भिजवावा, आणि लिंबांचा रस घालून मसावर सात दिवसपर्यंत लावावा.

सोमल, सज्जिखार, साबूण, खडीसाखर, व दातें, हे सारखे घेऊन लिंबांचे रसांत घालून दोन दिवस ठेवावे. नंतर दोन दिवसपर्यंत मसावर लावावे. खावयास भात दह्यांत घालून द्यावा. सज्जिखार, साबूण, कुत्र्याचा गू पांढरा घेऊन, मस छेदून त्यावर लावावा. तीन दिवसपर्यंत असें करावें.

घोड्याचे सर्व अंगावर मस होतात. त्याजला जसे माणसाचे अंगावर मस होतात, त्याप्रमाणें घोड्याचे अंगावर लहान मोठे होतात. ते पोटाखालीं व डोळ्याखालीं कोपऱ्यावर व लिंगावर व गुदद्वारावर व कांहीं सर्व शरीरावर होतात. त्यामुळें सर्व शरीर

काळें होतें. त्याजला घोड्याचें तोंड बंद करून त्या मसावर सज्जिखाराची पूड करून लावावी.

कळीचा चुना व गूळ एकत्र करून मसावर लावावें. ह्मणजे मस नाहींसे होतील.

सज्जिखार व कळीचा चुना हे दोन्ही सारखे वजन घेऊन एकत्र करून मसावर लावावे.

जैचपल, शेतरज्य, मिरच्या, समलतीब, व अबलूस, हे जिन्नस प्रत्येक नऊ मासे घेऊन गाईचे गोमूत्रांत एकत्र करून लावावें.

शरसफ, नागरमोथे, व पवार, हे प्रत्येक सहा मासे घेऊन माणसाचे मूत्रांत एकत्र करून त्या मसावर चोळून लावावें. एक आठवडा हा दवा करावा. आणि सितुराचें तेल पावशेर, लिंबाचा रस पक्का एक शेर, व वीस मासे गोखरू हें सर्व बारीक करून एकत्र करावें व घोड्यास पाजावें.

हिराकस, काळेदाणे (कलोंजी), शेतरजची साल, व लिंबाचीं पानें वाळलेलीं, ह्या सर्वांचें चूर्ण करून मसावर बांधावें.

निळा तोता (मोरचूद), फटकडी, हिराकस, हें प्रत्येक ६ सहा मासे घेऊन बारीक करावें. व रुईचे लांकडाचेंहीं चूर्ण करावें, एकंदर चाऱ्ही जिनसांचें चूर्ण लिंबाचे रसांत भिजवून त्यांत कळीचा चुना घालून कालवावा. आणि मसावर ४ किंवा ५ दिवसपर्यंत लावावें.

हलिला, आकड्याचें (ह्मणजे रुईचें) बीज जंजबिज, बावची, दगडी मीठ, व शहतरा, एकून सर्व जिन्नस १९ मासे घेऊन, माणसाचे मुतांत एकत्र करून पाजावें.

पादरोग—रसुलीवर उपचार.

अंबेहळद पावशेर, सज्जिखार छटाक, दीडपाव रेती, व गूळ पावशेर,

सर्व बारीक करून गुळांत शिजवून कपडयांत बांधून रसुलीवर, बांधावें. नंतर दुसरे दिवशीं बरें झालें तर पुढें बांधूं नये. बरें न होईल तर सहा दिवसपर्यंत असें करावें.

पायांत रसुली झाली तर त्यास उपाय.—कुटकी छटाक लहान घोडयास, मोठ्यास अतपाव, बाजरीचे पिठांत ७ सात दिवसांपासून १५ दिवस पावेतों द्यावी.

शेवग्याचे झाडाचा डिंक तीन तोळे, सुहागीतेलिया एक तोळा, मीठ तोळा एक, फटकी तोळा एक, काळें मिरें तोळा एक, व लवंग ६ सहा मासे, हे सर्व जिन्नस बारीक करून, शेवग्याचे रसांत १४ चौदा गोळ्या कराव्या अगर कोरफडाचे रसांत पाहिजे तर गोळ्या कराव्या. व दाण्याचे अगोदर एक व नंतर एक अशा दोन्ही गोळ्या सकाळीं देत जाणें.

जेपाळ पाण्यांत वाटून लावावें. दुसरे दिवशीं अंबेहळद तुपांत लावावी.

सैंदणीची साल पाण्यांत भिजवून त्याची पट्टी तीन दिवस लावावी.

रसुली हा रोग—हाडावर होतो, व गुडघ्यापासून पुढचे पायास व मागचे पायासखुरापर्यंत होतो, व हे फोड गरापेक्षां मोठे असतात, आणि यापासून पिंवळें पाणी निघत नाहीं. हे मऊ असतात. यास डाग देतात. नंतर त्याजवर साखर टाकितात. याप्रमाणें तीन दिवस करावें.

सज्जिखार, जवखार, बेलाची साल, व खजुराची साल, जांबळीची साल, कबुतराची विष्ठा आणि आघाडा. अगोदर साली जाळाव्या नंतर त्यांत आघाडा व कबुतराची विष्ठा मिश्रण करावी. व चुलीवर ठेवून कढवावें. आणि तें एक दिवस तेंसच ठेवून जेथें रसुली झाली असेल तेथें लावावें. त्यांत कळीचा चुना मिसळून त्या जागेवरचे केंस काढून लावावें.

घोड्याचे पायावर गांठीं होतात त्यास औषध—मनगटाचा भोंवरा थोडा शस्त्रानें चिरून, त्यांत बिब्याचें तेल भरावें. आणि गोवरीनें शेकावें. (२) शाळू जोंधळ्याचा वाळलेला पाचोळा कुटून माणसाचे मुतांत शिजवून, तो मनगटावर चिरगुटांनीं बांधावा. (३) घोड्याची वाळलेली लीद व हरभरे एकत्र करून मनगटावर चिरगुटांनीं बांधावें. वरचेवर पाणी शिंपीत जावें. असें एक दिवस करावें.

बैदा—पुढल्या पायाचें मनगट सुजतें आणि गांठीप्रमाणें दिसतें. त्यास बैदा ह्मणतात, त्यावर उपचार—प्रथम फांसण्या टाकून रक्तमोक्ष करावा. मग सज्जिखाराचें चूर्ण करून तें धोत्र्याच्या रसांत कालवून वर लावावें आणि त्यावर पिंपळाचें पान बांधावें. नंतर शेळीचें मूत्र व नरमूत्र एकत्र करून वर लावावें. असें एक सप्तक करावें. (२) शिळाजित लिंबाचे रसांत वाटावें. फांसणी टाकून जिरवावें. असें तीन दिवस करावें, वर लोहगळाची साल पाण्यांत वाटून वडी करून वर ३ दिवस बांधावी. सोडूं नये.

गीर्द पाषाणास औषध—गोडे तीळ,मोहरी,लसूण,प्रत्येक पावशेर प्रमाणें घेऊन निरनिराळें कुटून बारीक करावें. एकत्र करून पायास बांधावें. तीन दिवस सोडूं नये व पाणी लागूं देऊं नये. खुरपें लाल करून भोंवईस चोंचे द्यावे. अंडीं बाहेर येतील.

चक्रवळ—पायाच्या तळावरचा मेंदा फुटतो. कठिण होतो आणि चेपला असतां दुखतो. चालतांना कुंथतो, त्यास चक्रावळ ह्मणतात, त्यास औषध—लोखंड तापवून त्याणें डाग द्यावा, आणि त्यावर गंधक, शिसें, व नवसागर ठेवून पुन्हा शेक द्यावा. असा क्रम एक दिवस करून मग नरमूत्रांत राख कालवून वर लावावी. (२) अगोदर गोणीचें तागुक बांधावें. त्यावर मुतावें नंतर मोरचूद, जंगला, पारा, हें प्रत्येक एकेक तोळा घेऊन लिंबाच्या रसांत खलून तीन दिवस लेप करावा. व त्याजवर बोंगड्याचें फडके गुंडाळावें. पांच

दिवसांत मांस झडून भोकें पडतील. नंतर गाईचें लोणी व चिचोऱ्याचें झाड जाळून त्याची राख चिंचोऱ्याचे रसांत कालवून त्याचा चक्रावळीवर लेप करावा. व कोरफड चिरून ऊन करून त्यानें शेकावें. व कोरफडीचा लेप द्यावा. पांच दिवसांत उपशमन होईल. खरूज, गर, गजचर्म या रोगांसही हें औषध आहे. करंज्याचा पाला, जोंधळ्याचे ताटाचा मगज वाळवून त्याची कज्जली बरावर घेऊन, एकत्र करून गाईचे मुतांत खल करून तीन दिवस लेप करावा.

मौळू रोग—चारी पायांचा मेंदा फुटतो. किंवा दोन पायांचा फुटतो, अथवा मनगट फुटतें. ईसब होऊन कंड फार येते. आणि कंड फार येऊं लागल्यामुळें दांतांनीं त्या ठिकाणीं चावतो. त्यास मौळू, इसब, अगर विसप ह्मणतात. ह्यास उपचार—सोमल, गंधक, पारा, व तिळाचें तेल, हीं प्रत्येक १ टांक घेऊन रुईचीं पिकलेलीं पानें शेकून त्याचा रस अर्धाशेर काढावा. आणि ह्या रसांत हीं सर्व औषधें बारीक कुटून घालावीं. ह्यांत तेलही मिसळावें आणि हें सर्व ऊन करून पायावर लावावें. असें दोन दिवस करावें. मग ओंवा व रिंगणीचीं फळें पाण्याशीं वाटून त्याचा रस दोन शेर काढावा. ह्या रसांत २ दोन शेर गोमूत्र घालून त्यानें पाय धुवावा. नंतर पुनः वर सांगितलेलें औषध लावावें. आणि पोटांत बाभळीच्या शेंगा ३ शेर कुटून नित्य चारीत जाव्या. (२) गोंदता चार टांक घेऊन त्याचें वस्त्रगाळ चूर्ण करून तें दोन शेर तेलांत घालून कढवावें. आणि तें तेल पायास लावीत जावें. (३) शिरस करंज्याचें बीं, अस्कंद, चित्रक, सैंधव, कांच संचळ, चिराईत, व नाब्याचें बीं, हीं सर्व औषधें प्रत्येकी ३—३॥ टांक घेऊन त्याचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. आणि गोमूत्र दोन शेर व दूध २ शेर एकत्र करून त्यांत हें चूर्ण घालून तें सर्व चोपडया मडक्यांत घालून तीन दिवस उकिरड्यांत पुरून ठेवावें. ह्मणजे औषध चांगलें

आंबेल. नंतर काढून पायास लावावें.सात दिवस लाविलें असतां इसब जाईल. व हें औषध खरजेस लाविलें असतां खरूज जाईल.

तांदुराधतुरा असा होतों कीं, घोड्याचे दोन्ही पाय सुजून मोठे घट, नारळाप्रमाणें होतात. त्यास उपचार—बिबे२शेर,सरसून ह्मणजे राईसारखें ह्मणजे मोहरीप्रमाणें असतें तें २ शेर, करंज्याचें बीं २ शेर,व बावची२शेर,हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन एके ठिकाणीं करून पाताळयंत्रानें तेल काढावें व शिशामध्यें घालून ठेवावें. यांतील राहिलेले दोन टांक, व आवळ्या गंधक एक टांक, पूड करून त्या तेलांत कालवून घोड्याचे पायावर लेप करावा. दुसरे दिवशीं लिंबाच्या रसानें धुऊन टाकावें. पुन्हा सदरप्रमाणें गंधक व तेल एकेठिकाणीं एकत्र करून पायावर लेप करावा. चार दिवसपर्यंत बांधावा. याप्रमाणें करीत असावें. ह्मणजे पाय तडकून तुकडे तुकडे होतात. चार दिवस गुदरल्यावर नऊ टांक गंधक घालूत तेल लावावें. जर हेंच तेल जखमावर व सगळे फोडाला लाबीलें तर बरें होईल.

गाठूर किंवा टाचरू यास औषधें—बिबवे, करडया, व बावच्या, हीं प्रत्येक दोनशेर घेऊन, पातालयंत्रांत घालून त्याचें तेल काढावें. हें तेल चोपडच्या भांड्यांत घालून ठेवावें. मग गंधक १ टांक, व हें तेल २ टांक, एकत्र खलून गाठूरावर लावावें. आणि वर चिरगुट बांधावें. दुसरे दिवशीं गाठूर लिंबाच्या रसानें धुवावें. असा क्रम सात दिवस करावा. मग दोन सप्तकेंपर्यंत हेंच तेल वर लावावें ह्मणजे गाठूर बरा होईल.

अवठाण.

घोडे बांधण्याची जागा उंच नीच असल्यामुळें व त्यावर फार फिरल्यामुळें त्याचे अंगावर गांठी होतात. त्यास उपाय—तिळाचें तेल सर्व अंगास चोळावें नंतर टाकळीच्या पाण्यानें चांगला शेक

द्यावा. असें तीन दिवस करावें. मांसव्याधि—अंगास गांठी उत्पन्न होतात व मांस मोठें होतें. कंडू सुटतो. त्यास औषध—पळसाचे लांकडाची राख, चिंचेच्या टरफलाची राख, आघाड्याचे लांकडाची राख, आणि शिंपा जाळून त्याचा चुना हें सर्व समभाग करून पाण्यांत कालवून त्याचा लेप करावा. गांठी ३ दिवसांत बऱ्या होतील.

बेरहड्डीविषयीं.

बेरहडी यास मराठींत हड्यावर्ण ह्मणतात. त्याचीं लक्षणें— घोड्याचे सुंभासभोंवतीं किंवा मांड्याचे खालीं लिंबा येवढे फोड येतात. त्यास इलाज.—

नस्तर (एक शस्त्र आहे) त्यानें त्याजवरचे केंस काढावे. व त्याचें रक्त काढून टाकावें. नंतर त्याजवर रुईचा चीक व शेराचा चीक व तीनधारी निवडुंगाचा चीक हीं तिन्हीं एकत्र करून लावावीं. परंतु शेंदेलोण, कांहीं जंगला, हळद व कांहीं खडीसाखर हीं सर्व बारीक करून शेराच्या साली घालून शिजवावें. व हड्यावर्णावर तीन दिवसपर्यंत लावावें. तीन दिवसांनीं दुसरी पट्टी त्याजवर मजबूत बांधावी. नंतर सांगितले मलमा पैकीं कोणतेंही मलम लावावें. अनुभव आहे.

उपाय २ रा. नस्तरानें केंस कांपून फोडाचें रक्त काढावें. आणि त्याजवर बकरीचे गुढदे व कांहीं हळद आणि जंगला हीं सर्व एकत्र करून तीन दिवस बांधावीं. अनुभवशिर आहे.

तिसरा उपायः वस्तऱ्यानें केंस काढून मग खजूरांतील बिया काढून टाकून त्या खजुरांत अफू दोन मासे, कांहीं हिंग, कांहीं शेंदूर व शेराचा चीक हें सर्व भरून त्या खजुरास गव्हाचा आटा लावावा व विस्तवावर शिजवावा. नंतर तो भाजल्यावर

त्याचें पीठ काढून त्यापैकीं कांहीं हड्यावर्णावर गरम गरम तीन दिवस तीन वेळ बांधावें.

मेण तोळे २ दोन, भिलावे पंधरा, जुना कापूस एक तोळा, गूळ छटाक, बोळ २ दोन ताळे, अंबेहळद एक तोळा, अजवान १ एक तोळा, हें सर्व बारीक मेणाप्रमाणें करावें. नंतर त्याच्या दोन पोतंड्या कराव्या. विस्तवावर शेकावें. सात दिवसपर्यंत एक पोतंडी थंड झाली कीं, दुसरी घेऊन शेकावें. याप्रमाणें करावें.

जखम झाल्यावर सदरीं लिहिल्याप्रमाणें कोणतेंही एक मलम करून त्याजवर चिकटवावें.

गंधा बेरूजा व ऊद निर्मळ हे बारीक करून तांब्याचे भांड्यांत शिजवावे. कपड्यावर लावून बेरहडीवर तीन दिवसपर्यंत बांधावें. त्यावर आणखी कपडा बांधावा. तीन दिवसानंतर बरें जाहलें तर बरें; नाहींतर दुसरी पट्टी करावी. अनुभव आहे. विस्तवानें शेकीत जावें.

उडीद, व अजवान, दोन्ही दळून बारीक करावें आणि त्याची भाकरी लाल करावी. व ती हड्यावर्णावर बांधावी. हा इलाज चांगला आहे.

इलाज २ रा. बच, अंबेहळद, तीळ, एरंडीचें बीं. गोवर्धन, नवसागर हीं सर्व बारीक करून एरंडीचे तेलांत भाजावीं. नवसागर निराळा बारीक करून भाजून त्यांत टाकावा. मग त्याची भाकरी करून हडीवर तीन दिवस पर्यंत बांधावी. अनुभव आहे.

रुईचे झाडाचा चीक चार पैसेभार व कणीक चार तोळे, एकत्र करावीं. त्यांत एक मासा टाकणखार बारीक करून टाकावा. आणि त्याची भाकरी करावी. नंतर बेरहडीवरचे केंस काढून त्यावर बांधावी. ती तीन दिवसांनंतर काढावी. याप्रमाणें तीन वेळ नऊ दिवस करावें. बेरहाडीवर जखम होऊन पाणी निवत असलें तर मलम करावें.

तें बच एक टांक, पांढरा काथ एक टांक, पांढरें मेण एक टांक, राळ एक टांक, रोठी सुपारी एक टांक, कपिला एक टांक, कापूर एक टांक, जंगला तीन मासे आणि राईचें तेल किंवा शिरसाचें तेल अर्धा शेर. पूर्वी तेल ऊन करावें नंतर सर्व जिन्नस बारीक करून त्यांत घालावे. सुपारी प्रथम भाजून बारीक करावी. कपिळा व तेल एकत्र करावें. नंतर मेण व दुसरे जिन्नस टाकून शिजवावें. ह्मणजे मलम होईल. हडीवर लावावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज—कणीक चार पेसैभार त्यांत पाणी घालून दोन भाकरी बेरहडी असेल तेवढ्या आकाराच्या कराव्या. नंतर बारीक मीठ घेऊन दोन्ही भाकरींचे दरम्यान ठेवून शिजवाव्या. एक एक भाकरी गरम गरम बेरहाडीवर बांधावी. बेरहाडीवरचे केंस काढून मिठासुद्धां भाकरी मजबूत बांधावी. तीन दिवसांनंतर काढावी. बरें न झालें तर आणखी तीन दिवस पट्टी करावी. हें औषध मिर बुराणोद्दिन यांणीं केलेलें आहे. जखम हडीवर झाली असेल तर मलम लावावें. बाभळीची साल फार बारीक करून ती व पांढराकाथ, संगजिरें, व मुरदाडशिंग, हीं सर्व बारीक करून ती भुकणी त्यावर चार पांच वेळ लावावी. अनुभव आहे.

तिसरा इलाज—उंटाची फासोळी विस्तवावर गरम करून त्यांणीं हडीवर दिवसांतून दोन वेळ शेकावें. कांहीं दिवसांनीं बरें होईल.

चौथा इलाज.—उंटाचे केंसांचा नमदा मनुष्याचे मुत्रांत भिजवून त्यावर बांधावा. तीन दिवस बांधल्यावर मूत वरचेवर त्यावर शिंपडीत जावें. हेंही चांगलें आहे.

हाडावरचे केंस काढावे. शेंदेलोण, बच, व लसूण या सर्वांस लिंबाचे रसांत बारीक करावें. व त्याचा बेरहडीवर लेप करावा. एरंडीचीं पानें आणून शेकून त्याजवर तीन दिवसपर्यंत बांधावीं. अनुभव आहे.

खारीक व कोडखार बारीक करून ठेवावें. खारीक कपड्यानें क-

पडबंद करून ती बाभळीचे कोळशांत भाजावी. दोन तास ठेवून नंतर बारीक चिरून त्यांत कांडेखार घालावा. तें बारीक करून तीन दिवस बेरहडीवर बांधावें. रोज नवा नवा बांधावा. अनुभव आहे.

कळीचा चुना एक पैसाभार, व पापडखार अर्धा पैसेभार, दोन्ही एकत्र करून गोळी करावी. हडीवरचे केंस काढून गोळी कपड्यांत घालून हडीवर बांधावी. त्यावर राहून राहून पाणी टाकीत जावें. अनुभव आहे. खारीक सर्वरात्र पाण्यांत ठेवावी. नंतर काढून विस्तवावर गरम करावी. नंतर काढून ती गरम असतांनाच बारीक करून हडीवरचें केंस काढून बांधावी. तीन दिवस तीन पट्या कराव्या.

भांग तीन मासे, उडदाचें पीठ दोन दोन टांक, त्याची भाकरी करावी. त्याचा एक भाग गरम करून हडीवर बांधावा.

दुसरा इलाज—हरएक प्रकारचे बेरहडीवर इलाज, शिंगरुफ, जंगला, कपिला, रुईचा चीक, व शेराच्या पिंवळ्या कांड्या एकत्र करून लेप करावा.

इलाज ३ रा.—हडीवरचे केंस काढावे. त्यावर शेराचा चीक लावावा व कांहीं रुईचा चीक व कांहीं खडीसाखर हें सर्व एकत्र करून हडीवर लेप करावा. बोटानीं चोळावें, नंतर लेप करावा. उंटाचें हाड आणून बेरहडी येवढें कांपून त्यावर दूध व खडीसाखर घालून गरम करून बेरहडीवर बांधावें. तीन तासांनंतर सोडावें. बरी झाली तर बरें; नाहीं तर एक दिवसपर्यंत ठेवावें. हा अनुभव आहे. महंमद सौदागर विलायती याचे बुकांतला हा अनुभविक उपाय आहे.

नेवरपाय किंवा हस्तेकाम.

एक पाय दुसरे पायावर घांसतो, त्यापासून चालते वेळेस जखम होते.

त्यावर इलाज.—मलम करूं नये. बेरहडीप्रमाणेंच त्या जागेवर मांस वाढतें त्यावर बेरहडीप्रमाणें करावें.

हाडावरचें मांस वाढतें तें हाताचे कलाव्याचे जागीं. त्यावर इलाज.—बेरहडीवरचा करावा व याप्रमाणें ० ० ० डाग द्यावा. या रोगास शालिहोत्री गावछग्या ह्मणतात.

दुसरा प्रकार अरज.—घोड्याचे हाताचे व पायाचे सांधीवर फोड गरमीमुळें होतात. त्यांतून रक्त पिवळें वाहतें व फोडावरचे कातड्याचा रंग काळ्या मातीप्रमाणें काळा असतो. शालिहोत्री लोक यास इसब असें ह्मणतात, त्यास उपाय.-प्रथम त्या फोडास चिरून त्यास गरम पाण्यानें धुवावें. नंतर मुरदाडसिंग व गूळ मिश्र करून त्यांत शिरका घालून तीन हिस्से मलम करून लावावें.

दुसरा इलाज.—मुरदाडशिंग कुटून बारीक करावें. व तें दुधांत खमिर करून नंतर कपड्यास लावून त्याची पट्टी ईसबावर बांधावें.

आणखी इलाज.—गेरू व माजूफळ हीं दोन्ही बराबर घेऊन शिरक्यांत खमिर करून तें ईसबावर बांधावें.

काळे भिळावे बारीक करून त्याचें तेल इसबावर लावावें.

घोड्याचे समोरचे किंवा मागले पाय मुरगळतात. त्यापासून तो लंगडतो त्यास इलाज.—

एरंड्यांचें तेल, अंबेहळद, मैदालकडी, व मीठ. प्रथम ते पाय तेलानें चोळून काढावे. नंतर हीं औषधें बारीक करून कपड्यांत घालून त्याची पट्टी दोरीनें मजबूत बांधावी.

दुसरा इ.—कांहीं अंबेहळद, कांहीं मीठ व वांगीं. प्रथम वांगीं भाजून तीं कपड्यांत घालावीं. नंतर हळद व मीठ हें बारीक करून त्या वांग्यावर घालावें. तीन किंवा चार दिवस अनुक्रमें हा इलाज करावा. परंतु ती पट्टी गरम गरम बांधावी. अगदीं अनुभव आहे.

तिसरा इ.—भाजली मैदालकडी दोन पैसेभार, गेरू छटाक, व लसूण

छटाक हीं तिन्ही लिंबाचे रसांत खलावीं. जेथें घोड्यास दुःख झालें असेल तेथें लेप करावा व जरा शेकावें. चवथे दिवशीं गरम पाण्यानें धुवावें. अनुभविक आहे.

चवथा इलाज—चिंचेचीं पानें एकशेर, तरवडाचीं पानें एकशेर, व कांहीं मीठ हीं तिन्हीं शिजवून ज्या पायानें घोडा लंगडत असेल त्या ठिकाणीं तीन दिवस बांधावीं.

पांचवा इलाज—कांहीं शिरस व कांहीं एरंडेल व कांहीं शेंदेलोण, अंबेहळद एक पैसाभार, मैदालकडी तितकीच, ह्या सर्वांस बारीक करून शिजवून गरम गरम कपड्यावर घालून लेप करावा. व शेंकावें आणि जर घोड्याचें हाड तुटलें असेल तर ती पट्टी जोरानें बांधावी.

इलाज सहावा.—माहाळुंगाचीं पानें दोन मोठीं घेऊन हळद एक पैसाभार, व कांहीं शेंदेलोण ह्या तिन्हींस मनुष्याचे मुतांत गरम करावें. पहिल्यानें शेकावें व मग बांधावें.

सातवा इलाज.—राई बारीक कुटून त्यांत शिरका घालावा व थोडें पाणी घालून जेथें इजा झाली असेल तेथें मालिस (चोळणें) करावें. मग त्याचा लेप करावा.

घोडयास कोठेंही दर्द झाली असेल ह्मणजे काठी मारल्यामुळें किंवा पायास अथवा सर्व शरीरास इजा होते त्यास चोपड ह्मणतात, त्यास इलाज.—

मेंढीचें दूध शेरभर, एक भोपळा,—जेवढा मोठा तेवढा चांगला, जर मोठा न मिळेल तर लहान लहान दोन,—त्यांतील सर्व बिया भोंपळा न फोडतां फक्त डेंख कांपून काढून टाकाव्या, व बेलफळासारखें पोंखरून तयार करावें. नंतर जो मगज बिया खेरीज निघाला तो सर्व व दूध एकत्र करावें. मग तें त्या भोपळ्यांत घालून त्याचे तोंडास गव्हाचें पीठ लावावें, किंवा चिकणमातीचा लेप करावा. नंतर तो भोपळा घोड्याचे लिदींत सात दिवस पुरून

टेवावा. घोड्यास अगोदर जो लेप बांधला असेल तो काढून टाकून नंतर शेंदेलोण सहा पैसेभार व हाळद भाजून दोन्हीं बारीक करावीं. नंतर त्या भोपळ्यांतील दुधापैकीं तिसरा हिस्सा घेऊन त्या दुधांत शेंदेलोण व हाळद चारपैसेभार घालावी. नंतर याचप्रमाणें तीन दिवस, चोपड, व दर्द किंवा दरदेचे फोड ह्या दोन्ही रोगांवर लाऊन मग दोनप्रहरीं उन्हांत बांधावें. नंतर घोड्यास ऊन पाण्यानें धुवून टाकावें.

घोडा मुरगळतो त्यावर उपचार —बकरीच्या लेंड्या आणून मग या एके भांड्यांत घालून शिजवाव्या. त्या अशा कीं, सर्व मूत्र आटून जाईल. नंतर उतरून त्या लेंड्या एके कपड्यावर टाकाव्या. नंतर जेथें दर्द किंवा फोड ि वा मुरगळलेली जागा असेल त्या ठिकाणीं बांधव्यों व दोरीनें अवळावें, याप्रमाणें चार दिवस किंवा पांच दिवस करावें.

लक्या ह्मणजे मांसाचा तुकडा लिंबासारखा होतो. तो बहुत करून घोड्याचे मुंबाचे तोंडाचे किनाऱ्यावर होतो. कधीं कधीं दोन्ही किनाऱ्यांवर होतो. त्यापासून घोड्यास दर्द होते. व तेथील मास कढिण होते. त्यावर इलाज.

त्या मांसास शेकून नरम करावें. नंतर त्यामधील पू काढून टाकून सांगितलेले मलमापैकीं एक मलम लावावें. किंवा त्या मांसावर बिसरबिंदा बांधावा, ह्मणजे तो मऊ होतो, किंवा हें मलम करावें. डुकराची चरबी घेऊन साफ करावी. आणि तितकेंच जैतुनाचें तेल घालावें. व मुरदाडशिंग आणि फटकी हीं दोन्हीं समभाग घेऊन छानून कुटावी. व डुकराचे चर्बीत घालून खजुराचे लांकडानें ढवळून शिजवावें. व त्यावर लावावें.

तिसरें मलम.—मुरदाडशिंग, सनोबराचें झाडाचा गोंद, व हीं समभाग घेऊन व जावशिर सात टांक, मरमुकी, व जंगला चवथा हिस्सा

घेऊन कुटावें, व छानून त्यास जैतुनाचे तेलांत घालून खलून लावावें.

इलाज.—मेथी, आळसी, (जवस)व मुरदाडशिंग हीं तिन्हीं बारीक करून शिजवावीं. वरचेवर हालवावें. तयार झाल्यावर लावावें.

इलाज.—तरसाची व घोरपडीची जीभ व त्यांच्या नाकाचें हाड व कुलिंजन, नरगिरी, सोहागी, तिळाचें तेल, व भडकतेल, तयार करून नागवेलीचे पानावर चिकटवून दररोज ४।६ दिवस बांधावें. अनुभविक आहे.

घोड्याचे सुंबाजवळ फोड येतात व त्यांतून पू, रक्त व पिंवळें पाणि वाहूं लागतें. अगोदर त्यास कांपून सर्व पू वगैरे काढून टाकावा व त्याजवर कंगव्यासारखा डाग द्यावा. मग त्याजवर जवखार, व सज्जिखार, हीं दोन्हीं बरोबर घेऊन त्यांत चिंच मिळवून त्याचा लेप करावा, व त्याचेवर अंबरवेल–सेराचे झाडावर तिचा वेल असतो ती–आणून गरम करून बांधावी. अनुभविक आहे.

इलाज २रा—दगडी मीठ अर्धाटांक, अजवान तीन टांक, लसूण सुकलेला अर्धा टांक, अद्रक (आलें) अर्धा टांक वावडिंग अर्धाटांक, व गूळ बारा टांक, हें सर्व एकत्र करून खाण्यास सात दिवस पर्यंत द्यावें. अनुभविक आहे.

इलाज३रा—वर लिहिल्याप्रमाणें डाग देऊन त्याजवर लेप करावा; तो येणेंप्रमाणें–राई एक तोळा, सवागी एक तोळा, व लसूण तोळा१, हीं सर्व एकत्र करून बारीक करावीं. व नरम करून त्यावर लेप करावा.

दुसरा प्रकार.—कुतुब्बा किंवा गिर्दपाषण ह्मणजे सुंभाजवळ फोड होतात,त्यांतून पू वाहातो.ते फोड चिरलेले असतात.त्यावर लेप करावा.

बकरीची चर्बी घेऊन नुस्ती किंवा शिरक्यांत लावावी. अरणा ह्या औषधांत शिरका घालून लावावें. वस्तऱ्यानें केंस काढून मुरदाडशिंग दर्दावर भरावें. किंवा हळद, व मुरदाडशिंग हीं दोन्ही बारीक करून लाल मेणांत घालून पातळ करून लावावीं.

चक्रावळ ह्मणून सुंभाजवळ होतें. हें फार वाईट दर्द आहे, इलाज चालत नाहीं. परंतु कांहीं औषध करितात. ते फोड वस्तऱ्यानें चिरून पू वगैरे काढून गरम पाण्यानें धुऊन खाण्याचें मीठ, व मोहाचे झाडाची साल या दोन्हींत मनुष्याचें किंवा बकरीचें मूत्र घालून शिजवावें. शिजल्यावर बांधावें.

दुसरा इलाज.—भिळाव्यांचें तेळ त्याजवर लावावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—सुंभावर किंवा हातापायांवर फोड झाले तर गुडद्याप्रमाणें सुकलेले मोठे फोड होतात, त्यास.—चित्रक तीन टांक, पांढरा गूळ दोन टांक, सज्जिखार दोन टांक, नवसागर एक टांक,व जेपाळ आठ टांक, हीं सर्व निरनिराळीं कुटून बारीक करावीं. व दोन तास तसेंच राहूं द्यावें. नंतर तिळाचें तेल घेऊन दहा भिलावे दोन दोन तुकडे करून शिजवावे. आणि थंड झाल्यावर मग कांव्या शेंदूर एक टांक बारीक करून त्या तिळाचे तेलांत घालावा. पहिल्यानें भिलावा घालावा व मग दुसऱ्या जिनसा घालाव्या. तीन दिवस नुस्तें ठेवून चक्रावळीवरील केंस काढून सदहू औषध वर लावावें व विस्तवानें शेकावें. तीन दिवस असें करावें. फार अनुभव आहे.

चौथा इलाज.—गोणपाटाचा तुकडा घेऊन मनुष्याचे मूत्रांत भिजवून त्यावर बांधावा. वरचेवर नरमूत्र त्यावर तीन दिवसपर्यंत शिंपडावें. सज्जिखार एक टांक व जंगला एक टांक, हे दोन्हीं लिंबाचे रसांत भिजवून त्याचा लेप करावा. त्यावर पळसाचीं पानें बांधावीं.

पांचवा इलाज.—तेल्यासुवागी भाजलेली एक टांक, व निंबाचीं पानें किंवा विड्याचीं पानें यांत ती सुवागी दररोज एक टांक खाण्यास द्यावी.

सहावा इलाज.—पांढऱ्या कण्हेरीचे झाडाच्या मुळ्या, त्यावर मनुष्याची सावली न पडतां काढाव्या. त्या मुळ्यांवरची साल घेऊन

ती सावलींत सुकवावी. नंतर बारीक करून तिळाचे तेलांत खलून चक्रावळीवर तीन दिवस बांधावी. तीन दिवसांत बरें झालें तर ठीक, नाहीं तर पुन्हां तेंच औषध लावावें. अनुभविक आहे.

पुढील पायास चक्रावळ होतें त्यावर उपाय.—प्रथम फोडास वस्तऱ्यानें कांपावें व त्यांतून पू वगैरे काढून टाकावा. तीन जेपाळाच्या बिया, व तिळाचें तेल एकत्र करून जखमेवर लावावें. नंतर फटकीची पूड त्यावर तीन दिवसपर्यंत बांधावी. व त्यावर विड्याचीं पानें तीन दिवस बांधावीं. चवथे दिवशीं काढून एक पैसाभार राळ, जंगला तीन मासे, व तिळाचें तेल दोन पैसेभार. राळ व जंगला बारीक करून तिळाचे तेलांत कढवावा. नंतर थंड पाण्यांत दोन वेळ धुऊन रुई व शेराचा चीक घालून हें मलम दर्दावर ऊन करून सात दिवस लावावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—जंगला दीड मासा, फटकी तीन मासे, सुवागी दीड मासा भाजलेली, व गुग्गुळतीन मासे, हीं सर्व लिंबाचे रसांत खलून शिजवावीं. आणि लेप करावा, व विस्तवानें शेक करावा. किंवा विड्याचीं पानें बांधावीं. फार अनुभव आहे.

तिसरा इलाज.—चक्रावळ फार दिवसाची असेल तर डाग द्यावा. नंतर छिनून काढावें व त्यावर साबूण चोळावा. अनुभव आहे.

चोथा इलाज.—चक्रावळ छिणावी (कांपावी) नंतर कोरफड व खाण्याचें मीठ बारीक करून दोन्ही गरम गरम फोडावर बांधावें. तीन दिवसांनीं सोडावें. बरें झालें तर ठिक; नाहीं तर पुन्हां तसेंच करावें. त्यांणींही बरें न झालें तर डाग द्यावा.

तिसरा प्रकार.—गल्ला, हा सुंभाचे आंत मासाचा मोड येतो. त्यापासून घाण येते, त्याला धुवावें, त्यांतून पू वगैरे काढावा. मग कण्हेरीची पानें, राई, लसूण, केशर, हीं सर्व बराबर घेऊन

बकऱ्याचे चर्बीत मिळवून वर बांधावें. भोकें पडतात त्यास जैतून तेल व अस्कंद लावावें.

सुंभाचे आंत पुतळीचेवर छिद्र पडतें, त्यांतून पू रक्त निघून घाण येते व पिवळें पाणी निघतें, त्यावर सज्जिखार भाजलेला, फटकी भाजलेली, जंगला भाजलेला, चुना ताजा कळीचा कोरडा, गुडगुडीचा मैल, भिलावे भाजलेले दहा, काथ पांढरा सफेत, काळेंजिरें, सुपारी, मुरदाडशिंग, शेंदूर, डिकेमाली, हीं सर्व बारीक करून एकत्र करावीं. त्यांत कांहीं राळ व मेण घालून त्याचा गोळा करून छिद्रांत भरावा. त्यावर गोणताट मजबूत बांधावें. कांहीं दिवसांनीं बरें होईल. हें ईमाम सौदागर याणें केलें असे.

इलाज.—रक्त काढावें, व सुंभ कापावे. नंतर जंगला अर्धटांक व अर्धटांक हरताळ दोन्ही बारीक करून एकत्र करावें. आणि सुंभावर ह्मणजे सुंभाचे बाहुलीवर लावावें. व बकरीचा चमडा बांधावा. दोन हत्प्यांत बरें होईल. पुराणी असेल तर एक महिनाभर करावें.

दुसरा इलाज—ऊद एक तोळा, शेंदूर तोळा, लसूण अतपाव, भिलावे सात, राळ तोळा, मुरदाडशिंग तोळा, मुसंबीर तोळा, मेण तोळा एक हें बारीक करून तिळाचें तेलांत कढवावें. गोबर लावून सुंभास छेदून गरम तेल घालावें. दवा बांधावी. गरम करून त्यावर चर्बी ठेवून मजबूत बांधावें. दोन तीन हप्ते ह्याप्रमाणें करावें. अनुभव असे.

आणखी इलाज—नालबंदाकडून छाला कांपावा. नंतर रक्त निघाल्यावर धुऊन साफ करावें. मग राळ, मेण, लाख, शेंदूर, व तेल तिळाचें एकत्र करून कांपलेल्या छाल्यावर लावून गरम विटेनें शेकावें.

आणखी इलाज—सुंभ नालबंदाकडून कापावें. रक्त वगैरे काढावें.

जंगला बारीक करून भरावा. त्यावर राळ घालून लिंबाचा रस सोडीत जावा. दोन तीन दिवस असें करावें. अनुभविक आहे.

तिसरा इलाज—नालबंदाकडून कापावें. नंतर जंगला बारीक लिंबाचे रसांत मिळवून त्यावर लावावा. तीन दिवसांनीं सोडावें. नंतर पांढरा काथ, बोळ, चुना कळ्या, शेंदूर, राळ, मेण, तेल, व भिलावे. तेल व भिलावे गरम करून त्यावर दोन तीन वेळ शेक करावा. नंतर काथवगैरे साहा जिनसांचे बारीक करून सर्व एकत्र करून छाल्यावर चिकटवावें, त्यावर सात दिवसपर्यंत कातडें बांधावें. अनुभव आहे.

चौथा इलाज—छाला नालबंदाकडून कांपवावा. तेल व भिलावे गरम करून शेकावे. दोन मासे जंगला बारीक करून लिंबाचे रसांत गोळी करावी व फोडावर चिकटवावी. एक मूठभर चिंच व एक मूठभर भिलावे बारिक करून छाल्यावर एक दोन रोज बांधावें. बरें न झालें तर नऊ दिवस याप्रमाणें करावें. अनुभव आहे.

पांचवा इलाज—छाला नाळबंदाकडून कापवावा. मणे तोळा, चर्बी तोळा, जंगला तोळा, अहक तोळा सुकलेला, शेंदूर तोळा, भिलावे मूठभर, बोळ तोळा, गुळाचे व लिंबाचे रसांत मिळवून लोहाचे भांड्यांत शिजवून दर्दीवर चिकटवावें. त्यावर चर्बीही बांधावी. तीन दिवस.

छाला होण्याचें कारण.—जास्त खाल्यानें अर्जीण होतें. त्यामुळें छाला पुढील व मागील पायास होतात. जास्त खाण्यास देऊं नये. रतीब दिला तर मसालाही पाहिजे. असें होऊन छाला झाला तर ० ० ० ० असे डाग द्यावे. एक महिन्यापुढें आणीक तसेच डाग द्यावे.

सहावा इलाज.—भिलावे २० वीस, चर्बी बकरीची ४ तोळे, मेण चार ४ तोळे, कांब्या शेंदूर चार तोळे, जंगला भाजलेला तोळे २ दोन, व तिळाचें तेल छटाक, सर्व बारीक करून तेलांत घालून कढवावें. छाल्यावर तें मलम गरम गरम चार वेळ सात दिवस लावावें. तेलानें

शेकावें, बाकी जिन्नस त्यावर ह्मणजे चवड्यावर बांधावें.तीन दिवसांनीं सोडावें. बरें न होईल तर पुन्हा असेंच सात दिवस करावें.

पांचवा प्रकार. सुंभावर जखम होते. ती नालबंदाचे चुकीनें खिळे मारतांना होते, रक्त निघतें. त्यांत पाणी जाऊंनये, पाणी गेलें तर दुसरी बेमारी होईल. मेख तुटली असेल तर काढावी. राहिली तर जखम होईल. न काढली तर सुंभ खराब होतील. खिळा काढण्यास तेल सोडावें.जैतुनाचेंतेल,कतरानव फटकी बारीक करून दर्दावर भरावें व बांधावें. ज्या घोड्यास नालाची सवय नाहीं त्यास दर्द झालें तर सुंभ गरम पाण्यानें धुवावा.

षकाक, ह्मणजे सुंभे फाटतात. मातींत सुंभ फार भिजल्यानें व त्यावर माती वगैरे राहिल्यानें, किंवा शेणांत वगैरे भरल्यानें आणि भरलेले असतां तसेच फिरविल्यानें सुंभ सुकून फुटतात, त्याजवर इलाज.—

प्रथम ऊन पाण्यानें सुंभ धुवावे. नंतर लेप करावा. बकरीचे चर्बीनें चोळावें. किंवा शिरका लावावा. चक्रावळीपैकीं कोणतें तरी मलम लावावें.

दुसरा इलाज.—चंद्राकार सुंभासभोंवतीं डाग द्यावे. गुण येईल.

सुंभास नऊ प्रकारचे रोग होतात त्यांचीं नांवें:—

१ ताबक, २ अजज, ३ गछा, ४ वकरा, ५ तंशिशा, ६ दगड लागून होतोतो, ७ मेख लागून किंवा हाडास इजा होते, ८ सुंभ तंग होतात, आणि ९ फार चालण्यानें पाय मोडणें.

प्रकार पहिला.–सुंभाचे किनाऱ्यावर पांढरे फोड येतात. ते लांबट व फुटलेले असतात, त्यांतून पिवळें पाणी वाहतें. हा रोग रानांत गवत चरतांना होतो. लहान डाग पिसाबाचे जाग्याजवळ द्यावा. नतर फोडांतील पाणी काढावें. डागाचे जागेवर बकरीची चर्बी ला-

वावी. फटकी, व माजूफळ हीं दोन्ही उगाळून लावितात व जैतूनचें तेलही कोणी लावितात.

चवथा प्रकार—सुंभास फोड होतात. त्यास कुरण बोलतात. हें दर्द पुतळीस होतें. त्यांतून पिवळें पाणी गळतें. तें धुवावें. मग जैतून तेल गरम करून, जर फोड फार पिंवळे नसले तर लेप करावा. गाईचें तूप व गव्हांचा भुसा गरम करून लावावा. नमदा (बुरणूस) किंवा कातड्यानें बांधावा. लंगडतांना राहिल्यावर नाल करावें.

इलाज २ रा.—सुंभाजवळ लिंबायेवढे येतात. ते फोड छाल्याप्रमाणें असून ती बिमारी कठिण आहे. त्यावर—हिरडा व अंबेहळद, दोन्ही भाजून सज्जीखार बारीक करून वस्त्र गाळ करावें. वस्तऱ्यानें कापून लिंबाचे रसांत किंवा तुपांत किंवा, लोण्यांत मिळवून हें सर्व तीन दिवस बसवावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—छाला कांपून त्यांतून रक्त निघालें पाहिजे. नंतर पांच मिळावे, राळ तोळा एक, कांब्या शेंदूर एक तोळा, लसूण एक तोळा, आतपाव ऊद, मुरदाडशिंग एक तोळा, मेण एक तोळा, बच दोन किंवा एक तोळा, राई एक पैसाभार, असें शिजवावें. हिंगणीचे मुळीची साल एक तोळा शिजवावी. हें सर्व बारीक करून तिळाचे तेलांत गरम करून लावावें. शेणानीं बंद करावें. असें कीं, तेल जाणार नाहीं. नंतर तेल लावावें. थोडी चर्बी लावावी. दोरीनें तीन दिवसपर्यंत खूप बांधावें. नंतर उघडून पहावें. बरें न झालें तर पुन्हां सात दिवसपर्यंत तसेंच करावें. नंतर उघडावें. बरें झालें ह्मणजे नाल करावें. कांहीं दर्द राहिल्यास तेंच पुन्हां करावें.

मुरदाडशिंग व गूळ मिश्र करून त्यांत शिरका घालून तिन्हींचें मलम करून लावावें.

इलाज ४ था.—मुरदाडशिंग कुटून बारीक करावें. व ताजे दुधांत खमिर करावें. नंतर तें कपड्यास लावून त्याची पट्टी इसबास बांधावी.

पांचवा इलाज.—गेरू व माजेफळ, पैकीं गेरूबरोबर घेऊन व शिरक्यामध्यें खमिर करून तें इसबावर बांधावें.

काळे भिळावे घेऊन ते बारीक करून त्याचें तेल काढून तें इसबावर लावावें.

घोडयाचे समोरचे पाय किंवा मागले पाय मुरगळतात त्यापासून तो लंगडतो त्यास इलाज.—

एरंडाचें तेल, अंबेहळद,मैदालकडी, व मीठ. प्रथम ते पाय तेलानें चोळून काढावे. नंतर हीं औषधें बारीक करून कापडांत घालून त्याची पट्टी दोरीनें मजबूत बांधावी.

इलाज दुसरा.—कांहीं अंबेहळद, कांहीं मीठ व वांगीं. प्रथम वांगीं भाजून तीं कपडयांत घालावीं. नंतर हळद व मीठ बारीक करून त्या वांग्यांवर टाकावें व तीन चार दिवस बांधावें. हा इलाज करावा; परंतु ती पट्टी गरम बांधावी. अनुभविक आहे.

पायाचे रोग.

पायाचे टांचेस दुःख झालें तर.—सुपरअशिटेड आफ लेड एक ड्राम, व चर्बी एक औंसमिळवून एकंदर पायास लावावें.

नैट्रेड आफ् सिलव्हर अर्धा ड्राम, गोलार्डचा अर्क एक ड्राम,व चर्बी एक औंस मिळवून लावावें. सुंभांत मळ वगैरे असेल तो काढावा.

इलाज.—हिराकस, भिलावे, व करंज्याचें बीं, एक शेर घेऊन त्यांत मध व कायफळ मिळवून लावावें.

घोड्याचे सुंभ घांसून जातात.व नाल बरावर बसत नाहींत. त्यावर इलाज. मध व गूळ एकत्र करून सुंभावर लावावा. शेक द्यावा .ह्याप्रमाणें तीन दिवस करावें.

बिगर नालाचा घोडा मुशाफरी करून जर लंगडूं लागला तर त्यावर इलाज.—तवा गरम अंगाराप्रमाणें करावा. त्यावर रुईचीं

चार पानें कुटून बारीक करून घालावीं. त्यावर थोडें मीठ घालून त्यावर घोड्याचे पाय ठेवावे. हें डागाप्रमाणें आहे. एक वेळ केल्यानें बरें न झाल्यास दोन तीन वेळ करावें. अनुभव आहे.

घोड्यास नारू फार मजल केल्यापासून होतात, दुसरा प्रकार मांदगी, तिसरा प्रकार चोपड. पहिले दर्दावर ह्मणजे नारवावर औषधः मानेजवळ किंवा नाका जवळ किंवा दुसरे ठिकाणीं मनुष्यास हातापायावर होतात त्याप्रमाणें झाल्यास घोड्यास फार इजा होते. नारूची परीक्षा करून त्या जागेवर तेल चोळावें ह्मणजे नारू वर येईल. ओढून काढला तर सर्वच वर येणार नाहीं. दररोज थोडेंथोडें तेल लावून काढित जावा. बाकी राहूं देऊं नये. गूळ जुना अठरा टांक व काथ पांढर, अठरा टांक, दोन्ही बारीक करून गुळासुद्धां दोन गोळ्या करून सकाळीं एक व संध्याकाळीं एक ह्याप्रमाणें तीन दिवस द्यावी. अनुभविक आहे.

दुसरा प्रकार ह्मणजे मांदगी, चाळीस पन्नास कोस चालत आल्यानें थकला तर सांधे दुखून बेमार होतो. त्यास मसाला द्यावा तो येणेप्रमाणें; अंबेहळद अतपाव किंवा पावशेर, साबूण, गूळ जुना अर्धाशेर, लोटणखार पावशेर, सज्जिखार पावशेर, तेलिया सुवागी भाजली, अतपाव, गुग्गूळ पावशेर, गूळ पावशेर, भांग छटाक भाजलेली, सर्व बारीक करून अतपावाची गोळी मोठे घोड्यास द्यावी. लहान घोड्यास रात्रीस छटाक द्यावी. आणि चाकरी मालीस दोन तास करून झुल घालून निजूं द्यावा. घाम निघून मांदगी जाईल.

दुसरा इलाज.—हा अहमदनगरचे नबाब यांणीं केलेला आहे तो मसाला येणेंप्रमाणें. गूळ पुराणा पावशेर, गुग्गूळ छटाक, सुंठ छटाक, सुवागी भाजलेली एक तोळा, अफू एक मासा, हळद खाण्याची अतपाव, हिंग तोळा एक हें सर्व बारीक करून व एकत्र करून सर्व खाण्यास द्यावें. दोन तास मालिस करावें, मांदगी उतरेल व नीट हो-

ऊन दुसरे दिवशीं चालण्यास तयार होईल. ह्या गोळीस सरजीखानी गोळी ह्मणतात. फार अनुभव आहे.

तिसरा मसाला.—गुग्गूळ दोन टांक,सज्जीखार दोन टांक,साबूण दोन टांक, हिंग सहामासे, हाळद दोन टांक, अफू एकमासा, गूळ पावशेर,भाजलेली तेलीयासुवागी दोनटांक,भाजलेली फटकी दोन टांक हें सर्व बारीक करूनमजल झाल्यावररात्रीस सर्व एकदम द्यावें.अनुभव आहे. दुसरें दिवशीं स्वारीस येईल.

घोडा फार थकला तर भांग पैसाभार, गुग्गूळ १ पैसाभार, हळद छटाक, गूळ पावशेर, व शेंदेलोण एक पैसाभार, सर्व बारीक करून गव्हांचे आटच्यांत शिजवून घोड्यास द्यावें,फार अनुभविक आहे.

घोड्याचे पाठीवर पुष्कळ पैसा घालून दुसरे गांवीं पाठविल्यानें मांदगी येते. त्यावर उपचार.

चोक नऊ टांक, काळें जिरें नऊ टांक, इसबन जाळण्याची नऊ टांक, वावडिंग नऊ टांक, व बच ९ टांक, जनावराचे तुपांत सर्व जिनसा शिजवाव्या व घोड्यास खाण्यास द्याव्या. संभाळूचीं पानें, एरंडाचीं पानें व टाकळी झाडाचीं पानें चार चार पैसेभार व आणखी नऊ टांक चोक बारीक करून वस्त्रगाळ करून तिळांचे तेलांत किंवा मधांत द्यावें. अनुभव आहे.

दुसऱ्या ओझ्यापासून झालेली मांदगी.

गुग्गूळ छटाक, अंबेहाळद छटाक,गूळ पुराणा अतपाव,आहाळीव छटाक, कांदे चार जुने, सुंठ छटाक, तेलीया सुवागी भाजली एक तोळा, भांग दोन पैसेभार, व थोड्या मोहोऱ्या या सर्वांस बारीक करून दारूंत किंवा अल्याचें रसांत किंवा अंगुराचे शिरक्यांत किंवा

गुडगुडीचे पाण्यांत गोळ्या कराव्या व रात्रीस सदहूप्रमाणें एकदम द्याव्या. याप्रमाणें तीन दिवस करावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज. मसाला.—शेंदेमीठ छटाक, गुग्गूळ छटाक, फटकी छटाक, व गेरू अतपाव, यांची आल्याचे किंवा कांद्याचे रसांत किंवा मधांत गोळी करून रात्रीस द्यावी. अनुभव आहे. फार मजल केल्यानें ह्मणजे नेहमीं जाण्यायेण्यानें घोडा रोड झाला तर त्यावर उपचार.—सदहू घोडा एक दोन महिने बिन कामीं ह्मणजे काम न घेतां तबेल्यांत ठेवून दररोज मसाला चाळीस दिवस द्यावा ह्मणजे मांदगी जाऊन हुशार होईल व शक्ति येईल.

आहाळीवाचें बीं एक शेर,हळद एक शेर,तूप एक शेर, गूळ एक शेर व मेथीचें बीं एक शेर, या सर्वांस बारीक करून तुपांत भाजावें, गुळाचा पाक घालून हलव्यासारखा करून चिनी भांड्यांत ठेवावें. दररोज पावशेर सकाळीं देत जावें. रंग चांगला होऊन हुशार होईल व दम फार येईल. अनुभव आहे.

तान्हेला घोडा झाल्यावर पाणी न दिल्यामुळें किंवा दवडून तहान लागल्यानें किंवा भारी ओझ्यानें तहान लागली किंवा वेळचे वेळेस पाणी न दिलें तर उन्हानें रक्त तापतें त्यांत त्याजला थंड पाणी दिलें तर घोड्यास फोड होतात. ते सर्व सांधींचे जागीं होतात. मूत करीत नाहीं व पिसाब बंद होतो. डोळ्यांतून पाणी जातें व घोडा निजतो. त्यास इलाज.—

तेल तिळाचें व अबलुत दोन्ही एके जागीं गरम करावीं, आणि सांध्यावर चोळावें. नंतर गाईचें शेण व एरंडाचीं पानें सुजेवर बांधावीं. दगडी व लाहोरी मीठ, काळें मीठ,प्रत्येक तीन टांक घेऊन सर्व बारीक करून अंबट दह्याबरोबर मिळवून सकाळीं घोड्यास खाण्यास द्यावें.आणखी दोन शेर दहीं व कांहीं मध घोड्यास पाजावा.

चोपड करण्याची ती कमताकत, दुबळा, अजारी झाला तर चोपड

करावी. फार चालण्यानें रोड होतो. व दाणा घास कमीं दिल्यानें केंस वाढतात. चोपड तीन दिवस करावी. मीठ खाण्याचें एक शेर, ज्वारीचें पीठ एक शेर, व साबूण अतपाव, हीं सर्व पाण्यांत शिजवून घोड्याचे सर्व शरीरावर मालिस करावें. व त्याजवर चोपड करावी. दुसरे दिवशीं त्यास सकाळपासून संध्याकाळपर्यंत उन्हांत बांधावें. फक्त तें तीन दिवस करावें. गरम पाण्यानें चवथे दिवशीं धुवावें. जर घोड्यास गर्मी किंवा सर्दी झाली तर त्या वेळेस हें औषध करावें:—

साबूण, अतपाव मिरें काळीं, राई अतपाव, वाव डिंगें अतपाव, शेंदेलोण अतपाव, वाई कमना अतपाव, काळीं जिरें अतपाव, अजवान अतपाव, काळें मीठ अतपाव, हिंग एक तोळा भाजलेला, सुहागी भाजलेली नऊ मासे या सर्वांस बारीक करून बाजरीचे पिठांत मिश्र करून, नंतर चार पैसेभार रोज द्यावें, तें दाणा दिल्यावर द्यावें.

दुसरी चोपड.—बकऱ्याचें रक्त व मीठ त्यांत घालून घोड्यास चोळावें. सज्जिखार व लोटणखार अतपावप्रमाणें घेऊन बारीक करून ऊन रक्त घेऊन त्यांत घालून मालिस करावें. व सर्व अंगास लावावें. क्षार राहील तो त्यावर चिकटवून द्यावा. तीन दिवसपर्यंत तसेंच ठेवावें. नंतर चवथे दिवशीं सकाळीं गुळीचें पाणी गरम करून त्यांणीं मालिस करावें. नंतर ऊन पाण्यानें धुवावें. ह्मणजे चोपडलेलें सर्व निघून जाईल.

काळी मिरची एक बारीक करून पाण्यांत शिजवून घोड्याचे अंगास चोळावी. तें सुकूं द्यावें. नंतर त्याच दिवशीं धुवावें.

खाण्याचें मीठ एक शेर, उडदाचें पीठ पाण्यांत टाकून अर्ध कोमट उतरून चोळून घोड्यास उन्हांत दोन तास बांधून नंतर ऊन पाण्यानें धुवावें.

तांदुळाचें पीठ एक शेर व मीठ खाण्याचें एक शेर, हीं सर्व शि-

जवून सहा शेर पाण्यामध्यें ऊन ऊन अंगास चोपडावें. मग उन्हांत बांधून ठेवावा. याप्रमाणें तीन दिवस करावें. चवथे दिवशीं ऊन पाण्यानें धुवावें. व त्याचे अंगावर कांबळी घालावी. भांड्यांत तें पाणी गरम करून त्यांत घोड्याचे शेपटींचा कांदा बुडवावा. त्यावर हें बांधावें. नंतर मसाला द्यावा तो येणेंप्रमाणें.—

हळद पावशेर, काळीं मिरें पावशेर, गुग्गूळ पावशेर, सुंठ पावशेर, सोहागी छटाक, काळीं मिरें पावशेर, राई पावशेर, अजवान पावशेर, मीठ खाण्याचें पावशेर, बच पावशेर, लसूण पावशेर, लवंगा चार पैसेभार, कायफळ एक तोळा, अळें पावशेर, कांदे चार. हें सर्व बारीक वस्त्रगाळ करून गुळांत बारा गोळ्या कराव्या. एकेक सकाळ संध्याकाळीं याप्रमाणें सहा दिवस द्यावी.

घोड्यांस मीठ फार खाण्यास देतात त्यामुळें घोडे मलूल होतात. आणि लांबवर फिरविल्यानें गर्मी होते. तेव्हां घोड्यास मीठ देतात त्या योगानें घोड्याची छाती जळते. व ताप येतो, त्यावेळीं मीठ देऊं नये. कांहीं लोक खालीं लिहिल्याप्रमाणें मीठ देतात.—

मोठे घोड्यास आठवड्यांत तीन पाव, व लहान नाहीं व मोठा नाहीं त्यास दीडपाव, व लहानास एक पाव देतात. यापेक्षां जास्ती देऊं नये. कोणी अर्धा कच्चा शेर देतात. मिठापासून गर्मी होऊन खोकला होतो व ताहान लागते. तेव्हां घोड्यास तलावांत नेऊन धुवावें. व एक तास पाण्यांत राहूं द्यावा. व तलावांतील माती चिखल अंगास लावावा, व तास झाल्यावर पुन्हां पाण्यानें धुवावा. चिखल लावल्यावर उन्हांत तासभर उभा करावा. नंतर पुन्हां पाण्यांत धुऊन बाहेर आणावा. व मग खाण्यास मसाला द्यावा. साखर एक शेर, अर्ध शेर मध, पावशेर तूप हीं सर्व पावशेर प्रमाणें रोज पाजावी. फार उपयोग आहे. कोंबडीचा शीरवा पाजावा, त्यापासून गर्मी कमी होईल, थंड जागेंत बांधावें. अनुभव आहे.

सहावा प्रकार.—घोड्याचे नाल लहान असतात, हलके असतात, दगडांत घेऊन गेल्यावर नाल निघून जातात, सुंभांतून रक्त निघतें, व बंद होतें, त्याला नथमुतनी ह्मणतात. त्या घोड्यास मोजे घालावे.

गाईचें तूप, व भुसा गव्हांचा, निमे गरम करून नाळावर बांधावा. नंतर सुंभावर जैतूनचें तेल टाकावें. अनुभव आहे.

हड्डी किंवा मेख वगैरे लागली असेल ती काढावी. मुलाजाम ह्मणजे बारीक मेणाचा कपडा घेऊन त्यावर फटकी, व नवसागर हें बारीक करून जैतुनाचे तेलांत गरम करून बांधावें. अनुभव आहे.

आठवा प्रकार.—सुंभ तंग होतात ह्मणजे आंखडतात त्यावर इलाज.—सुंभाचे सभोंवतीं डाग द्यावा. नंतर जखम करून रक्त काढावें. मीठ चोळून चर्बी भरावी. नंतर नाल मारावे. चाळीस दिवसांत बरें होईल.

नववा प्रकार.—यांत तीन प्रकार:—वकरा, ताबक व तंवशिसा यांतून पू वगैरे निघतो तो काढावा. साफ करून जैतूनचें तेल, व सफेद जिरें मिळवून लावून ममदा (बुरणूस) बांधावा. दोन तीन वेळ हा इलाज करावा.

मागील पायांत दर्द होतात त्यास पसतक ह्मणतात.

एक किंवा दोन पायास फोड होतात. ही बिमारी भारी कठिण आहे. त्या योगानें घोडा लंगडतो, त्याजवर उपाय—बकरीचें काळीज किंवा गाईचें काळीज बारीक करून व दोन पैसेभार कोंकणी मीठ बारीक करून काळीजांत मिळवावें. तें कपड्यावर ठेवून मस्तकावर दोरीनें बांधावें. तिसरे दिवशीं काढावें, पुन्हा असें करावें. याप्रमाणें नऊ दिवसांत तीन पट्या कराव्या.

जमालगोटे ३ तीन, जपाळबिया ३ तीन, तिळाचे तेलांत घालून

जखमेवर चोळावें. फटकी त्यावर टाकून तीन दिवसपर्यंत पट्टी बांधावी. पट्टी बांधण्यापूर्वीं विड्याचें पान त्यावर ठेवावें. चवथे दिवशीं ती पट्टी काढून राळ एक पैसाभार व जंगला हीं दोन्ही बारीक करून तिळाचें तेल गरम करून त्यांत दोन्ही जिनसा टाकल्यावर चुलीवरून उतरून घ्यावें. नंतर ती दवा थंड पाण्यांत टाकून दोन वेळा धुवावी. नंतर रुईचा चीक दोनपैसेभार घालून दर्दावर आठ दिवस किंवा सोळा दिवस चोळावें. बरें न झालें तर गोल डाग० ० याप्रमाणें द्यावे. अनुभव आहे.

पाषाणा ह्मणून एक रोग होतो. तो घोड्याचे मांडीवर, गुडघ्यावर, खालीं पोटावर,व पुढील पायांस याप्रमाणें ठिकठिकाणीं चार प्रकारचे रोग होतात. त्यांचीं नांवें:

पहिला नजद, दुसरा नफख, तिसरा मल्ला, व चवथा कमा.

पहिला प्रकार.—टांचेजवळ हाड दिसून येतें. बाहेर आल्यास त्यास बकरी नजद ह्मणतात. व आंत दिसूं लागल्यास नफक ह्मणतात. दोन्ही बाजूंस हाड दिसलें तर जमाली ह्मणतात. या योगानें घोडा फार लंगडतो.हा रोग फार कठिण.बहुतकरून बरा होत नाहीं. घोडा लंगडतो,चालतांना गरम होतो,उभा रहातो.त्यावर डाग द्यावे.

दुसरा प्रकार—वायु उत्पन्न होतो, तो टांचेजवळ होतो. त्यापासून फोड होतात. किंवा त्यावरचें कातडें निघून घोडा लंगडतो. त्यास इलाज—घोड्याचा खुराख कमी करावा. घोड्यास थंड पाण्यांत घेऊन जावें. नंतर त्यास लेप लावावा तोः बोळ, कडूइंद्रावण, शिरका,व कन्हेरीमुळ्याचा लेप करावा. कांहीं लोक शस्त्रांनीं टोंचून लेप लावितात. लेपानें बरें न झाल्यास चक्रासारखा डाग द्यावा.

तिसरा प्रकार.—मल्ला ह्मणजे टांचेजवळ फोड होतात. जोड निराळा होतो. त्यावर वर लिहिलेला लेप करावा. फटकी बांधावी. बरें न झालें तर डाग द्यावा.

चवथा प्रकार.—टांचेजवळ हाड दिसतें. गवत फार खाल्यानें व पाणी फार प्याल्यानें अजीर्ण होतो. किंवा अजीर्ण झाल्यानें होतो. त्यास इलाज.

घोड्यास नदींत किंवा तलावांत पोहण्यास घालावें. शस्त्रांनीं जखम चिरावी. शेलगमाचें पान घेऊन गरम करून मिठाची थैली शलगमाचे गरम पाण्यांत भिजवून शेक द्यावा. व सदर्हू पैकीं लेप करावा.

उरुद्रोणी रोग.

दोन्ही पायांमध्यें सूज येते, ती मंडलाकृति होते. त्यास उपाय—शस्त्रांनीं फोडावें. नंतर सज्जीखार ॰॰॰४, जवखार व ॰॰॰४, लोणाखार ॰॰॰४, हीं घेऊन, आणि चिंचेचे चिंचोके काढून त्याचा रस काढावा. व त्यांत वर सांगितलेल्या जिनसांची पूड करून टाकावी. व सर्व एकत्र करून खापरांत घालून ऊन करावें. आणि घोड्याचे सुजलेले जागीं लेप करावा. नंतर ओंवा ॰॰॰१२, शेपा ॰॰॰१२, वेखंड ॰॰॰९, सुंठ ॰॰॰१२, हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन तुपांत कालवून घोड्यास द्यावे. ३ दिवस किंवा सात दिवस दिलें असतां उपशम होईल.

कोसाई—दोन्ही पायांचेमध्यें मांड्यांखालीं गांठी होतात. त्यास उपाय–प्रथम ह्या गांठीं शस्त्रांनीं फोडाव्या, आणि सेंदेलोण, लसूण, परसून ह्मणजे चिंचेचे चिंचोके काढून त्या वरील चिंचेचा रस काढावा. आणि त्यांत ह्या जिन्नसांची पूड करून टाकावी. आणि खापरांत घालून ऊन करावें. त्याचा गांठीवर लेप करावा. व ओंवा, शेपा, लसूण, सुंठ, वावडिंगें, हे सर्व जिन्नस तुपामध्यें एकत्र करून सात दिवसपर्यंत घोड्याला चारावे.

चाकळ रोग—दोन्ही मांड्यांपैकीं एक मांडी सुजते. किंवा खालीं सूज येते, किंवा पोटाखालीं येते, ती सहाणेप्रमाणें वाटोळी असते. त्या-

स चाकलरोग ह्मणतात. त्यास उपाय—सज्जीखार, जवखार, लोणाखार, सुरसुनबी, हाळद, सुंठ, वेखंड, हीं प्रत्येक पावशेर, आणि सैंधव, मिरें, पिंपळी ही प्रत्येक ९ टांक घेऊन पाण्यांत घालून वाटावी. आणि त्याचा लेप सुजेवर तीन दिवस लावावा. हिरडा, सैंधव, काडेचिराईत, वेखंड, लसूण हीं ९ टांक आणि सुंठ पावशेर, हें एकत्र करून तुपाबरोबर एक सप्तक द्यावें. हा रोग होऊन जर घोडा फार दम टाकील किंवा नाकातोंडांतून पिंवळें पाणी पडेल तर तें असाध्य लक्षण समजावें.

जानीवे.—ह्मणजे, घोड्याचे एका पायावर किंवा दोन पायांवर अगर कधीं कधीं चारी पायांवर मांडीच्या आंत गांठी येतात. आणि त्या योगानें इजा होते. त्यास उपचार—गांठीवरचे केंस काढून वर फांसणी द्यावी. नंतर जयपाळ, सैंधव, नवसागर, व मंजिष्ट हें पाण्यांत वाटून त्यानें मर्दावें. विटा तापवून त्यावर शेक द्यावा. असा क्रम तीन दिवस करावा.

सन्निपातद्वंद्व.

दोन्ही पुढले पाय अगर दोन्ही मागले पाय सुजतात, आणि रक्ताप्रमाणें लाल होतात, पाय रक्तवर्ण झाले असतां तें असाध्य लक्षण समजावें. रक्तवर्ण न झाल्यास त्यास उपचार करावा. सुंठ ४ टांक, पिंपळमूळ ९ टांक, हिरडे ९ टांक, चिराईत ९ टांक, कोष्ट ९ टांक, ओंवा पावशेर, आणि निर्गुडी पावशेर, याप्रमाणें घेऊन चूर्ण करावें. हें चूर्ण गुळाबरोबर अगर तुपाबरोबर द्यावें. आणि वारुळाची माती शेळीचे मुतांत कालवून, खापरांत घालून ऊन करावी, आणि त्यानें पाय शेकावा. असा क्रम तीन दिवस करावा.

घोड्याचें सर्व अंग वारंवार उडतें, आणि मुततो. त्यास उपचार—वावडिंगें तुपांत घालून ऊन करून चांगलीं शिजवावीं व पावशेर शि-

रसाचें तेल, हें न मिळल्यास तिळाचें तेल घेऊन एकत्र करावें. आणि कुशीला लेप करावा. व वीट तापवून त्यावर एरंडाचें पान गुंडाळून त्याणें शेकावें. दररोज घोड्याला उन्हांत बांधावें. व रात्रीं पुन्हा शेकावें. असें चार दिवस करावें. दररोज तिळाचें तेल घोड्याचे अंगास लावावें.

हड्डी.

हडी ह्मणजे दोन्ही पायांस गांठी येतात आणि फुटतात. व त्यांतून पाणी जाऊं लागतें. हडीवरचे केंस काढून वर फांसणी घालावी. मग जयपाळ, व नवसागर, लिंबाच्या रसांत कालवून वर मर्दन करावें. त्यावर निवडुंगाच्या कांड्या तापवून शेक द्यावा. दुसरे दिवशीं हेंच औषध लावून शेणाच्या गोवरीचा शेक द्यावा. (२) ज्या ठिकाणीं गांठ बांधली असेल त्या ठिकाणीं शेराच्या देंठ्या ऊन करून शेक द्यावा. व सैंदेलोण, वेखंड, लसूण, लिंबाच्या रसांत वाटून हडीवर लेप करावा. पुन्हा शेराच्या देठ्या ऊन करून शेक द्यावा. असें ३ दिवस करावें. व ओंवा, वेखंड, लसूण, आणि सैंदेलोण, कांडेचिराईत, हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन, गुळांत कालवून चाटण द्यावें.

रसाचा प्रकार.

घोड्याचे सर्व अंगास एक किंवा दोन गांठी होतात. व त्या फुटून त्यांतून लस वाहूं लागते. त्यास उपचार—मीठ व डांगर आणि शेळीच्या लेंड्या बारीक करून एकत्र करावें व गांठीवर बांधावें. दुसरे दिवशीं सोडूनपुन्हा औषध बांधावें. ४ दिवसांत उपशम होईल.

हाडपंकरस.

दोन्ही पायांस गांठी येऊन फुटतात, त्यांतून लस वाहाते. त्यास

उपचार–सैंधव, लसूण, निर्गुडी, व सेवग्याची साल, सर्व बरोबर घेऊन कुटून पायास चार दिवस बांधावें. वर शेक द्यावा.

तळवे गांठीरस.

घोड्याचे सुंभाचेमध्यें गांठी येतात. तेणेंकरून तो लंगडतो, त्यास उपचार–राळ पावशेर, लाख पावशेर, कांबिया शेंदूर, लोध्र, व मेण, हे नऊ टांक घेऊन एकत्र चूर्ण करावें. हें चूर्ण तिळाचे तेलांत कालवून गांठीवर लेप करावा. वर चिरगूट बांधून त्यावर विटांचा शेक द्यावा. असें तीन दिवस करावें. व तळस्तंभरसावर खालीं सांगितलेलें औषध (चाटण) द्यावें.

तळस्तंभ रस.

खुरा खालच्या बाहुल्या उकलतात, त्यांतून लस वाहाते, किंवा घोड्याचे हाताखालीं छातीवर रेघ असते, तेथून पाणी वाहूं लागतें. त्यास औषध–लोहचूर्ण, हिरडे, व काथ हीं औषधें प्रत्येक नऊ टांक घेऊन चूर्णकरून तिळाचे तेलांत कालवून त्याचा लेप बाहुलीवर करावा, किंवा उरावर करावा. वर विड्याचीं पानें बांधावीं. बाहुलीवर चिरगूट बांधून वर विटाचा शेक द्यावा, असें सात दिवस करावें आणि ओंवा, निर्गुडी, लसूण हीं पावशेर, आणि पिंपळमुळाची साल ९ टांक, हें चूर्ण करून गुळाबरोबर सात दिवस द्यावें. (२) धत्तुऱ्याचा (धोतऱ्याचा) रस दोनशेर व शेळीचें दूध दोनशेर, एकत्रकरून उकरड्यांत सात दिवस पुरून ठेवावें. नंतर वेखंड, कोष्ट, व कांबिया शेंदूर, हीं प्रत्येक पावशेर घेऊन चूर्ण करून तेलांत कढवावें, मग घोड्याचा पाय धुऊन, रक्त निघेपर्यंत खूप घांसावा. पुन्हां धुवावा, आणि त्यावर पहिलें औषध चोळावें, आणि वर हें तेल लावावें आणि चांगलें मर्दन करावें. पाय उघडाच ठेवावा. पाय ओला होऊं देऊं नये.

दोन सप्तकें केलें असतां तळस्तंभरस बरा होईल. (३) कुत्र्याचें शीर व सापाची कांत जाळून ती राख व मीठ एकत्र वाटून पायाचा तळवा घांसून त्यावर लेप करावा. मग शेळीच्या लेंडच्या शेळीच्या मुतांत कालवून त्याचा लेप करावा. वर एरंडाचीं पानें लावून चिरगुटानीं बांधावें, असें सात दिवस केलें असतां तळस्तंभरस दूर होईल. (४) मोरचुदाची बारीक पूड करून टांचेंत भरून वर लिंबाचा रस सोडावा. बरें होईल.

रतिभंगरस.

दोन्ही हातपाय सुजतात, काठीप्रमाणें उभे रहातात, लवत नाहींत व चारी गात्रें सुजतात, त्यास उपचार—दोन्ही पुढचे पाय व मागचे पाय यांच्या शिरांचें रक्त काढावें, व रक्त काढलेल्या ठिकाणीं तरवडाचे मुळीची साल, भुईकोहळा याची पूड एकत्रकरून चोळावें. आणि भुईनिंब, कडूनिंब, जिरें, हिरडे, आणि तरवडाचे मुळीची साल, हीं औषधें समभाग घेऊन एकत्र कुटून कोहळ्याच्या रसांत कालवून त्याचा शिरावर लेप करावा. वर चिरगुटें बांधावीं. असें तीन दिवस करावें. नंतर ओंवा पावशेर, निर्गुडीचे पाल्याची पूड पावशेर, लसूण ९टांक, व सुंठ पावशेर एकत्रकरूनत्यांचें चूर्ण गूळ किंवा तूप यांजबरोबर सात दिवस द्यावें.

मधुपंकरस.

सर्व संधींस गांठी होतात, त्यास उपचार—गांठी शस्त्रानें कांपून त्यावर चिंचेचा पाला, व निलंबीचा पाला, वाटून त्याचा लेप करापा. मग टाकळीचा पाला व गूळ हीं औषधें तुपाबरोबर चार दिवस द्यावीं.

पाणीपंकरस.

चारी पायांस गांठी होतात. त्यास उपचार--गांठी प्रथम शस्त्रानें कांपून त्यांवर सज्जीखार,व जवखार हीं समभाग घेऊन त्यांत चिंचेचें बरबट घालून कालवून ३ दिवस त्याचा गांठीस लेप करावा. आणि ओंवा पावशेर, सुंठ, सैंधव, वावडिंग, हीं प्रत्येक नऊ टांक घेऊन चूर्ण करून गुळाबरोबर पोटांत द्यावें. सात दिवसांत बरा होईल. (२) ओंवा, सैंधव, सुंठ, पिंपळमूळ, व लसूण, हें समभाग घेऊन त्यांत तितकाच गूळ घालून घोड्यास द्यावें. गांठी धुऊन वर लिंबाच्या रसाचा लेप करावा. व सांगितलेले दोन्ही खार लावावे.

गुडघी.

गुडघे सुजतात त्यास उपचार--मोहाचा पाला आणून गुडघ्यावर बांधावा, असें तीन दिवस करून मग नागवेलीचा पाला, पांगाऱ्याची साल, खैरमुळाची साल, डोरली मुळाची साल, व औदुंबराच्या मुळीची साल, हें औषध पाण्यांत वाटून त्याचा गुडघ्यावर लेप करावा; असें तीन दिवस करावें, पिकेल तर शस्त्रानें छेदावें, मग बोरांतील बियांतील मगज काढून शेळीचे मुतांत कालवून गोळा करून सात दिवस पोटांत द्यावा.

गुडघ्यावर चार प्रकारचें दर्द होतें त्यास.

१ खताम, २ गुज ३ असबाबा, आणि ४ लतमला.

खतां ह्मणजे गुडघ्याची, हड्डी कठीण होते, घोडा लंगडत असतो, त्यावर उपाय नाहीं, परंतु डाग द्यावा. तो (≡) या प्रमाणें.

गुज ह्मणजे गुडघ्याचे सभोंवतीचें हाड मोठें होतें, कठिण होत नाहीं, सुजतें, घोडा लंगडतो. त्यालाही डाग द्यावा तो वर लिहिल्याप्रमाणें.

तिसरा असबाब. गुडघ्यास फोड होतात, व त्यांतून पाणी वाहतें. बोरीचें फळ घेऊन बारीक करून शिरक्यांत घालून दबवर लेप द्यावा, घोड्यास थंड पाण्यांत बुडवावें, खाण्याचा खुराख कमी करावा. मांडीजवळच्या शिरांचें रक्त काढावें, आणि बरें न झाल्यास खालीं लिहिल्याप्रमाणें लतमुतलावर जें औषध लिहिलें आहे तें करावें.

लतमुतलयाचा प्रकार.—गुडघ्यावर फोड येतात, ते गर्मी व सर्दीपासून होतात. गुडघ्यावरचे केंस झडून जातात व घोडा लंगडतो, त्याजवर उपचार.

गाईचें तूप जुनें, जैतूनचें तेल, लसूण, आणि एक कबूतरपक्षी याचे खांद्याचें रक्त घ्यावें. सर्व एकेजागीं करून गुडघ्यावर एक एक तासानें लावीत जावें.

मुषममस.—गुडघ्याचे सांधींत मागें फोड होतात. ते कठीण असतात. त्यापासून घोडा लंगडतो, खात नाहीं, उभा रहातो, चालत नाहीं, कदम पुढें टाकीत नाहीं, त्यावर इलाज.—

गाईचें तूप व एरंड्याचें तेल फोडावर चोळावें. व त्यावर नमदा (बुरणूस) बांधावा.

दुसरा इलाज.—राई, इंद्रायणी व मीठ, सारखें घ्यावें. त्याजला गाईचे तुपांत मिळवावें. चकंदरचें पाणी सर्व मिश्रकरून फोडांवर लावावें.

तिसरा इलाज.-दारू पिण्याची जैतूनचे तेलांत कढवावी व त्यांत अक्रोडाचा मगज व इंद्रायणी मीठ घालून फोडावर बांधावें. अनुभव आहे.

जिरें, किरमाणी ओंवा, व मीठ खाण्याचें हे बारीक करून बकरीचे काळजाजवळची चर्बी, गुडदा ह्मणजे काळिजाजवळ असतो तो, व गाईची चर्बी, हीं एकत्र करून बरें होईपर्यंत फोडावर बांधावीं.

दुसरा इलाज.—कांदा, चर्बी गाईची, व मीठ खाण्याचें सर्व बारीक करून फोडांवर बांधावें. फोड नरम झाल्यावर ते फोड कांपावे.

त्यांतील रक्त व पू काढून टाकावा ह्मणजे बरें होईल. त्यांनीं बरें न झालें तर डाग द्यावे. बरसातीसारखा हा प्रकार आहे; सबब बरसातीचा इलाज केला तरीही बरें होईल.

बेल ऊर्फ घोडेस्वारांनीं घोड्यावर बसून त्याचें पाऊल कमी पडल्यापासून बरसातींत त्याचे गुडघ्यावर फोंड येतात. त्यास, कदपस, असें ह्मणतात. त्यावर उपचार.—

एरंडीचें बीं बारीक करून त्यांत गाईचें तूप जुनें मिळवून तें फोडावर चोळावें, आणि त्याजवर नमदा बांधावा.

दुसरा प्रकार.—गुडघ्यावर फोड कठीण होतात. ते पायापासून आरंभ होतो, कित्येक घोडयांस पायापासून आरंभ होऊन सर्व शरीरावर फोड होतात. त्यापासून पिवळें पाणी जातें व लस वाहते. त्यास बेल ह्मणतात. त्यावर उपचार. बाजरी किंवा त्याचें सरमाड घोडयास देऊं नये. संख्या सोमल अर्धामासा, व सवागी अर्धामासा. सवागी भाजावी, दोन्ही ज्वारीचे पिठांत मिळवून भाकरी करून सात दिवस खाण्यास द्यावी. अनुभवशीर आहे.

तळ्यांतील बेडुक्या सात, तीन वर्षांचे गुळांत दररोज एकेक खाण्यास द्यावी ह्मणजे बरें होईल. अनुभव आहे.

बेलरोगावर.

रुईचीं पानें तीन रोज द्यावीं, तीं ताजीं आणून हिरव्या व ओल्या गवतांत खाण्यास द्यावीं. अनुभविक आहे.

रुईचे झाडाचा चीक, तिळाचें तेल दोन पैसेभार आणि कांबिया शेंदूर एक तोळा, सर्व मिळवून फोडावर लावावें.

बेलरोगाचे फोड चिरले जातात त्यावर अर्धापाव तूप गाईचें, व धोत्रा काळा याचें बीं एक पैसाभार शिजवून खल करावा आणि जखमेवर लावावें. अनुभव आहे.

मैदालकडी तीन मासे,जंगला तीन मासे, अंबेहळद तीन मासे,सर्व बारिक करून लिंबाचे रसांत खलून लेप करावा आणि विस्तवानें शेकावें. फार अनुभव आहे.

कळीचा चुना तीन तोळे, जंगला सहा मासे भाजलेला, आणि भाजलेल्या तीन सुपाऱ्या यांचें चूर्ण करून बेलास लिंबांनीं चोळावें, व त्यावर ही दवा लावावी. अनुभव आहे.

टाकणखार तीन टांक व गूळ, एका जागीं करून वस्तऱ्यानें बेल कांपून त्यावर लावावें. अनुभव आहे.

काळा सज्जीखार व शिरका,दोन्ही एकत्र करावे व हिंगणाचे काट्यानें बेलास कांपून वर दवा लावावा. नंतर बचनाग व लसूण घेऊन भाजून बारीक करून जखमेवर लावावें. अनुभव आहे.

बेल्याचे मोठे फोड होतात त्यावर उपचार.—

कुचला तीन टांक, जपाळ व जंगला तीन टांक भाजलेला, संख्या सोमल तीन टांक,तांबड्या गुंजा तीन टांक,व चित्रकाचें बीं तीन टांक, सर्व लिंबाचे रसांत खलावें. फोड हिंगणाचे काट्यानें कांपून वर सदहू मलम लावावें. नंतर त्यावर चित्रकाची बी चिकटवावी. अनुभव आहे.

अबाड्याचें बीं तीन टांक, सुहागी तीन टांक, व प्रत्येक दिवशीं गूळ घेऊन घोड्यास खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

कोष्टकोळिंजन, हळद, अकलकारा, बचनाग, सज्जीखार, जवखार, काळें मीठ, पापडखार, कण्हेरीचे मुळीच्या सालीचा रस, अघाड्याचा रस, व जयपाळ हीं सर्व एकसारखें वजन घेऊन बारीक करून त्यांचा एक हिस्सा तिळाचे तेलांत घालावा, व एक हिस्सा नरमूत्रांत घालून हें सर्व उकळावें,ह्मणजे जमून येईल मात्र तेल जाऊं देऊं नये. सदहू तेल शिशींत भरून ठेवावें व लावीत जावें, विस्तवानें शेकावें. राहिलेलें औषध अतपावप्रमाणें सात दिवस खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

फोड शिगानें फोडावे व त्यावर लिंबाचे फाकेनें रक्त येईपर्यंत चोळावें, त्यावर कळीचा चुना चोळावा, दुसरे दिवशीं त्याचप्रमाणें करावें. याप्रमाणें सात दिवस करावें. अनुभव आहे.

शिजणाचे झाडाची साल दोन पैसेभार व मर्जेसुरख दोन्ही एकत्र करून सकाळीं व संध्याकाळीं खाण्यास द्यावें.

भिलावे सहा शेर, तरवडाचें बीं एकशेर, मालकांगोळी एकशेर, बकाण्यालिंबाचीं पानें एकशेर पक्कीं झालेली, हांड्यांत घालून हांड्याचें तोंड कांपडानें बांधून टाकावें आणि त्याचा अर्क काढावा व दिवसांतून दोन तीन वेळ फोडांवर लावावा.

असखार गाईचे दुधांत तीन किंवा सात दिवस चोळावा व थोडा खाण्यास द्यावा. अनुभव आहे.

कावाचे झाडाच्या सालीचा मगज ४० चाळीस तोळे, प्रत्येक दिवशीं एक तोळा घेऊन विड्याचे ५० पन्नास पानांबरोबर मिळवून खाण्यास चाळीस दिवस द्यावा. त्यावर मसाला खाण्यास द्यावयाचा तोः—काळींमिरें शेरभर, वावडिंगें शेरभर, कुटकी शेरभर, सुंठ शेरभर, गायरून शेरभर, पिंपळमूळ शेरभर, शेंदेलोण शेरभर, सुहागी भाजलेली शेरभर, बोरीचे झाडाचा गोंद शेरभर, अजवान शेरभर, हळद शेरभर, जवखार शेरभर, खुरासनी अजवान शेरभर, पिंपळी शेरभर, गुग्गूळ शेरभर, शेंबल झाडाचीं मुळें पावशेर, शेराची साल शेरभर, व गूळ तीन वर्षांचा जुना दोनशेर, हें सर्व बारीक करून चाळीस गोळ्या कराव्या, पावशेराची एक करावी. मग सकाळीं अल्याचे रसांत द्यावी.

दुसरा इलाज.—भिलावे एकशेर भाजलेले, रुईचे झाडाचीं पानें पक्कीं एकशेर, पांढरे तीळ एकशेर, आणि अजवान एकशेर. भिलाव्याची साल मेणाप्रमाणें होईपर्यंत बारीक करून त्यांतून एक मूठ घेऊन गोळी करीत जावी. सकाळीं व संध्याकाळीं एकेक गोळी

द्यावी. गवत सुखें खाण्यास द्यावें. गरम जागेंत घोडा बांधावा. हवा लागूं देऊं नये. व रुईचे झाडाचे दुधांत लोणी मिळवून फोडांवर लावावें. अनुभव आहे.

लाळमिरची दररोज, दुसरे दिवशीं २ दोनप्रमाणें चढत्या मिरच्या याप्रमाणें चाळिस दिवस द्याव्या. त्याप्रमाणेंच एकेक उतरती करावी. नंतर हरभऱ्या एवढा किंवा मुगाचे दाण्या एवढा हिंग . व एकेक कांदा रोज चाळीस दिवस खाण्यास द्यावा. बेलीचा अजार पाठीकडे किंवा मानेकडे राहिल्यास डाग द्यावा. नंतर फोड शस्त्रानें कांपून त्यांत हिंग भरावा. पट्टी द्यावी. अनुभव आहे.

नागोरी अस्कंद एकशेर, अक्कलकारा कच्चा पावशेर, मिरची काळी ह्मणजे मिरें पावशेर,कुटकी पावशेर, बिब्बे एक शेरभर, अजवान एक पावशेर, अल्याचा रस पावशेर, आणि लिंबाचा रस अतपाव हें सर्व बारीक करून लिंबूं व आल्याचे रसांत मिळवून मग अतपावाची गोळी करावी. रोज सकाळीं घोड्यास द्यावी. तदावि रोगापासून बेला होतो. त्यावर हा उपचार असे. पोटाखालीं हा रोग झाला तर घोड्याचे सुंभ रक्त निघेपर्यंत कापावे.

दुसरा इलाज.—गेरू पावशेर, शेंदेलोण, व रसकापूर दोन किंवा चार, तोळे तिन्ही बारीक करून तीन वर्षांचे जुने गुळांत मिळवून लिंबा एवढ्या गोळ्या कराव्या व सकाळीं एकेक रोज घोड्यास चारावी. गरम पाणी पाजावें. हरभऱ्याची चंदी द्यावी. बाजरीचें सरम देऊंनये व बाजरीही देऊंनये. बेल रोगावर रक्त काढावयाचें त्याची शीर छातीजवळ असते. छातीवरच्या शिरा असतात त्यांपैकीं दोन हातांकडे एक, तंगाकडे एक, तिसरी मानेकडे एक, व चवथी पोटाकडे एक. मानेकडे शिरांचें रक्त काढावें. त्यानंतर दवा द्यावा तो—सज्जीखार, शहाजिरें, व चुना कळीचा, असें

बारीक पिठाप्रमाणें करावें. पाण्यांत शिजवावें. नंतर लिंबाचा रस काढून त्यास चोळावें, त्यावर हें तीन चार रोजऔषध लावावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज—जुनें तेल घेऊन त्यांत भांग घालावी आणि तें तेल फोडावर लावावें. नंतर टाकणखार, नवसागर, व सज्जीखार, सर्व बराबर वजनानें घेऊन कुटून वस्त्रगाळ करून त्यांत पन्नास लिंबांचा रस घालावा आणि फोडांवर लावावें. त्यावर दोन तोळे पारा, कापुसांत ठेवून फोडावर बांधावा. डाग घ्यावयाचा असेल तर संतुळखार व हरभऱ्याचें पीठ व बकऱ्याची चर्बी त्यावर चिकटवावी.

इलाज ३ रा.—राळ अर्धशेर, तिळाचें तेल एक शेर, व हळद चार टांक, एकत्र कढवावें. मग तें तेल गाळून घ्यावें. नंतर लिंबाचा रस आठवा हिस्सा त्यांत घालावा, पुन्हा मिसळण करून तें तेल फोडावर चोळावें. परंतु तेल चोळण्यापूर्वीं ऊन पाण्यानें सकाळीं व संध्याकाळीं जखम धुऊन टाकावी. अनुभव आहे.

गरम हवेपासून फोड होऊन त्यांतून रक्त जातें, किंवा रक्त जमल्यानें फोड मागील पायापासून होतात. फोड लहान असतात तेव्हां पडसें होतें, त्यावर उपचार.—

शस्त्रानें फोड व आंतील दर्द कांपावें. व त्यावर रुईचा चीक घालावा. नंतर अर्धशेर तूप घेऊन त्यांत जंगला नऊ टांक घालून कढवावें. फोडावर तें तूप चोळावें.

चित्रक, सुंठ, हिरडे, बाळहिरडे, भारंगी, पित्तपापडा, भुईरिंगणी सेवग्याचे झाडाची साल, धावडा, कढीलिंबाचीं पानें, सर्व पावशेरप्रमाणें घेऊन बारिक करून एकत्र करावें. त्याचे सात भाग करून दररोज एक हिस्सा घेऊन आठशेर पाणी घेऊन त्यांत मिळवून एक शेर पाणी राहीपर्यंत उकळावें. व तें, सकाळीं पाजावें. बदामाचें तेल नंतर पाजावें. याप्रमाणें सात दिवस

करावें. आणि नंतर फोड चिरून, राई चर्बी, व लवंग हें बारीक करून त्यावर लावावें. व शिवाय लवंगा पावशेर, व माजूम पावशेर, खाण्यास द्यावी.

अनसबाबा.

फोड सर्दीपासून किंवा गरमीपासून होतात. त्यापासून घोडा लंगडत नाहीं. जेव्हां ते मोठे फोड होतात तेव्हां त्यानें अन्न जिरत नाहीं व गवत फार खाल्यापासूनही होतात. ते दोन्ही हातांस किंवा दोन्हीं पायांस होतात. गरमी किंवा सर्दीपासून झाले असतील तर ते एकटव होतील असे दोरीनें किंवा कपड्यानें बांधावे. नंतर त्या जागची शीर चिरावी, त्यांतून रक्त पू वगैरे काढून टाकून वर लिहिलेले तेलांपैकीं पाहिजे तें तेल लावावें. दर्दांत पाणी जाऊं देऊंनये. कांहीं सवदागीर त्यावर डाग देतात. घोडा अर्ध अंग वळतो, अर्ध अंग ताठतो व जांभया देतो. फक्त शेंपूट हालवीत असतां पायावर फोड फार होतात, त्यावर इलाज—अबलूथ व अर्धशेर तिळाचें तेल दोन्हीं एकत्र करून कढवावें, निम्मे गरम करून फोडांवर तीन दिवसपर्यंत चोळावें.

एक शेर दूध व पावशेर हिरव्या मिरच्या, सकाळीं घोडयास खाण्यास द्याव्या.

घोड्यास बादी व सर्दी होऊन खोकला होतो व फोड होतात. अशा रोगावर उपचार—सोहागी भाजली पावशेर, काळीमिरें पावशेर, कुचले पन्नास, नरकचूर पावशेर, अंबेहाळद पावशेर, गजग्याचा मगज पावशेर, चोक पावशेर. मनुष्याचे कवटींत हे सर्व बारीक करून कपड्यानें वस्त्रगाळ करून दररोज दोन तोळे घेऊन तुपांत एक पैसा भार एकत्र करून चारावें. अनुभव आहे.

बच ३० तोळे, चोक ७ तोळे, राई आतपाव भाजलेली, अंबेहाळद ७ तोळे भाजली, कुटकी ७ तोळे भाजली, काळींमिरें तोळे ७ भाजलीं, तेलिया सोहागी भाजकी तोळे ७, कुचला पन्नास, पिंपळगांठ ७ तोळे, पिंपळी ७ तोळे भाजलेली, हिंग तोळा एक भाजलेला, सुंठ भाजलेली ७ तोळे, सज्जीखार भाजलेला तोळे ३१, काळें मीठ तोळे ३१, भिलावे ६०, व गंधक तोळे ७ हें सर्व बारीक करून कुटून गुळांत किंवा शिरक्यांत गोळ्या कराव्या. दर गोळी आतपावाची करावी व सकाळीं एक ह्याप्रमाणें दाणा दिल्यावर द्यावी. बहादूरशहांनीं केलेलें औषध असून अनुभव आहे.

तेलिया सुहागी, सेंदेलोण, व हिंग हें प्रत्येक तोळा घ्यावे. बारीक करून एकत्र करावें. नंतर हिंग टाकून चार तास खलावें. त्याच्यांत पाणी घालून सात किंवा दहा गोळ्या कराव्या. सकाळीं दररोज एक गोळी द्यावी.

शेराच्या डिंगऱ्या दोन पैसेभार भाजून घ्याव्या, लसूण दोन पैसेभार, कायफळ एक पैसाभार. लसूण व शेराच्या डिंगऱ्या कुटाव्या. नंतर कायफळ बारीक करून त्यांत टाकावें. नंतर थोडें पाणी घालून ऊन करावें व फोडावर लेप करावा. चार पांच दिवसांत बरें होईल.

गुग्गुळ ७ तोळे, काळीं मिरें ७ तोळे, अजवान ७ तोळे, व तीन वर्षांचा गूळ ७ तोळे, हीं सर्व बारीक करून एक पैसाभार किंवा अर्ध पैसाभार खाण्यास द्यावीं. अनुभव आहे.

मैदालकडी एक पैसाभार, गव्हांचा भाजला मैदा तीन पैसेभार, सज्जीखार एक पैसाभार भाजला, हळद एक पैसाभार भाजली, व गुग्गूळ एक पैसाभार भाजलेला, सर्व बारीक करून फोडांवर लावावें. पाणी घालून कढवून लेप करावा. त्यावर एरंडाचीं तीन पानें बांधावीं, तीन दिवसांत बरें होईल. अनुभव आहे.

बादीवर इलाज.

रुईचीं पानें एक मूठभर, काळ्या व पांढऱ्या धोत्र्याचीं पानें एकेक मूठभर, पिंवळा धोतरा एक मूठभर, कुसुपित्याचें झाड एक मूठभर पानासुद्धां, तरवड एक मूठभर, करंज मूठभर, वडाचे झाडाचीं पानें एक मूठभर पिकलेलीं, कुचल्याच्या बिया दहा भाजलेल्या, गजग्याचीं पानें एक मूठभर, हिरड्याचीं पानें एक मूठभर, कुटकी अतपाव, चारोळ्या अतपाव, गजगा अतपाव, पळसपापडी अतपाव, व इंद्रजव अतपाव, हें सर्व बारीक करून पावशेराची एकेक गोळी करावी. सकाळीं व संध्याकाळीं घोड्यास एकेक द्यावी.

शेराचे झाडाच्या मुळ्या, व अंबेहळद, दोन्ही बारीक करून एकत्र करून फोडावर बांधावें. दुसरा उपाय. झ्याऊच झाडाचीं पानें व अमरवेल या दोन्ही घेऊन कुटून फोडावर बांधाव्या. अनुभव आहे.

सुया झाडाचें बीं चार पैसेभार, बच चार पैसेभार, राई अतपाव, लाल मिरच्या छटाक, अजवान छटाक, काळीं मिरें अतपाव, हें सर्व बारीक करून पाण्यांत शिजवून, नंतर भिलावे चार व लसूण छटाक, कुचल्याच्या बिया चार, गजगा छटाक, बारीक करून एकत्र करून रात्री दाणा दिल्यावर पावशेरप्रमाणें, तीन दिवस मोठ्यास पावशेरप्रमाणें व धाकट्यास अर्ध पावशेरप्रमाणें खाण्यास द्यावें. अनुभविक आहे.

काळीं जिरें एक मूठभर, गाईचें तीन चार पित्तांत घालावीं, आणि रात्रभर ठेवावीं. सकाळीं एक मूठभर बच घेऊन सर्व एकत्र करून घोड्यास तीन दिवस द्यावीं. अनुभव आहे.

काळीं जिरें एक मूठभर, किंवा जास्ती नरमूत्रांत शिजवावीं. आणि फोडांवर लावावीं, गरम करून शेकावें. व कपडा बांधावा. अनुभव आहे.

अंबेहळद, येलवा (बोळ), कुचले दहा, भिलावे दोन, मैदालकडी थोडी, काळा बोळ, काळीं जिरें एक मूठ, गजगाचा मगज

कांहीं, मैदा गव्हाचा, रक्तबोळ, साबूण, हें सर्व लिंबाचे रसांत खलून ऊन करून फोडावर तीन दिवसपर्यंत लेप करावा. अनुभव आहे.

मागील पायास मोठी नस असते त्यावर फोड होतात, त्यापासून घोडा लंगडतो. त्यास पायी ह्मणतात. त्यास उपचार.—तीनधारी निवडुंग आणून त्याजला छेदन करावा (सोलावा). त्यांत बोळ कांहीं व गुग्गूळ, व हळद हें बारीक करून भरावें. आणि त्या निवडुंगास गव्हांच्या आल्यानें लपेटून तो निवडुंग भाजावा. भाजल्यावर काढून गव्हाची कणीक दूर करून निवडुंग फोडावर तीन दिवस बांधावा, रोज ताजें औषध करावें. अनुभव आहे.

तीळ दोन तोळे, व उंटाची लेंडी दोन तोळे, दोन्ही बारीक करून मग नरमूत्रांत शिजवून फोडांवर दररोज नवें बांधावें. लहान मोठे फोडांस उपचार—शेराचें कोंवळें लांकूड सालीसुद्धां आणावें. त्याजळा कपडमठ करावें, फुफाल्यांत भाजावें, कपडमठ काढल्यावर शेराची साल वेऊन पुन्हा शिजवून फोडांवर तीन दिवसपर्यंत बांधावी. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—पिंपळाचे झाडाची अंतर साल, व मुळसरीची अंतर साल, पिठाप्रमाणें बारीक करून त्यांत नरमुत्र घालून शिजवावें, त्याची पट्टी रोज रोज नवी नवी करून फोडांवर बांधावी.

तिसरा इलाज.—कच्चे हरभरे कडब्याच्या पाल्यावर ठेवून फडक्यानें फोडांवर बांधावे. व त्यावर वरचेवर पाणी शिंपीत जावें. तिसरे दिवशीं पट्टी काढावी आणि नवी लावावी. नऊ दिवसपर्यंत करावें. अनुभव आहे. त्यावर मैदालकडी, अंबेहळद, रक्तबोळ, भिलावे, अजवान, काळीं मिरें, व अमरवेल, हीं सर्व बारीक करून तुपांत शिजवावीं, व त्याचा लेप फोडांवर करावा. अनुभव आहे.

दुसरा उपाय.—तूप, व पांढरें जिरें अर्धवट गरम करून चोळावें, आणि मिठाचें पाणी त्यावर टाकावें.

तिसरा उपाय.—कांहीं फुलें घेऊन त्याजबरोबर गव्हांचें पीठ अशीं खमिर करून पाण्यांत एकत्र करावीं. आणि कातरीनें त्या फोडांवरचे केश कातरून त्यावर लावावें.

मरज सत्ताका.

मरज सत्ताका ह्मणजे घोड्याचे पायाचे बंद एक दुसऱ्यापासून दूर होणें. ही इजा बहुतकरून कठीण ठेंच लागल्यामुळें होते, आणि पायाचा चुरा चुरा होतो, व त्याजवर फोड होतात, आणि लंगडू लागतो. ही इजा फार वाईट आहे. याचा उपाय मागें ह्मणजे गंडमाळेंत लिहिला आहे.

घोड्याचे दोन्हीं पायांस जखम होते. त्याचा रंग पिंवळा असतो. त्याजवर मलम लावावें तें.--

गेरू, शिरका, कडूवृंदावन, व बोर, हीं सर्व घेऊन फोडास फोडून त्यांत डुकराची चर्बी व शिरका व हे वरील जिन्नस यांचें मलम करून तें लावावें.

दुसरा इलाज.-द्राक्षाची दारू, व गुलजार शिजवून त्यांत शिरका टाकून चोळावें.

तिसरा उपाय.—घोड्याचे बंद किंवा हाडें दोन्हीं पायांचीं वाढ-तात, त्यास कांहीं इलाज नाहीं. परंतु त्याजवर डाग देतात ते चौ-कटीचा व ≡ आणि चंद्राकृतिप्रमाणें तकरिज ह्मणजे घोड्याच्या हाताचीं हाडें पुढें येतात, व बाहेरचे बाजूस किंवा आंतले बाजूस टांचेस त्यांचें दुःख होऊन त्यामुळें घोडा लंगडतो त्याजवर * के-लेल्या खुणेसारखा डाग द्यावा.

पाठीवरचे दर्दीवर.

पाठीवरच्या दर्दीचे तीन प्रकार आहेतः—

पहिला प्रकार इजखीलाल.

पाठ सुस्त होते. पाठीचा कणा फाटतो. ही बेमारी कठिण आहे. चालते वेळेस घोडा उजवे व डावेकडे आण्यास पहातो व पडतो. मग उठण्यास फार आयास होतात. त्याचे मणके फाटतात व सुस्त होतात. पाठीवर जफत याची पट्टी द्यावी. ती लांबवर मारावी. सात दिवसांनंतर पट्टी काढावी. ती जैतूनचे तेलानें काढावी. आणि दुसरी सात दिवस मारावी. नंतर बरें न होईल तर नुकता तेल पाठीवर घालावें. नुकता तेल पांढरें व काळें असतें. नुकता व जैतूनचें तेल बराबर घेऊन कढवावें. पट्टींत घालून पाठीवर सात दिवसपर्यंत लावावें, घोड्यास औषधाचे वेळेस हलूं देऊंनये. बरें न झालें तर डाग द्यावे.

दुसरा प्रकार, रेहूस साहूस.

ही शरीरांत सर्दी होण्यापासून होते. घोडा जमिनीवर निजला तर उठू सकत नाहीं. फार सक्तीनें उठतो. त्यावर इलाज.—

कोंबडीचीं दहा अंडीं, फुलाचें तेल, व नुकत्याचें तेल, तिन्ही सारखीं घेऊन घोड्याचे पाठीला चोळावें. गवत खाण्यास द्यावें. त्याचेवर जैतूनचें तेल व लसूण कुटून मिळवून गुदद्वारांत नळीनें घालावें.

तिसरा प्रकार, हरका.

पाय निसरल्यानें किंवा पडल्यानें दांत पडेल तर पाठीचे कण्यास इजा होते त्यावर इलाज.—

गाईचें तूप, जैतूनचेंतेल, सलगमचें तेल, लसूण, जिरें, मीठ, डुकराची चर्बी हें एकत्रकरून पाठीला लावावें.

कुशींत दोन प्रकारची बेमारी.

एक जाकब,हा जीन तंग बांधून होतो व त्यामुळें फोड होतात. आणि २ अकूर ह्मणजे बरगडी मोडते. त्याचें कारण उडी मारल्यानें व चोट लागल्यानें. गोस्त (मांस) मुरदाड होतें, व आंत पू होतो, नंतर लासूर होतें, इलाज.—फोड कापावे, मीठ, पाणी कापडास लावून त्यावर चिकटवावें. बरा होईपर्यंत स्वारी करूंनये. लोणी किंवा सफेदा, कोंबडीचीं अंडीं कपड्यावर लावून बांधावीं.

अंजिर शिरका दारूंत भिजवून त्यांत थोडा भूस घालून कापडावर घालून जखमेवर बांधावें, पू झाला असेल तर चिरावें, धुवावें, मीठ व लसूण आंत भरावा, तीन दिवस राहूं द्यावें, नंतर चवथे दिवशीं नवीन करावें. नासूर झालें तर चिरावें व जंगला अस्सन व मीठ भरावें. हें नेहमीं करावें, बरें होईल.

दुसरा प्रकार.—सफेदा, अंडीं, चित्रक, इसबगोल, व निशास्ता हें सर्व मिळून चोळावें व त्याची पट्टी बांधावी.

हाड मोडलें तर—गोंद बतमचा, गोंद सनोबर झाडाचा, दशक जंगली—अनार (डाळिंबाचे झाडाचें मूळ), काळा बोळ, कडूवृंदावन, अकामिया (मिरचीचें झाड), जांभळीचा गोंद, बोळ, सर्व बराबर घेऊन कढवावें व हरभऱ्याची आंब हड्डी मोडल्या ठिकाणीं लावावी, घोड्यास फिरवूंनये.

गोंद बुंद झाडाचा, गोंद सनोबर झाडाचा, गोंद दुतीचा, बोळ, अकामिया, जंगली डाळिंबाची मुळी, काळा बोळ, सर्व बराबर घेऊन पाण्यांत कढवून त्यावर लावावें.

शेपटीस बेमारी होते त्यावर.

पहिला प्रकार-दूम मोडणें आणि दुसरा प्रकार त्यावर केंस येतात.

जंबिरियानें केस बांधावे. तिसरे दिवशीं खोलावें, नवें मांस येऊन मिळेल. याप्रमाणें पुन्हा बांधावें नाहीं तर दूम वांकडी होईल.

दुसरा प्रकार. घोडा दूम पाठीवर किंवा बाजूनें मारील तर वाईट खोड आहे.

वस्तऱ्यानें शेंपूट चिरावें, त्यांत मनुष्याची सुकलेली विष्ठा भरावी, रक्त बंद होईल. मलम लावावें. पूर्वी मलमें सांगितलीं आहेत.

केंस येण्यास उपाय.—शेपटीची शीर तीन अंगुळें कांपावी. मग त्यांत मीठ भरावें. बुराअरमणी यानें गरम पाण्याबरोबर धुवावें. आणि हिंग पाण्यांत किंवा शिरक्यांत लावावा. दुसरा इलाज-अयाळ, व कपाळावर केंस येतात, अंजीर शिरक्यांत भिजवावे त्याचा खमिर करावा, त्यावर बोळ व गुग्गूळ कपड्यावर लावून बांधावा.

घोड्याची साधी बिमारी.

रहूलम फाशील ह्मणजे एकाच पुढचे हातावर फोड होतात त्यापासून घोडा पुकारतो. दुसरे दिवशीं दुसरे हातावर फोड होतात. पहिले जातात. घोडा पुकारा करितो. तिसरे दिवशीं उजवे पायावर होतात, घोडा फार पुकारतो. चवथे दिवशीं चवथे पायावर होतात. जागोजाग होतात. अजीर्णापासून होतात, दाणा खाण्यानें होतात. पायाचें रक्त काढावें व हाताचें काढावें; नंतर पाठीचें काढावें, नंतर पायावर डाग द्यावा. मेथी व मटर खाण्यास द्यावें. मेथी व अळशी बारीक करून शिरक्यांत खमीर करून पायावर लावावें.

दुसरा इलाज.—ज्वारीचें पीठ, बालूना, पुदीना व बाकला (वेलची) शिरक्यांत खमीर करून पायावर लावावें.

पायांत दर्द होते त्यावर—गवत खात नाहीं, सुस्त होतो व एक अंड लोंबतो त्यावर उपचार. कसरसारखा इलाज करावा. डाग देऊन चिक्कण तेल लावावें. डुकराची चर्बी, फटकी, सेगंज, जैतूनचे

तेलांत मिळवून लावावें. व पूर्वी सांगितलें आहे तें मलम लावावें. ताप येत असल्यामुळें किंवा कमी पाणी प्याल्यानें हात उचलून धरतो, चार पायांनीं उडूं शकत नाहीं. किंवा हवेच्या कारणानें बेमारी होते. रक्त काढावें. मेथी, अळशी, केशर, बराबर घेऊन शिरक्यांत खमीर करून हातापायांवर लावावें. नंतर ज्वारीचें पीठ, अळशी, व बाबूना, व काकला बारीक करून मुलाचे मूत्रांत मिळवून पायांवर लावावें.

खाण्याची व पाणी पिण्याची बेमारी होते.

ह्या बेमारीचे सहा प्रकार आहेत.

१ कण्हेरीचें झाड खाल्यानें, २ कोंबडीचा गू खाल्यानें, ३ सबजा खाल्यानें, ४ सुतेरा खाल्यानें, ५ पाण्यांतील माशी खाल्यानें, आणि ६ गाभणी उंटीणीचें दूध प्याल्यानें.

पहिला प्रकार.—जमिनीवर पडतो, लोळतो, तोंडांतून फेंस जातो, डोळे लाल होतात. व नाकांतून पाणी जातें, त्यावर उपचार.—

खजूर पाण्यांत गरम करून पाजावा. गाडगें घेऊन त्यांत मनुका घालाव्या. पाणी घालून उकडावें. अर्धे पाणी राहिल्यावर पाजावें.

दुसरा प्रकार.—कण्हेरीचे झाडाची साल व शेंबाझाडाची साल काढा करून साखर घालून पाजावा.

तिसरा प्रकार.—कानावर व शरीरावर फोड होतात त्यास उपाय. शबचफळ आणून त्यांत बुराअरमणी घालून शिजवून नंतर पाजावें.

सुतेऱ्याबद्दल.—थुंका व घाम फार येतो, डोकें फिरवतो, हातपाय आपटतो. इलाज. घशाजवळचें रक्त काढावें, नाकांत बाराची दारू घालावी. किंवा गाईचे दुधाचा पनीर घालावा. दारू किसमिजची तीन रत्तल पाजावी. जवाबरोबर बुराअरमणी पाण्यांत घालून द्यावा.

पाण्यांतील माशी—घोड्याचे गुदावाटे लिंबा सारखे किडे निघतात किंवा रक्त पडतें, अंगावर फोड होतात. उपचार.—

खजूर व सवसन झाडाची मुळी घेऊन सहा रत्तल पाण्यांत उकडावी. अर्धे पाणी राहिल्यावर साखर घालावी. आणि दररोज दोन रत्तलप्रमाणें पाजावें.

उंटाचे दुधाबद्दल.—तोंडांतून तांबडा फेंस पडतो त्यास. उंटाचें दूध अर्धा रत्तल द्यावें. त्यावर गाढवीचें दूध किंवा पांढऱ्या मिरच्या द्याव्या.

औषधाचे इलाजानें जखमेवरचे केंस जातात ते येण्यास औषध.

हस्तीदंत एक तोळा, मेण एक तोळा, बकरीची चर्बी तोळे दोन, राळ सहा मासे, डिकेमाली चार मासे, व तिळाचें तेल अतपाव. सर्व तव्यावर कढवावें. नंतर तें तेल तव्यावर घालावें, त्यानंतर लगेच चर्बी, मेण, राळ, डिकेमाली घालावी. केंस गेले असतील तेथें तेल लावावें.

दुसरा इलाज.—चार करफष (सरडे) व जवखाईचें मूळ बारीक करून करडईचें तेलांत भाजून मिळवून केंस गेले असतील तेथें लावावें. दोन रात्रींत केंस येतील. सात दिवस लावावें.

दुसरा इलाज.—सहा मासे माशा तिळाचे तेलांत मिळवून दिवसांतून दोन तीन वेळ चोळावें. याप्रमाणें दोन आठवडे करावें. अनुभव आहे.

वाघाची चर्बी, ससाची चर्बी, व सरड्याची चर्बी, सर्व एकत्र करून दोन तीन वेळ दिवसांतून चोळावें. अनुभव आहे. एक करफष (सरडा) जंगली, व बेडूक मोठा एक, तिळाचे तेलांत घालून लावावें. अनुभव आहे.

मूत्रारोग.

मूत्र्यारोगाचे प्रकार तीन आहेत; एक रसमुत्रा, दुसरा मांसमुत्रा, आणि तिसरा हाड मुत्रा. हे तिन्ही मुत्रे झाले असतां अंगास तिडका येतात, मागील धड सुजतें, मागले पाय थरथर कांपतात. मांस मुत्रा झाला असतां तिडका होत नाहींत. पाय सुजतात. त्यास औषध.—नवसागर, मनसीळ, जयपाळ, मोरचूद, हरताळ, सोमल, चित्रक, सैंधव, संचळ, कांच, गंधबीद, व मीठ हीं सर्व औषधें प्रत्येकीं ३ टांक वजन घेऊन चूर्ण करून त्यांत तेल २ दोन शेर आणि निवडुंगाचा चीक (देठचाचा रस) अर्धाशेर घेऊन मडक्यांत घालून कढवावें. हें तेल फुग्यास (सुजेस) लावावें. मग फुग्यांतून लस निघेल व चट्टा पडेल, त्यावर नरमूत्र आणि रानशेणीची राख एकत्रकरून लावावी. हें तेल जखमेस, खांडुकास, बेंडास, काचरू, हडी, जानवाशी, बगळीकशी, चावळी वगैरेंस, लावलें असतां गुणावह पडेल.

सोमल, देवदार, आहळीव, कण्हेरीचीं फुलें, अगर मुळें, हीं प्रत्येक एकेक टांक घेऊन चूर्ण करून तेलांत घालून खलावें. मग पुढील पायाच्या डोळ्यावरचे केश भादरून त्यावर फांसणी टाकावी. वर हें तेल लावावें. आणि शेक द्यावा. असा क्रम तीन दिवस करावा. पाय सुजतील त्यावर दहींभात बांधावा. असें दोन दिवस करावें. मग वर पर्यळू (माका) ऊन करून एक सप्तक बांधावा. मग चट्टे पडतील, त्यांजवर नरमूत्र व रानशेणीची राख एकत्र खलून लावावी. पायास पाय घांसूं देऊंनये.

नाग एक टांक, व जयपाळ एक टांक घेऊन, चूर्ण करून लिंबाचे रसांत कालवून हें औषध मुत्र्यावरचे केश भादरून त्यावर फासावें; वर बिब्याचें तेल जिरवावें व वर शेक द्यावा. वर पुन्हा हें औषध लावावें. असा क्रम दोन दिवस ठेवावा. मग पर्यळू (माका) मनु-

ण्याचे मुतांत भिजत घालून, ऊन करून वर बांधावा, असें एक सप्तक करावें. नंतर नरमूत्र व रानशेणीची राख एकत्र करून वर लावावी.

हाळिंबासोमल, नागरक्तसिंग, हरताळ, जेपाळ, तांबडीं व पांढरीं कण्हेरीचीं फुलें, हीं एकेक टांक घेऊन चूर्ण करून तेळांत कालवावें. हें तेल फुग्यावर फासण्या टाकून वर लावावें. असा क्रम दोन दिवस करून मग नरमूत्रांत पर्यळूचा पाला घालून ऊन करून वर बांधावा. असा क्रम ७ दिवस करावा. नंतर त्यावर नरमूत्रांत रानशेणीची राख कालवून लावावी.

बिबे म्हशीचे मुतांत भिजत घालून त्याचें तेल काढावें, तें तेल पायास तीन दिवस लावावें. वर परळाचा पाला ऊन करून बांधावा. असा क्रम एक सप्तकपर्यंत करून मग नरमूत्र व रानशेणीची राख एकत्र करून लावावी.

मांसमुत्रा व वायुफुगा याजला औषध—काळाबोळ तीन टांक घेऊन लिंबाचे रसांत उगाळावा, आणि फुग्यावर त्याचा लेप द्यावा, वर परळाचा पाला ऊन करून तीन दिवस बांधावा, नंतर निवडुंगाच्या (फांद्या) आणून त्या मधोमध चिरून त्यांत मीठ, व हळद यांचें चूर्ण करून भरावें. ती कांडी वाटून ऊन करून ३ दिवस फुग्यावर बांधावी, फुगा फुटून बरा होईल, त्यावर राख व नरमूत्र एकत्र कालवून लावावें.

सर्व प्रकारचे मुत्र्यास औषध—सोमल, नाग, कोष्ट, आहाळीव, मीठ, मोरचूद, डोंगरमीठ, नवसागर, सुंठ, मिरें, गाजराचें बीं, व जवखार हीं प्रत्येक एकेक टांक प्रमाणें घेऊन चूर्ण करून घोळ्याचे दांडीचा शेंडा एक बोटभर चिरून त्यांत हें औषध लिंबाचे रसांत कालवून भरावें, मग हळुहळु चोळावें. असा क्रम दोन दिवस करून मग दहींभात बांधावा. सर्व मुत्रे बरे होतील.

मांसमुत्रा व वायुफुगा यांजवर औषध—केरळ मुळाची साल,सेवग्याच्या मुळीची साळ,पिंपळमुळीची साळ,व मोहाचीसाल यांचें चूर्ण करून पाण्याबरोबर वाटून फुग्यावर फासणी टाकून हें औषध ऊन करून लावावें.

सोमल, आहळीव, गंधक, जेपाळ, गुंज, व हरताळ, हीं समभाग घेऊन चूर्ण करून तिळाचे तेळांत कालवून फुगा अरीनें टोंचून हें तेल जिरवावें. असें दोन दिवस करून, कुकडे काजळ फुग्यावर बांधावें. मग दहींभात बांधावा. असें दोन दिवस करून रानशेणीची राख नरमूत्रांत कालवून लावावी.

जमालगोटा, लिंबाचा रस, व एरंडेल, हे तिन्ही जिन्नस समभाग घेऊन, तांब्याचे परातींत घालून तांब्याचे भांड्यानें खुप घोटावे, आणि भरून ठेवावें, नंतर वस्तऱ्यानें मुत्र्यावरचे कैंस काढून त्याजवर वरील औषधाच्या, दाभणानें तीन रेघा माराव्या व ह्याचाच दोन्ही पायांस लेप करावा, असें तीन दिवस करावें. पायासपाय लागूं देऊंनये, पाय चिरगुटांनीं निरनिराळे बांधावे.

आंकोल्याची मुळी, व बावंच्याचें बीं, हीं समसमान घेऊन त्यांत तेल घालून पातालयंत्रांतून तेल काढावें. नंतर वस्तऱ्यानें मुत्र्या वरचे कैंस भादरून त्यावर एक (नितळ) प्रमाण भोंक पाडावें. नंतर सदरहू तेलाचा त्यावर लेप करावा. तीन दिवसांत सर्व मुत्रे बरे होतील. हेंच तेल जखम, व गजचर्म ह्या रोगांवरही फार उपयोगी आहे.

शिगरास मुत्रे फुटतात त्यास उपचार—कांबिया सेंदूर, व मिरें, हें एकेक मासा घेऊन चूर्ण करून रुईचे चिकांत कालवून गोळ्या करून दररोज एक प्रमाणें एकसप्तक द्याव्या.

मुत्रा मागील पायावर व तंगडीवर होतो. ही इजा चवदा प्रकारची आहे:—

पहिला प्रकार—मुतरा वादीपासून ह्मणजे अजीर्णापासून होतो व त्यावर फोड येतात. त्यांतूनपू व पाणी पिवळें निघतें, त्यावर इलाजः —जेपाळाचा मगज, लिंबाचा रस,व एरंडीचें तेल अतपाव मिळवावें, तीनचार दिवस दर्दावर लावावें. नंतर बकरीचें दूध एक शेर, गुग्गुळ अर्ध छटाक, व सुहागी अर्ध छटाक हें बारीक करून गोळ्या कराव्या व त्या सात दिवस द्याव्या. किंवा चाळीस दिवस हें औषध द्यावें. रोज नवें औषध करावें. अनुभव आहे. त्यासमयीं घोड्यास बाजरी व सरस देऊंनये. कडबा व हरबरे द्यावे, व हिरवें गवत पाहिजे तरद्यावें. मुतऱ्यावरचे केंस काढावे जेपाळ एक तिळाचें तेलांत घालून लावावें. अगोदर शस्त्रानें त्याचें रक्त काढावें. नंतर औषध तीन दिवसपर्यंत लावावें. जखम ठणकूं लागेल तर तूप चोळावें. अनुभव आहे. मुरदाडसिंग बारीक करून अर्धाशेर काळा सज्जिखार घेऊन व पावशेर सुहागी भाजलेली बारीक करून दररोज सकाळीं एक मूठभर पाणी पिण्याचे वेळेस द्यावी. अनुभव आहे. पाण्यांत ती पूड देणें. बुटासाहेब सवदागर यांणीं केलेला हा वरील इलाज अनुभविक आहे.

खुरासणी ओंवा एक शेर, सज्जिखार एक शेर, अंबेहळद, काळा पांढरा काथ अर्धाशेर, हरभऱ्याची भाजली दाळ एकशेर,व संख्या सोमल तोळे २ दोन, सर्व वस्तु बारीक करून तीन वेळ वस्त्रगाळ कराव्या, नंतर एकत्र करावें. सोमल त्यांत थोडा थोडा घालावा. सकाळीं छटाकाची गोळी करून दाणापाण्याचे पूर्वी अल्याचे रसांत द्यावी.

दुसरा इलाज—मनशीळ एक तोळा, अवळासार, गंधक एक तोळा, गुग्गुळ एक तोळा,व गव्हाची कणीक दोन तोळे, हीं सर्व बारीक करून दारूंत मिळवून आवळ्याचे बी येवढी गोळी करून रुईचें पान तव्यावर ठेवून सर्व गोळ्या त्यांत घालून शिजवाव्या. दररोज एकेक गोळी खाण्यास द्यावी. चांगली रीत आहे.

तिसरा इलाज.—मोहाचें बीं अतपाव, व चुना कळीचा अतपाव, बारीक करून साफ करावा. त्यांत मोहाचें बीं बारीक करून एकत्र करावें. नंतर त्याची भाकरी करावी. अर्धा भाग भाजावी व अर्धा भाग हिरवी ठेवावी. मग ती दर्दावर बांधावी. तीन दिवसांत बरें न झालें तर याप्रमाणेंच पुन्हा करावें.

चौथा इलाज.—लाल मिरच्याचें बीं तीन मासे, भंगळा तीन मासे, संख्या सोमल तीन मासे, जवखार तीन मासे, सुंठ तीन मासे, बचनाग तीन मासे, आवळा तीन मासे, व मीठ तीन मासे, हें बारीक करून लिंबाचे रसांत तीन दिवस खल करून लावण्याजोगें झाल्या-वर घोड्याचे शेंपेचे केंस काढावें. मग त्याचें टोंक वांग्याप्रमाणें चिरावें, त्यांत औषध भरावें. दुसरे दिवशीं पट्टी काढावी. पुन्हा अशीच तीन दिवसपर्यंत पट्टी भरावी. चवथे दिवशीं सुखे तांदूळ घेऊन त्यांत दहीं घालून जखमेंत भरावें ह्मणजे कसाही मुत्रा असल्यास बरा होईल.

शेराच्या पिकल्या डांग्या चार टांक, व लोणी अतपाव. नरमू-त्रांत शेराच्या डांग्या शिजवाव्या व लोण्यांत सकाळीं व संध्याकाळीं खाण्यास द्याव्या. दररोज सदर्हूप्रमाणें चार दिवस करावें.

मनुष्याची कवटी, काळे तीळ चार पैसेभार, सज्जीखार चार पैसे भार, गूळ चार पैसेभार, सुहागी चार पैसेभार, व गाईचें शिंग चार पैसेभार, सर्व बारीक एकत्र करून मग एकवीस गोळ्या कराव्या. सकाळीं व संध्याकाळीं एकेक गोळी द्यावी. चंदी कमी करावी. पाणी एकवेळ ऊन देत जावें. अनुभविक आहे.

खारीक, मिरें एकवीस,व सज्जीखार अतवाव, हें सर्वरात्र पाण्यांत भिजवून ठेवावें. सकाळीं काढून पुसून त्यांतील बिया काढाव्या. त्यांत सज्जीखार भरून त्यावर कणीक लावून दर दिवशीं एक भाजून देत जावी. एकवीस दिवसांनीं बरें होईल. अनुभव आहे.

मनुष्याचे डोक्याची जळालेली कवटी, भाजलेली तेलिया सुहागी पावशेर, गोमूत्र छटाक, व सज्जीखार अतपाव हें सर्व बारीक करून गोमूत्रांत घालून रात्रीस ठेवावें,सकाळींच काढून दोन किंवा चार पैसे-भाराची एक गोळी करून रात्रीं खाण्यास द्यावी. अनुभव आहे.

लोहारी मीठ, व कांहीं सुहागी, कांहीं नरमूत्रांत शिजवून त्यावर तें सात दिवसपर्यंत लावावें.

दुसरा इलाज.—सुंठ पंधरा टांक, बच दोन टांक, हळद दोन टांक, पिंपळी मोठी दोन टांक, पिंपळमूळ दोन टांक, राई छटाक, लसूण छटाक, हें सर्व बारीक करून दह्यांत किंवा ताकांत घालून सात दिवस घोड्यास द्यावें. अनुभव आहे.

कवटी तरसाची व एक मनुष्याचीही बारीक करून वस्त्रगाळ करावी. पिंपळमूळ अकरा पैसेभार शिजवून बारीक करावें. ही तिन्ही औषधें व तीन वर्षांचा जुना गूळ मिळवून मग एकवीस गोळ्या कराव्या. सकाळीं दररोज एक गोळी द्यावी. पाणी दोन वेळ पिण्यास द्यावें. वर सांगितला गूळ अकरा पैसेभार असावा. अनुभव आहे.

दुसरे प्रकारचा मूत्रा. पाण्यापासून मागील पायास होतो तो.

त्यांतून पिवळें पाणी निघतें, ह्मणोन त्याजला अंबीमूत्रा ह्मणतात. त्याजवर इलाज.—संख्या सोमल मुगाचे दाण्याएवढा घ्यावा. कापसांत घालून गोळी करावी. जेथें मूत्रा झाला असेल तेथें कांपून नंतर दर्दीचे जागीं एक दिवस बांधावें. हें औषध केल्यानें एक दिवसांत बरें होईल. कदाचित् न झालें तर पुन्हा तसेंच करावें. तांदूळ शिजवावे, दहीं त्यांत मिळवून तीन दिवस दर्दीचे ठिकाणीं बांधावें. चवथे दिवशीं मुत्रा अपोआप निघून येईल, नाहीं तर शस्त्रानें कांपून त्याजवर पुढील मलम लावावें.—

मलम.—तिळाचें तेल दहा पैसेभार, शेंदूर अतपाव, व कापूर एक पैसाभार. तिळाचें तेल लोखंडाचें भांड्यांत शिजवावें. त्यांत शेंदूर घालावा. पुन्हा त्याचप्रमाणें करावें. फेंस काढून टाकावा. चुलीवरून उतरून थंड करावें. नंतर कापूर व मेण हें त्यांत टाकावें, मग मलमपट्टी करावी. अनुभव आहे.

जंगली खबुतराचा गू पावशेर, इंद्रजव पावशेर, अफू तीन तोळे, टाकणखार सहा तोळे, काळीं मिरें पावशेर, हळद छटाक, फटकी छटाक, गंध गोळी होईपर्यंत घ्यावा. सर्व बारीक करून मधांत एकत्र करून सहा गोळ्या कराव्या. दररोज सकाळीं एक गोळी द्यावी. दिवसास पाणी गरम एक वेळ द्यावें. घोड्यापासून चाकरी दोन तास घ्यावी. सात दिवस दाणा देऊं नये.

दुसरा इलाज.—बत्र पावशेर, छालीया सुपारी भाजली पावशेर, अंबेहळद पावशेर, मनुष्याची कवटी भाजलेली, व सुहाबीज पावशेर हें सर्व बारीक करून दररोज सकाळीं पावशेर औषध द्यावें. अनुभवीक आहे.

मूत्र्यास शस्त्रानें कांपावें, काळे धोतऱ्याचीं पानें, व सेंदेलोण, दोन्ही एकत्र करून जेथें कांपलें असेल तेथें बांधावें. चार दिवसांनीं पट्टी काढावी. याचप्रमाणें अशी पट्टी चार वेळ करावी. अनुभव आहे.

निवडुंग तीनधारी आणून बारीक करावा. कांगोळी एक शेर, गाईचे तुपांत एकवीस दिवस द्यावी. त्याजवर हरभरे व कुळीथ देऊं नये. मूग, ज्वारी, आटा, व तांदूळ द्यावे. जखम रोज पहावी. अतिशय नरम होऊन फायदा नसेल तर दाणा, ज्वारी व मूग बंद करून टाकावें. म्हशीचें किंवा गाईचें दूध मिळालें तर पिण्यास द्यावें. अनुभव आहे.

सुहागी, हिराकस, काळीं मिरें, गुग्गुळ, कोष्टकोळिंजन, सुंठ, सतव, व

अंबेहळद. हिराकस व सुहागी भाजून बाकीचीं औषधें बारीक करून वस्त्रगाळ करावीं. व मग सर्व भाजून एकत्र करावें. त्याचे एकवीस हिस्से करावे. ताजफळत्यांत एक हिस्सा घालून दाण्याचे नंतर त्यास खाण्यास द्यावें. मग एक घडी झाल्यावर पावशेर तूप दिवसा पिण्यास द्यावें. अनुभव आहे.

पारा एक तोळा, मोगरा, व विड्याचीं पिकलीं पानें शंभर. वस्तऱ्यानें केंस काढून मोगरा चोळावा. नंतर पानसुपारीप्रमाणें पानें खाण्यास द्यावीं पारा व घोड्याची विडा खाल्लेली लाळ एकत्र करून दर्दावर चोळावी. एक तास मालीस करावें. अनुभव आहे.

तांब्याचा गंज एक तोळा, अवळ्या गंधक दोन तोळे, व सेंदेलोण दोन तोळे, हें सर्व बारीक करून लिंबाचे रसांत भिजवून तीन दिवस ठेवावें. पुढें खलावें. त्याची गोळी करून दर्दावर तीन दिवसपर्यंत बांधावी. नंतर रुईचे झाडाची राख, व तेलीया सुहागी भाजलेली— या दोन्हीच्या गोळ्या पाण्यांत करून रोग्यास खाण्यास तीन दिवस पर्यंत द्याव्या. अनुभव आहे.

लेप करावा तो.—गंधक व लाल पापडखार कांहीं पाण्यांत घालून एकत्र करून दर्दावर लावून त्यावर कळीचा चुना चोळावा. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—जंगला दहा पैसेभार, जवखार चार पैसेभार, तेलीया सुहागी कच्ची दोन पैसेभार, बारीक करून अल्याचें रसांत मिळवावें. सहा टांकप्रमाणें गोळी करावी. सकाळीं गोळी द्यावी. अनुभव आहे.

नवसागर पावशेर, सुहागी पावशेर, सज्जीखार पावशेर, फटकी पावशेर, काळीं मिरें पावशेर, कुटकी पावशेर, मनुष्याचे डोकीचें हाड

बारीक व वस्त्रगाळ करून सर्व एकत्र करावें. दोन पैसेभार सकाळीं खाण्यास द्यावें व रात्रीसही दोन पैसेभार द्यावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—पाणी शिळें पंधरा टांक, तिळाचें तेल पंधरा टांक. पाणी व तेल एकत्र करावें. नंतर त्यांत सज्जीखार पंधरा टांक घालावा. मग घोड्यास पाजावें. फार जुना मूत्रा असल्यास जाईल. हा दवा पंधरा टांक घोड्यास खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

नरमूत्र एक शेर, बनखटाई पावशेर, डोरली, व खाण्याचें मीठ चार पैसेभार, हें सर्व एकत्र करून शिजवावें. नंतर मीठ घालून पुन्हा शिजवावें. मुत्र्यावर चोळावें. नंतर खाण्यास हिरडे बोळ हिरवे शिजवून देणें. अनुभव आहे.

तिसरे प्रकारचा मुत्रा.

घोड्याचें रक्त वाईट होतें व पिंवळें पाणी वाहूं लागतें, व वायू होणें या तिघांपासून मूत्रा होतो. त्याजवर इलाज नाहीं. लाच्यारीमुळें * याप्रमाणें डाग देतात.

दुसरा प्रकार मुत्र्यास.—घोड्याच्या पायाचें हाड जोडापासून पुढें येतें व चक्रीप्रमाणें होतें. वर सांगितल्याप्रमाणें लेप करावा. बरें न होईल तर * याप्रमाणें डाग द्यावा.

अंबेहळद, सोहागी, चुना कळीचा व सज्जीखार, सर्व बारीक करून रुईचे चिकांत एकत्र करून दर्दावर लावितात. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—जवाचा आटा, शेराचे चिकांत भिजवून भाकर करून अर्धीकच्ची भाजावी. तीन दिवस बांधावी. अनुभव आहे.

सुहागी भाजलेली एक पैसाभार, व मनुष्याची कवटी, बारीक वस्त्रगाळ करावी. ती पूड चार पैसेभार व चारपैसे भार सुहागी एकूण आठ पैसेभार, ज्वारीचे पिठांत घालून सात दिवस घोड्यास खाण्यास देणें. अनुभव आहे.

चपटा ह्मणजे घोड्याचे हात पाय बंदाचे जोडाजवळ पुढें येतात. त्याजवर उपचार.—

शेराच्या डिगऱ्या एक मुठी किंवा दोनमुठी, त्याला कपडमठ करावें, विस्तवांत गरम करावें. नंतर त्याचे तुकडे बारीक करून रात्रीस दर्दावर बांधावें. सकाळीं काढून टाकावें. पुन्हा दुसरे दिवशीं त्याप्रमाणेंच करावें. येणेंप्रमाणें तीन दिवस करावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—पारा एक तोळा, संख्या सोमल एक तोळा, शिंगरूफ एक तोळा, हरताळ तोळा, बचनाग तोळा, जंगला तोळा, सुहागी तोळा, अफू एक तोळा, व पांढरी साखर एक तोळा, सर्व बारीक करून अल्याचें रसांत वाटाण्या एवढ्या मोठ्या गोळ्या करून मग रात्रीं दाणा दिल्यावर एक गोळी घोड्यास खाण्यास ज्वारीचे पिठांत द्यावी. व सकाळींही याप्रमाणें द्यावी. दोन आठवडे सदई औषध द्यावें. अनुभव आहे. घोड्यास खुराख मात्र जास्त देत जावा.

रुईचे झाडाचा चीक त्यांत गव्हांचें पीठ एकत्र करावें. टाकणखार चार तोळे, बारीक करून रुईचे चिकांत घालून त्याची भाकरी करून भाजावी व ती दर्दावर बांधावी. याप्रमाणें तीन दिवस दररोज एक एक बांधावी. नाहीं तर मलम लावावें तें—

एरंड्याचें बीं, हळद, पांढरा काथ, व तीळ हीं बारीक करून खांडकाळीचे रसांत एकत्र करावें, नंतर जखम गरम पाण्यानें धुऊन हें मलम लावावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—तिळाचें तेल, गाईचें तूप, एरंड्याचें तेल, एका अंड्यांतील पांढरा मगज व हळद दोन पैसेभार, हें सर्व एकत्र करून चपट्यावरचे केंस काढून सदई औषधाचें मालीस करावें.

चौथा इलाज.—उंटाची फांसोळीं विस्तवावर ऊन करावी. व तिणें दिवसांतून तीन वेळ दर्दास शेकावें.

पांचवा इलाज.—चेंपट व फोड होतात. त्यांजवर भिलाव्याचे ते-

छचा लेप करावा. व त्याजवर कळीचा नवा चुना लावून शेकावें. अनुभव आहे.

शेराचा चीक, व मीठ खाण्याचें,दोन्ही एकत्र करून दर्दावर बांधावें. याप्रमाणें तीन दिवसपर्यंत करावें.

लोहोचा जंग, व सुहागी, बारीक करून जखमेवर चोळावी. नंतर डाग द्यावा. तो* याप्रमाणें एक डाग द्यावा.

सुंठ किंवा अलें, घमासा, व पिंपळमूळ हें सर्व गुळांत किंवा साखरेबरावर द्यावें. वेंच, रुईचें झाडाच्यामुळ्या, शेंदूर, व मीठ, या सर्वांस बारीक करून दर्दावर चोळावें.

रुईचे झाडाचा चीक, शेंदूर, व तूप ताजें, तिन्ही बराबर घेऊन त्यांत मिळवून लेप करावा.

अंबेहळद भाजलेली, व नवा चुना, एकत्र करून लेप करावा.

मर्जेहडा याचें हाड जागेपासून बंदाजवळ निघून येतें. त्याचा आरंभ खालीं व वरतीं आंतून होतो. त्यावर डाग द्यावा. चपल्यावर सांगितलेले इलाज यालाही लागू पडतात.

संख्या सोमल एक तोळा, व कवठफळ सुमारें तीन. कवठांत सोमल ठेवून कपडबंद करावें, नंतर शिजवावें. त्यांपैकीं तीन मासे सोमल घेऊन घोड्याचें शेपूट चिरून त्यांत भरावा व कपड्यानें बांधावा. तीन दिवस पट्टी राहूं द्यावी, चवथे दिवशीं काढावी बरें न झालें तर याप्रमाणें आणखी करावें.

चवथा प्रकार बाजर हड्डी.

याचें हाड नारंगीप्रमाणें होतें त्यावर इलाज.—

हिंगणबेट पावशेर, व मुळे छटाक, दोन्हीं बारीक करून त्यावर तीन दिवसपर्यंत बांधावें व त्यावर नरमूत्र दिवसांतून तीन चार वेळ घालीत जावें.

दुसरा इलाज.—भिलावे पांच, साबूण एक पैसाभार, लसूण छटाक, व नवा चुना छटाक,सर्व बारीक करून एकत्र करावें. वस्तऱ्यानें केंस काढून त्यावर तीन दिवसपर्यंत बांधावें.

इलाज ३ रा.—कांहीं मेण, व गुळे, बारीक करून व मेण ऊन करून त्यांत मुळ्याचा कीस कालवून तीन दिवसपर्यंत दर्दावर बांधावें. यास बेरहडीही ह्मणतात. त्यावर डाग देणें. अनुभविक आहे. डाग ⪯ येणेंप्रमाणें द्यावा. घोडा लंगडत असल्यास वरील डागापासून लंगडत नाहींसा होतो.

पांचवा प्रकार मुसळी.

मुसळी मागील पायास होते. त्याचे फोड कठीण होतात. त्याचें कारण एक ठिकाणीं फार दिवस बांधल्यानें, अजीर्णानें व रक्त नासल्यानें फोड येतात. त्यास इलाज.—

मेण अर्धशेर, खोडबच (वेखंड) अर्धशेर व छर्रे अर्धशेर.प्रथम मेण कढवावें व खोडबच याजला बारीक करून त्यांत वालावें. नंतर छर्रें घालून लौकर ऊन करून घ्यावें. छर्रें गरम होऊं देऊं नये. तिन्ही जिन्नस कपड्यावर घालून पांच दिवस लेप करावा.

मैदालकडी एक टांक, एक पैसाभार अळमगिरी, गहूं तीन पैसेभार भाजलेले, सज्जिखार एक पैसाभार भाजलेला, हळद भाजली एक पैसाभार, गुग्गुळ एक पैसाभार भाजला, मालकांगोणी एक पैसाभार भाजलेली, कुळथी एक पैसाभार भाजकी, मेंडफळ एक पैसाभार भाजलेलें, व साबूण भाजलेला एक पैसाभार, सर्वांस बारीक करून पाण्यांत घालून कढवावें. मुसळीवर लेप करावा. त्यावर एरंडीचीं पानें चार पांच बांधावीं.

मसालाही खाण्यास द्यावा तो—कुटकी, पिंपळपानें, पिंपळमूळ, वावडिंग, किरायत, सुहागी तेलीया भाजली, मुरूडफळ, काळींजिरें व

मिरें बाळहिरडे,मोठे हिरडे,पळसपापडी,अकलकरा,सुंठ,राई, जायफळ जंगली, अंबेहळद,गुग्गूळ,धने,सुंठ,मुऱ्हाचें बीं, काळी मुसळी, पांढरी मुसळी, दालचिनी,कबाबचिनी, बचनाग,अवळा, सोनामुखी,डिकेमाली, सुकलेली खारीक, गजगा, तेजबल, लवंग जंगली, तरवडाचें बीं, इंद्रावणीचें फळ, हिंगण झाडाची साल, बेल झाडाची साल, मालकांगोणीचा रस, कापूर एक तोळा, भिलावे, साबूण, कोचकोईरीचें बीं एक तोळा, कोष्टकोळंजन, अवळासारंगधक, इंद्रजव, लाल मिरच्या, सज्जिखार, अमलतासाचा मगज ह्मणजे साल, अंबरवेल, बोळ, गुळवेल, सुकलेली अजवान, तीन प्रकारचे दुसरे अजवान, रिंगणीचें झाड पानासुद्धां, संभाळूचीं पानें दोन मुठी सुकलेलीं, रुईचीं पानें पिकलीं, हिंग, काळेंमीठ, शेंधलोण, बांगडीखार खोडबच, मीठ सांबरी, काळाबोळ, मध अर्धाशेर, कायफळ, लसूण अर्धाशेर, हळद, अफू दोन तोळे, कांदे, गूळ तीन वर्षांचा जुना दोनशेर, संख्यासोमल दोन तोळे, काथ पावशेर, हें तीन दिवस अल्याचे रसांत खलावें. गेरू, नागरमोथे, अजमोदा, ठसूचें फूल, गुलनार, गुलाबकळी, कितरा झाडाचा गोंद, बाभळीचा गोंद, एरंडीचें तेल, व शिरसाचें तेल पावशेर, चोक दोन तोळे, अजमोदा, कासनी, अस्कंद, नागोरी, सोरा, फटकी, अहाळिवाचें बीं, कुचला, चित्रकमूळ, मोहाचे झाडाची साल पावशेर, शिरसाच्या झाडाचें बीं छटाक, काळ्या टाकळीचीं पानें, नरकचूर, शिंगरूफ तोळे दोन २, जंगला भाजलेला एक तोळा, लिंबाचा रस दोनशेर, गुंदन झाडाचीं पानें पावशेर, मेंडफळें २ दोन, गाईचें पित्तांतील पाणी सर्व औषध भिजे इतकें, चरंजु अतपाव, जवखार दारू दोन शेर पिण्याची, गजगा झाडाचीं पानें दोन मुठी, द्राक्षाचा शिरखा, बामझाडासुद्धां चार मुठी, हीं सर्व बारिक चूर्णाप्रमाणें करावीं. सोमल, शिंगरूफ, जंगला, व सुहागी, यांचा पांढरे काथांत

आणि अल्याचे रसांत खल करावा. तीन दिवसानंतर अतपावप्रमाणें नेहमीं औषध द्यावें. सर्व निरनिराळें बारीक करून जीं झाडाचीं नांवें दिलीं आहेत त्यांचे रसांत कालवून दुसरे दिवशीं त्यास शेजण्या झाडाचे रसांत भिजवावें. मग सर्व दिवसभर राहूं द्यावें. तिसरे दिवशीं द्राक्षाचे शिरक्यांत भिजवून एकरात्र ठेवून नंतर दारूंत मळावें. नंतर पावशेरप्रमाणें गोळी करून मोठे घोड्यास पावशेराची याप्रमाणें गोळ्या करून एक गोळी दाणा देण्यापूर्वी सात दिवस किंवा दोन आठवेड द्यावी. सर्व प्रकारचे रोग निघून जातील. अनुभव आहे.

सहावा प्रकार दुलदपाय खुलदपाय.

मांड्यांचे ठिकाणीं वायूपासून रक्त निवतें. तेणेंकरून घोड्यास अंडापर्यंत ह्मणजे अंड व शिश्न यांवर फोड होतात. सूज येते,हे फोड घोड्याचे हतास ह्मणजे पुढले पायास होतात. त्यापासून घोडा मरतो, त्यावर इलाज.

खुलपाका.—पासून मैला काढून विस्तवानें शेकावें. तीन दिवस याप्रमाणें करावें. कांहीं लोक हा उपचार फिलपाक व खुलंद याजवर करितात. कुचला, भिलावे व हळद यांचें गंध करावें. हीं तिन्हीं गंधाप्रमाणें शिस्तवार लेप करूनविटेनें किंवा बाटलीनें शेकावें.

सातवा प्रकार सांधेजोड.

बंदसया हें एक हाड आहे; तें मांडीपाशीं हुक्याप्रमाणें दिसतें. घोड्याचा पाय सरला तर असें होतें. त्यावर लेप फार मजबूत करावा व शेकावें. कांहीं लोक तोबरा घेऊन त्याचे आंत गवत भरून घोड्याचे दोन्ही मांड्यांत देऊन रशीनें गुंडाळून नंतर घोड्याचे पायास रशीनें ओढावें, हाड जागचे जागीं बसतें. मग त्या-

वर लेप लावावा. बिस्तवानें शेकावें. नाहीं तर डाग द्यावा दोन हत्तेपर्यंत चाकरी थोडी घेतात.

आठवा प्रकार.

अकला, यापासून घोडा लंगडतो, मांडीचे आंतील रगा मुरडतात, त्यास रक्त काढावें. नंतर एकमेकाचे समोर असे. तीन डाग द्यावे. जैतूनचें तेल लावावें. कांहीं लोक घोड्याचे मांडीजवळ रक्त काढतात व त्यावर शेराचा चीक लावतात. शेराचा चीक, गोंद, गुग्गुळ, हिंग, पास्तीन, कबूतर, अंबर, नटबेर, व अळें बराबर घेऊन बारीक करून जैतूनचे तेलांत जुनी फटकी टाकून चोळावें.

नववा प्रकार.

नववा प्रकार—मुसळीप्रमाणें इलाज करावा.

सिम्टोम्याटीक ताप.

छाती सुजून ज्वर येतो, हा ज्वर घोडा फार गरम ठेविला, किंवा अधिक खाणें घातलें, आणि सवयीपेक्षां ज्यास्ती स्वारी करून अगर गाडीस जुंपून फार चालविला तर असा ताप येतो. घोड्याचे शरीरांतील आंतडीं सुजतात व आकर्षण होतात, नंतर ज्वर येतो. डोळे सुजतात, आणि भूक लागत नाहीं, फार जोरानें डांसतो. याप्रमाणें चिन्हें होतात. जर घोडेवाल्याला घोडा कसा ठेवावा हें माहित नाहीं तर अशा घोडेवाल्याकडून अशी चूक होऊन घोड्यास ज्वर येतो. या ज्वरापासून केव्हां केव्हां घोड्याचे डोळेही जातात, पाय सुजतात, पोटांत रोग होतात. साधारण ज्वर आला असतां जीं चिन्हें होतात तींही या ज्वरांत होतात. परंतु थंडी वाजून येत नाहीं. श्वास लवकर टाकीत नाहीं.

पाय व कान थंड होतात. छाती सुजते, डोळे व तोंड पिंवळें होतें, लवकी नारिंगाप्रमाणें तांबूस व पिंवळट होते.

पुटेरताप—सदर्हू दोन ज्वराप्रमाणें प्रथम ज्वर दिसून येतो. परंतु यापासून घोडा फार अशक्त होऊन त्याच्या नाकांतून घाण पाणी वाहतें, भूक नसते, घोड्यास हा ज्वर जलद लागू होतो, ढाळ बंद होतात, आंतडीं तुटतात, या जातीचा ज्वर दुसऱ्यास लवकर लागतो. व हा रोग झाला असतां घोडा फार करून वांचत नाहीं. यावर औषध—कारबानेट ऑफ आमेनिया अर्धा ड्राम, पौडरबार्क अर्धा औंस, जवसाचा मगज आणि पाणी गोळी करण्यापूर्तें हें औषध दिवसांतून तीन चार वेळ द्यावें. ढाळ राहण्याकरितां बीर दारू द्यावी. फार ढाळ होऊं लागले तर पोर्टवाईन तांदुळाचे भातांत द्यावी.

ढाळ होणारा ज्वर आहे, त्यास एकाएकीं औषध देऊन बंद करूं नये. परंतु फार दिवस तसें चालूं देऊं नये. जवसाचा कोंडा, व गमआर्बिक पाण्यांत द्यावा. एकाएकी ढाळ बंद होत नाहींत. लीद थोडी पडते. येरंडेल देऊन एंब्रोकेशन पोटास घांसावें ह्मणजे विकृति बरी होईल. यापासून गुण आला नाहीं तर अफूचेंपाणी दोन ड्राम पावशेर कांजींत घालून पिचकारी मारावी.

पायाचे दर्दावरून ताप.

अनेक कारणानें होतो. फार श्रम दिल्यानें, सर्दीपासून, सुजेपासून, जोरानें बसल्यामुळें, उन्हाळ्या दिवसांत गाडीस फार चालविल्यामुळें, कठीण रस्त्यावर चालविल्यामुळें, सुंभाची त्वचा पडल्यानें, चारी पाय हालावून चळवळ करितो, नाडी जलद चालतें, मागील पायांवर ओझें ठेवितो, फार झालें तर खालीं पडतो. मग उठूं शकत नाहीं, पाय वळून घेतां येत नाहींत,

पाय व हात गरम होतात व शिरा दिसूं लागतात. त्यावर उपाय— रक्त काढावें. नंतर नाळ बसवावे, पाय भिजवून ठेवावे. ह्मणजे थंडीच्या योगानें पाय मऊ होतात व सूज उतरते. बर्फ लाविलें असतांही उपयोगी आहे, फार सूज असेल तर बर्फ लावावें किंवा पोटीस लावावें, अथवा जुलाब द्यावा. क्यालोमेल दिवसास व रात्रीस द्यावें. इतकें होऊन बरें न होईलतर रक्त काढावें.

ज्वरांविषयीं.

ज्वर आठ प्रकारचे आहेत. त्याचें लक्षण व त्यावर उपचार खालीं लिहिल्याप्रमाणें.—

१ संताज्वर.

तोंडास दुर्गंधि सुटते, तालू जळते, अंगास कळा लागतात, अंगास मुंग्या येतात, अंगाची आग होते, त्याजवर उपचार- केळीचा कंद, केतकीची साल, जांभळीची साल, व उंबराची साल, हीं औषधें समभाग घेऊन, चूर्ण करावें. आणि ह्मशीचें दूध १ शेर किंवा २ शेर घेऊन त्यांत चूर्ण घालून द्यावें. असें तीन दिवस करावें. अगर एक किंवा दोन आठवडेपर्यंत द्यावें.

केतकीचें पान केतकीचे सालीचे टिकाणीं योजलें तरी चालेल. तसेंच जांभळीचे सालीचे ऐवजीं केळीचा कंद घातला असतां उपयोग होईल.

---

२ मन्मथज्वर.

वळू घोड्यास बहुत दिवस घोडी संगम न मिळाल्यामुळें हा ज्वर उत्पन्न होतो. येणेंकरून मूत्र थोडें थोडें वरचेवर होतें. आणि अंगास घाम येतो, त्याजवर उपचार—जिरें व तांदुळाचें पीठ चारशेर घेऊन ५ शेर दुधांत घालून आटवावें. नंतर तें गुळाबरोबर ७ दिवस

द्यावें. किंवा त्यांत पावशेर साखर घालून ३ दिवस द्यावें. दररोज तीन चार शेर दूध पाजावें.

---

३ अढळज्वर.

सर्वकाळ अंग तत्प असतें. गवत थोडें थोडें खातो, व कधीं खात नाहीं. अगदीं रोड होतो, त्यास उपचार—तांबड्या राळ्याचें पीठ अर्धशेर, व कांटेसावरीची साल अर्धशेरप्रमाणें प्रत्येक घेऊन पाण्यांत घालून चतुर्थांश काढा करावा. त्यांत गाईचें दूध घालून पहिल्या दिवशीं द्यावा. मग टाकळीचा पाला एकशेर आणून पाणी पांचशेर घालून त्याचा रस काढावा. त्यांत त्रिकटु चूर्ण पावशेर घालून, विस्तवावर ठेवून दोन शेर उरेपर्यंत आटवावें. हें औषध तुपाबरोबर तीन दिवस द्यावें. नंतर निर्गुडीचा पाला, व वारुळाची माती एकत्र वाटून त्याचा लेप घोड्याचे अंगास करावा. किंवा कांगोणी, सोनकाव, तेल्या टाकणखार, व साबूण, हीं औषेंध निर्गुडीचे रसांत कालवून ऊन करून अगोदर घोड्याचे अंगास तिळाचे तेलाचा लेप करून नंतर ह्या औषधाचा लेप करावा.

---

४ द्वंद्वज्वर.

घोडा वाटेनें जातांनां उभा राहतो, कधीं खातो, कधीं खात नाहीं, स्तब्ध राहतो, अंग थंड होतें, वृषणास घाम येतो, व दोन्ही अंड थंड होतात, त्यास उपचार—समुळी पत्रिका, काकजंघा (काकफळ) भुईनिंब, गोखरूमूळ, गूळवेल, सुंठ, रिंगणी, द्राक्षें, व भुईकोहळा, हीं सर्व औषधें प्रत्येक पावशेरप्रमाणें घेऊन, त्याचा काढा अष्टमांश करून, थंड झाल्यावर त्यांत मध दोन शेर घालावा, आणि तीन दिवस द्यावा.

निवळीच्या बियांचे आंतील बीज, पित्तपापडा, सुंठ, रिं-

गणी, व काडेचिराईत, हीं प्रत्येक एक मूठप्रमाणें घेऊन ८ आठ शेर पाण्यांत घालून कढवावीं, तो थंड झाल्यावर त्यांत ४॥ टांक मध घालून ३ दिवसपर्यंत दिला असतां ज्वर जाईल. आणि हिंग दोन टांक, व सुंठ दोन टांक, हिंगुळाचे पाण्यांत कालवून नाकांत नस्य घालावें.

---

५ श्लेष्मज्वर.

अंगांत ताप असून नाकांतून शेंबा वाहतो, डोळ्यांतून पाणी गळतें. त्यासउपचार–पद्मकंद, सुंठ, भुईकोहळे, व देवदार, हीं प्रत्येक पावशेर घेऊन काढा चतुर्थांश उरवावा. त्यांत पर्यळू (माका) घालून दोन्ही वेळ द्यावा. किंवा हें सर्व औषध एक पलप्रमाणें घेऊन १ शेर पाणी घालून चतुर्थांश काढा उरवावा. त्यांत दोन टांक पिंपळी घालून तीन दिवस द्यावा.

---

६. क्षीणज्वर (सुकाज्वर).

घोड्यास लंघन पडून फारच क्षीण होतो, श्वासोच्छ्वास टाकतो, जमीनीवर निजतो, फोड येतात, अंग झाडतो, शेपटी हालते, तोंडांत फोड येतात, व त्यांतून पाणी गळतें. पाण्याची फारच तहान लागते, डोळ्यांतून पाणी गळतें, त्यांस उपचार–बेलाचीं मुळें, सराटीमूळ, व द्राक्षमूळ, हीं प्रत्येक पावशेर घेऊन त्याचा काढा करून गुळांत सात दिवस द्यावा.

मालकांगोणी, पांढरे गुंजेचें मूळ, शेंवतीचें मूळ, भुईकोहळा, सराटीमूळ, द्राक्षमूळ, व माईणमूळ, हीं सर्व समभाग घेऊन आठ शेर पाण्यांत घालून काढा चतुर्थांश उरवावा. त्यांत गूळ एक शेर मिळवून ३ दिवस द्यावा.

गुळाचे ऐवजी नाबदी साखर ९ तोळे प्रतिदिवशीं घालावी.

७. वातज्वर.

सर्वांगास गांठीं उठतात.—वाळलेली लीद करितो, त्याजवर उपचार–पहाडमूळ, तेड, कोष्ठ ,पित्तपापडा, कुड्याची साल, एरंडमूळ, व शेवग्याचे मुळीची साल, हीं प्रत्येक नऊ टांक घेऊन, चारशेर पाण्यांत घालून काढा करून चतुर्थांश उरवावा व त्यांत पिंपळीची पूड अथवा निर्गुंडी घालून द्यावा.

कोष्ठ, एरंडमूळ, शेवग्याचे मुळीची साल, बेहेडेदळ, व हिंगणाची साल, हीं एकत्र करून चारशेर पाण्यांत काढा करून दोनशेर उरवावा. त्यांत पिंपळीची पूड २ टांक घालून द्यावा. तीन दिवसांत ज्वर जाईल.

---

८. लंघनज्वर.

घोडा गांवोंगांव फिरत असतां एक दोन उपवास पडतात, त्यामुळें हा ज्वर उत्पन्न होतो. भुकेमुळें थंडी वाजल्याप्रमाणें थरथर कांपतो, त्यास उपचार–पत्री, लवंग, जेष्ठमध, हीं प्रत्येक ००।. पावशेर प्रमाणें घेऊन एकत्र पूड करून तीन दिवस द्यावी.

कंकोळ, लवंग, व जेष्ठमध, एकमूठप्रमाणें घेऊन एकत्र पूड करून तीन दिवस द्यावी.

घोड्यास साधारण ताप येतो त्यास उपचार.

हा ताप थंडीपासून होतो. तो समजण्याचीं चिन्हें होतात, तीं येणेंप्रमाणें.—थंडीनें अंगास कांटा येतो, क्षुधा मंद होते, हुषारी कमी होते, नाडी जलद चालते, एक पाय थंड व तीन पाय उष्ण असतात. किंवा उलट असतें ह्मणजे तीन पाय थंड आणि एक पाय उष्ण असतो, जीभ उष्ण आणि कोरडी असते. लवकी थोडी होते व तीही कष्टानें होते, तिचा रंग पिंवळट असतो. श्वास नित्यापेक्षां

ज्यास्ती चालतो. घोडा थोडा किंवा फार ढांसतो, रक्त काढल्यावांचून जितक्या कृति करतां येतील तितक्या अल्प रीतीनें कराव्या परंतु जर नाडी जलद असेल आणि दुसरीं चिन्हें भारी असतील तर तीन-पाव रक्त काढावें.—एमेटिकबॉलचें ढाळक द्यावें, परंतु पोट-शूळ होण्यापूर्वीं जर तितका अवकाश नसेल तर एरंडेल तेल चांगलेंच द्यावें. झाडा साफ झाल्यावर खालीं लिहिल्याप्रमाणें तापाचा दवा दिवसांतून ३ वेळ द्यावा. लघवी साफ होऊन पूर्वींप्रमाणें होईपर्यंत थोडेंथोडें औषध कमी करीत जावें. औषध द्यावयाचें तें येणेंप्रमाणें.—पौडर ऑफ नाइट्री १ एक औंस, क्यांफर २ ड्राम, व टारटेराईस अंटी-मोनी २ ड्राम, हीं एकत्र करून दिवसांतून तीन वेळ द्यावें. पाणी ऊन पाजावें. दाणा देऊं नये, भुसा द्यावा. तबेला थंड ठेवावा. कपडे नेहमींपेक्षां ज्यास्ती गरम ठेवावे. पाय थंड असतील तर ब्यांडीज करावें, जेव्हां हवा ९९ डिग्री असेल आणि थंड नसेल व ताप नि-वाला असेल तर बाहेर फिरवीत जावा. व दाणा थोडथोडा देत जा-ऊन पूर्वींच्या बेतावर आणावा. दुसरा ज्वर—डोळे तांबडे होतात, सुस्ती येते (घोडा निद्राळू होतो), नाकपुड्या तांबड्या होतात, नाकां-तून पाणी वहातें, नंतर शेंबूड होतो, तो पाणी पिऊं लागला ह्मणजे गळूं लागतो, तेणेंकरून घोड्यास पाणी पितां येत नाहीं, श्वास टाकितां येत नाहीं, गळा सुजतो, पाणीसुद्धां गिळवत नाहीं, वरचेवर खोकला जोरानें येतो, तेणेंकरून घोड्यास फार दुःख होते. पायांनीं टापा मारितो, दिवसें दिवस घोडा अशक्त होतो, कांहीं दि-वसानीं उभा राहूंही शकत नाहीं, पाय सुजतात, १ मिनिटांत ६९ ठोके नाडीचे बसतात, ही स्थिती फार दिवस राहत नाहीं, दहा दिवसांत बरा होईल किंवा मरेल. हा रोग दुसऱ्यास लागतो. कालऱ्याप्रमाणें स्पर्शजन्यरोग आहे. छाती सुजते किंवा वाईट ज्वर होतो, तेस-मयीं वरील चिन्हें दिसण्यांत येत नाहींत. नाडी फार जलद चालते,

नाकांतून शेंबूड फार पडतो, नाकपुडी फिक्कट होते, खोकला येतो, गळा दुखत असतो, भूक लागत नाहीं, तत्रापि खाण्यावांचून राहवत नाहीं. असें चिन्ह झालें असतां रक्त काढणें जरूर आहे तर १ शेराच्या आंत काढावें. रक्त काढणें तें रोगाचें पूर्वरूप असल्यास काढावें. ढाळकाची गोळी द्यावी. व पिचकारी मारावी.

जुलाब झाल्यावर तापाचें मिक्श्चर द्यावें व घोडा फार अशक्त झाला असेल तर पौष्टिक औषध द्यावें. केव्हां केव्हां पोर्टवाईन व बीर दारू पिण्यास द्यावी.

घोड्याचे खांद्यावर जखम होते त्यास.

डुकराचे किंवा चित्त्याचे चावण्यानें झालेली जखम. चित्त्याची जखम थंड पाण्यानें धुवावी. घोड्यास जखम फार झाली असेल तर घोडा मरेल. जखम धुतल्यावर कुत्र्याचें डोकें जाळून जखमेवर लावावें.

धोत्र्याचीं पानें, व त्यांत खाण्याचें मीठ घालून कुटून जखमेवर लावावें. जखम फार झाली तर हातानें आंतील सर्व काढून औषध तीन चार दिवस त्यांत भरावें. जखम पक्क झाली तर लोखंड तापवून डाग द्यावा. व त्यावर खालीं लिहिलेलें मलम लावावें:—

आंबेहळद ८८८९ टांक, व सज्जीखार १८ड्राम, दोन्हीं बारीक करून जखमेवर लावावीं. ह्मणजे मुरदाड मांस जाईल. दांतवण, व जैपाळाचीं पानें घेऊन वाळवावीं. मग पाण्यांत शिजवावीं. तीं बारीक करून लेपाप्रमाणें जखमेवर लावावीं.

घोड्यास नाळ पडली तर त्यावर.

बाभळीची साल घेऊन त्यांत पाणी घालून गरम करावी. त्यांत काथ घालून पाजावी. व त्याच पाण्यानें जखम धुवावी. जुना चुना घेऊन कापडांत लावावा.

तुरीची दाळ तव्यावर जाळून त्याची राख करावी. व त्यांत तेल घालून त्याची पट्टी लावावी.

जुनी चिंच जखमेपुरती घ्यावी. ती बारीक करून त्यांत नरमूत्र घालूनकढवावी व जखमेवर तीन दिवस लावावी. बकरीची किंवा उंटाची, किंवा म्हशीची किंवा कुत्र्याची हड्डी जाळून जखमेवर-लावावी, दहा पंधरा दिवस असें करावें.

पाठीवरचे जखमेंतून पिवळें पाणी जातें त्याजवर—जखम वस्तऱ्यानें फाडावी, मुरदाड मांस काढावें. बिबवे शंभर दोनशें, कापूस ह्मणजे रुई, मेण, चिंच मूठभर, हळद छटाक, व बकऱ्याचे कर्डीची चर्बी बारीक करून पट्टी लावावी. खोगीर जपून घालावें. दहा पंधरा दिवस असें करावें ह्मणजे नवें मांस येईल.

मलम करणें तें पाठीवर किंवा कोठें जखम झाली असेल त्यावर लावणें. मलम खालीं लिहिल्याप्रमाणें—

शंखजिरें तोळा १, मुरदाडसिंग तोळा १, पारा तोळा १, डिकेमाली तोळा १, काथ तोळा १, व बाभळीची साल तोळे २, सर्व कुटून लोण्यांत मिळवावी. गुडगुडीच्या पाण्यानें जखम धुऊन मलम लावावें.

दुसरें मलम—सोरा एक तोळा,मीठ१तोळा जंगला६ सहा मासे, धोत्र्याचीं पानें मूठभर, बारीक करून च्यार दिवस बांधावें.

सज्जीखार व हळद, बारीक करून अल्याचे रसांत मिळवून पट्टी लावावी.

सरडा जंगली एक आणून मडक्यांत घालून त्यावर नरमूत्र घालून तीन दिवस जमीनींत पुरून ठेवावें. नंतर काढून कडू तेलांत कढवावें आणि जखमेवर लावावें.

मेण, काथ, अंब्याची साल, चर्बी, सुपारीची ह्मणजे पोफळाची साल, चिंचेची साल, मुरदाडसिंग, शंखजिरें, बाभळीची साल, अ-

घाडा, व कापूर, हीं सर्व बारीक करून, व मेण चर्बी कढवावी आणि त्यांत सदर्हू वर सांगितलेल्या जिनसांची पूड घालून ती खलावी. व कांहीं दिवस जखमेवर लावावी.

मेण तोळा १, साबण तोळा १॥, व ऊद, पैकीं ऊद बारीक करून कढईंत घालून तिन्ही औषधें कढवून ठेवावीं, आणि निवालीं ह्मणजे नाळीस लावावी.

घोडा विस्तवानें भाजला तर अंगावर फोड उठतात, व अंगावरील कातडें जळतें, त्यावर उपचार.

पाणी आणि मीठ अंगास चोळावें, नंतर शाई टाकावी. हळद, कापूर, सफेता, व दाळिंबाचे फळाची साल जाळून बारीक करावी. त्यांत गुलाबपाणी घालून अंगास लावावें.

शेंदूर, व तिळाचें तेल एकठिकाणीं करून पिसानें लावावें.

सफेता, व मुरद्राडसिंग, हीं दोन्ही बारीक करून गुलाबाचे पाण्यांत कालवून अंगास लावावीं.

रक्तचंदन, कापूर, सफेता, व मुदराडसिंग, सर्व बारीक करून तिळाचे तेलांत कालवून अंगास लावावें.

केंस जाळून त्याची राख, चंदन, सिप्या, व कण्हेरीचे झाडाची साल जाळून मुलाचे मुतांत कालवून अंगास लावावें.

घोड्यास दुसऱ्या जनावरांनीं केलेल्या जखमेवर उपाय.

घोड्यास जर चित्ताजनावरानें जखम केली तर ती पिंवळी होते. व त्या जखमेंतून पिंवळें पाणी निघतें. रक्त लाल होतें, रक्तांत मांजराचे डोळ्याप्रमाणें चमक होते, थंडपाण्यानें धुवावें. नंतर बेडकुळी घेऊन चिरून त्यावर बांधावी व नाळीच्या औषधांत सांगितलेलें

मलम ऊन करून चोळावें.

घोड्यास जर वाघानें जखम केली तर माटव मासळ्या कुटाव्या, पांढरीं जिरें त्यांत मिळवावीं आणि जखमेवर बांधावीं. ह्मणजे विष निघून जाईल. नंतर मुरदाडशेंग व शंकजिरें बारीक करून जखमेवर चोळावें.

घोड्यास जर डुकरानें जखम केली तर—ती जखम मिठाच्या पाण्यानें धुवावी. नंतर चांगली माती भरावी. दुसरे दिवशीं माती निघून गेल्यावर त्यांत शिरका घालावा.

तीर व तरवारीचे जखमेवर उपाय–सुतानें जखम शिवावी. रक्त वहात असेल तर औषध घालून बंद करावें, नंतर शिवावें. स्पंज जाळून बारीक करावें आणि जखमेवर चोळावें म्हणजे रक्त बंद होईल. तीन दिवसानंतर पिंवळें पाणी निघेल तेव्हां धुऊन टाकावें. आणि स्पंज जाळून भुकटी घालावी.

घोड्याचे अंगांत तीर गेला असेल व तो निघत नसेल तर आसपासचें मांस कांपून टाकावें. नंतर रक्त बंद करण्याचें वर लिहिलें आहे त्याप्रमाणें तीन दिवस करावें. व वर लिहिल्याप्रमाणें मलम लावावें व जखम भूत जावी.

मेण, कापूर, बचनाग, अजवान, खुरासनी दोन तोळे, व तिळाचें तेल, १ तोळाप्रमाणें पहिल्या चार जिनसा घ्याव्या व तेल आठ तोळे घेऊन, त्यांत सदहू जिन्नस बारीक करून कढवावे.

जखमेंत किडे झाले तर उपाय.

कापूर, चिंचेचा रस, मिठ खाण्याचें, हिंग, तपकीर, चुना, व डिकेमाली, चिंचेच्या रसांत कढवून कीड पडलेल्या ठिकाणीं बांधून पट्टी बांधावी. गहूं शिजवून गरम गरम वर बांधावे. ह्मणजे कीड मरेल.

चुना, तंबाखू, डिकेमाली, व मीठ, हिंग सारखे वजन करून घेऊन बारीक करावे व जखमेंत भरावे.

शरीराचे रोग प्रकार सात.

१ देबाकबदिया.—काळजाजवळ मोठाले फोड होतात.

२ एरकान.—अगर (पिळा.) घोड्याचें शरीर पिंवळें होतें.

३ ताप.–प्रसिद्ध असून वर त्याचें विवेचन करण्यांत आलेंच आहे.

४ हैजा.—किंवा (कालरा) अजीर्णापासून होतो.

५ शिल.—घोडा दुबळा होतो.

६ खिनाने खुष्क.—घोड्याचें सर्व शरीर सुकतें व दुबळा होतो.

७ खिनानतिर.—सर्व शरीरास फोड होतात.

पहिला प्रकार.—दबाकबदिया. घोडा डोकें जमीनीस लावतो. असें घडीघडी करतो, सारावेळ पुकारतो, घाम निघतो, डोळे खोल जातात. तंगाजवळच्या दोन्ही शिरांचें रक्त पुष्कळ काढावें. रेवाचिनी गुलाबपाण्याबराबर पिण्यास द्यावी, खाण्यास गवत घालूंनये. दुसरे दिवशीं हिरवी हरियाळी पाण्याजवळ होते ती व हिरव्या खरबुजाचें पाणी द्यावें. त्याचे नाकांत गुलाबपाणी घालीत जावें.

दुसरा प्रकार एरकान—खोकल्यापासून होतो. सर्व शरीर व कान पांढरे, आणि डोळे व तोंड पिंवळें होतें. रक्तही पिंवळें निघतें. हा रोग काळजाजवळ गरमी झाल्यानें होतो. इलाज करावा तो येणेंप्रमाणें.—शरीर काळें पांढरें झाल्यास डोळ्याखालील रक्त काढावें. ताळूजवळचेंही रक्त काढावें. नाकांत औषध घालावें. गुलाब, कापूर, नबशाचें तेल व लाल फूल हें घालावें. पाण्याजवळ हरीयाळ होतो त्याचा रस व खरबुजाचा व वेळूचे पानाचा रस पाजावा.

इलाज.—मेंदी, रक्तचंदन, काकडीचें बीं, बरोबर घेऊन पाण्यांत पाजावें. सर्व वजन एकवीस रती असावें.

तिसरा प्रकार. ताप.—घोडा सुस्त होतो, डोळे लाल होतात. शरीर गरम होतें, अंड खालीं उतरतात, ओंठ सुकतात व गवत खात नाहीं.

इलाज.—मागल्या दोन शिरांचें रक्त काढावें. अजमोदा व अळशी बराबर घेऊन घोड्यास पाजावें. गंधान व दारू, खारके बराबर द्यावी.

दुसरा इलाज.—हिरवी अळशी घेऊन अजमोद्याचें बीं गंधाना बराबर घेऊन बारीक करावें. समुद्राचें (मिठाचें) पाणी घालून कढवावें, बच फशाचे तेलाबराबर द्यावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—गरमीचे तापावर, थंड औषध द्यावें. धने सुकलेले, पांढरें जिरें, सफेद तालीमखाना, सुंठ, वावडिंग, आणि अडुळशाचीं पानें, या सर्वांस बारीक करून कढवावें व मधाबरोबर दोन किंवा तीन दिवस द्यावें. अनुभव आहे.

तोंडांतून थुंका जाईल व तोंड उघडील तर खडीसाखर खाण्यास द्यावी. अनुभव आहे.

डिंक केथराचा अतपाव, तालीमखाना छटाक व पांढरी साखर छटाक, डिंक सारेरात्र भिजत ठेवावा. मग गोंद व तालीमखाना यांत साखर घालून खाण्यास तीन दिवसपर्यंत द्यावें. अनुभव आहे.

घोड्याचे शिंगरास मातीपासून किंवा गरमीपासून ताप येतो. त्यावर लोणी सवापैसाभार, अफू दोन पैसेभार, शेराचीं पानें, व काळे धोत्र्याचीं पानें दोन तीन. अफू व लोणी मिळवून तीन दिवसपर्यंत खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—घोड्यास गरमीपासून ताप येतो त्यावर.

खाण्याचें अजवान अतपाव, भांग तीन मासे, व तिळाचें तेल चार पैसेभार. दोन्ही घालून शिजवावें. नंतर बारीक करून अतपावप्रमाणें ज्वारीचे पिठांत तीन दिवसपर्यंत द्यावें. अनुभव आहे.

तापावर इलाज.—अंब्याचे झाडाची अंतरसाल अतपाव, पांढरा काथ एक तोळा, गुग्गुळ एक तोळा, व चुना कळीचा तीन मासे, हें सर्व बारीक करून पाण्यांत भिजवून दहीं मिळेल तर चांगलें,

सर्वांचा रस काढून काथ मिळवावा. नळीनें घोड्यास पाजावें. अनुभव आहे.

गरमीचे तापावर.–कंगई झाडाचीं पानें मूठभर,व कवठीचे झाडाचीं पानें मूठभर, बारिक करून लोणी अतपाव घेऊन व खडीसाखर एक पैसाभार घालून एकत्र करून एक घोड्यास किंवा दोन घोड्यांस खाण्यास द्यावें. घोडा बरा होईल.

तापावर—एका कच्चे डाळिंबाची साल, व एक जायफळ, दोन्हीं पोकळ करावीं. तीन मासे अफू जायफळांत भरावी. शहाजिरें तीन मासे, अर्धे जिरें डाळिंबांत भरावें. नंतर जायफळ डाळिंबांत घालावें. अर्ध शहाजिरें राहिलें तें जायफळावर ठेवावें. मग गव्हाचे पिठानें डाळिंब कपडबंद करावें. शिजविल्यावर डाळिंब पिसावें (बारीक करावें) आणि चवदा गोळ्या कराव्या. व गाईचे लोण्यांत चौदा दिवस घोड्यास द्याव्या. लोणी न मिळेल तर चक्का दह्यांत द्यावें. अनुभव आहे.

तापावर गरमीपासून शूळ होतो त्यावर.—जंगली बोर, कलोंजी, सफेत जिरें, धने, तालीमखाना, अवळकांठी,मुराठी, वावडिंग, सेवतीचें फूल, बोरांच्या बियांचा मगज, निलुफराचें फूल, खिरपाचें बीं, पित्तपापडा, काळींमिरें, मिरच्या, बडिशेफ,मनुका,व कांकडीचें बीं, हीं सर्व एकत्र करून वस्त्रगाळ करून पहिले दिवशीं अर्धाशेर द्यावें. किंवा सगळें द्यावें. तें अर्धाशेर साखर व पाण्याबराबर द्यावें. अनुभव आहे.

रक्तपित्तावर उपचार.—सर्व शरीर सुखतें, प्रकृती गरम होते, पायावरचे केंस चमकतात, फोड होतात, घोडा तोंड खालीं करतो, त्यावर इलाज नाहीं परंतु एक आहे.—

सर्व शरीरास चोपड करावी, व मालीस करावें. सुका घांस व दाणा देऊं नये. दशमूळ पंधराशेर पाण्यांत कढवावें, दोनशेर पाणी राहिल्यावर थंड करावें, तें पाजावें, बरें होईल.

दुसरा प्रकार.—घोडा वरून पडल्यापासून होतो. सफर फार करून आला असला तर किंवा सांचलें पाणी पिण्यापासून होतो. रोज रोज घोडा दुबळा होतो, मोठें पोट होतें, केंस चमकतात, चलाखी जाते, तोंड लाल किंवा पिंवळें होतें, छाती उडते, शरीर गरम होतें, दाणा वगैरे फार खातो,खोकला होतो.

उपचार.—एरंडीचें तेल, चित्रकसाल, हिरडे, बाळहिरडे, व अमला पांच पांच टांक घेऊन वस्त्रगाळ करावें. पिण्याचे दारूंत सकाळीं द्यावें. त्यावर गुळाची दारू पिण्यास द्यावी.अनुभव आहे.

दुसरा इलाज.—पित्तपापडा, मिरच्या, सहा सहा पैसेभार व वेळूचीं पानें नऊ पैसेभार घेऊन बारीक करून सकाळीं व संध्याकाळीं द्यावें. लाल मिरच्या, व तब शीरखस (वाळा), प्रत्येक १ पैसेभार घेऊन अर्धाशेर बकरीचें दूध घालून गरम करून पाजावें. एकशेर लाख, चारशेर तिळाचे तेलांत कढवावी, व ती अंगास लावावी. घोड्याच्या मांडीचें रक्त काढावें, बकरीचें किंवा हर्णाचें हिरवें, किंवा डुकराचें कोणतें तरी मांस दोनशेर घेऊन नऊ टांक लाल मिरच्या कालवून व चारशेर मध, मासांत घालून शिजवावें व सकाळीं खाण्यास द्यावें.

चवथा प्रकार, हैजा—पोटांतून उलटी होते तेव्हां रक्त काढावें. तें तंगाजवळच्या दोन्हीं बाजूंचें काढावें. बोराअरमणी पाजावी. उलटी बंद होईल. नाकांत दारू व बोराअरमनी घालावी.

खारीक कच्ची, व गुलनार, बारीक करूनें पाजावें. चिकंदर किंवा अंजिराचें पाणी पिण्यास द्यावें.

दुसरा इलाज.—सोरा तीन मासे बारीक करून दाण्यांत किंवा भुश्यांत द्यावा.

उलटीवर इलाज न केला तर घोडा मरतो. आजवान आठराटांक, लिंबें पंचवीस, सज्जीखार पांढरा आठरा पैसेभार, हिंग एक टांक,

स्वारी करूं नये. असें केल्यानें घोडा गरीब होईल, अशी रीति हिं-दुस्थान व दक्षण या देशचे लोक फार करितात. यांत घोड्यास इजा होत नाहीं. अनुभव आहे.

खच्चि करते वेळेस अंडाच्या शिरा किंवा कान, नाक, मान, या ठिकाणचें रक्त काढल्यावर बंद न होईल तर त्यावर उपाय.— कापसाचा तुकडा रक्त जातें तेथें ठेवावा. बंद होईल. दुसरें औषध, हिरडे, बाळहिर्डे, अमला, अजमोदा, अजवान, नेपतीचे झाडाची डा-हाळी, बोळ, शेंदेलोण, व राई, हें सर्व एकत्र करून बारीक करावें, साखर व पाणी किंवा गरम दुधांत सात दिवस द्यावें. रक्त बंद होतें.

कांहीं चुना, व अंड्याची सफेदी दोन्ही एकत्र करावी. रक्त निघते वेळेस तेथें लावावें. त्या वेळेस रक्त बंद होईल. अनुभव आहे.

दुसरा प्रकार.—सुतेऱ्याचीं जाळीं, रक्त निघत असेल तेथें लावावीं, त्याच वेळेस रक्त बंद होईल. अनुभव आहे.

घोडा हरामखोर असतो, गरीब होत नाहीं त्यास उपाय.— अंबट लिंबू याचें बीं एक पैसाभार, राजहंस, काथ पांढरा एक पैसाभार, कितराचा गोंद एक पैसाभार, कापूर छटाक, केळ्याचे कंद, चार पैसेभार, निंबाचीं पान दोन पैसेभार, व निळंबु एक तोळा, हें सर्व बारीक करून थंड पाण्यांत दररोज सकाळीं एकवेळ सर्व द्यावें. याचप्रमाणें तीन किंवा सात दिवस करावें. घोडा गरीब होईल. अनुभव आहे.

दुसरी रीत.—गरमी असेल तर काथ पांढरा दोन तोळे, कितरा गोंद दोन तोळे, निळवडी दोन तोळे, कापूर दोन तोळे, फटकी दोन तोळे, अंबट लिंबाचें बीं छटाक, लिंबाचीं पानें छटाक, शेवाळ छटाक, कापूर तोळे दोन, गोंदणी झाडाचीं पानें, धने एक तोळा, कोरफडीचा मगज छटाक, तवशित एक तोळा, भांग एक तोळा, कंगई झाडाचीं पानें दोन तोळे, पित्तपापडा एक तोळा,

सुपारीचें फूल एक तोळा, नागरमोथे, एकतोळा, वाळा एक तोळा, गुलखैरचें फूल, फटकी एक तोळा, जिरें पांढरें एक तोळा, धमासा एक तोळा, तालिमखाना एक तोळा, अमळा एक तोळा, मुळहाटी एक तोळा, बोराचें बीं तोळा, गुलेसेवतीचें फूल सहामासे, काकडीचें बीं एक तोळा, निलूफरचें फूल एक तोळा, खिऱ्याचें बीं एक तोळा, केळीचा कंद एक तोळा, सर्व बारीक करून मडक्यांत ठेवावें. मग सर्व रात्र दहिवरांत ठेवावें. चवथा हिस्सा सकाळीं घोड्यास द्यावा. दुसरे वेळेस एक हिस्सा, तिसरे वेळेस दोन भाग. घोडा गरीब होईल. अनुभव आहे. हें सात दिवसपर्यंत द्यावें, एका दिवसांत तीन वेळ द्यावें, अन्डावर, अन्डाचे शिवणीवर, व शेपटीवर डाग द्यावे.

साप चावला तर घोड्याचे दांत पडतात. हातपाय दुखतात. मुखांतून घाण येते. त्यावर उपचार—मिरची वीस टांक, घेऊन बारीक करून पिण्याचे दारूंत नाकांत घालावी. साप चावला तर तोंड बंद होतें. जीभ हिरवी होते. वाळतो. यावर उपाय नाहीं. हिरवी झाली नसेल तर उपाय करावा. तो येणेंप्रमाणें–सांध्यावर थंड पाणी घालावें. केंस अंगावर उभे न राहिले तर घोडा दुरुस्त होईल. जेथें साप चावला असेल तेथील केंस शस्त्रांनीं काढून टाकावे. रक्त काढावें, शीर काढण्याची असेल तर काढावी.

तेल, मीठ, शहाजिरें, मिरच्या, तेल, व सागाचें पाणी सुमारानें घेऊन घोड्यास पाजावें. लिंबाचा पाला तेलांत खाण्यास द्यावा.

गांधीण माशी तोंडावर, डोळ्यावर किंवा गुद व शिश्नावर चावली तर त्यास उपाय–जैपाळाची बी, शिरक्यांत उगाळून लावावी आणि कांद्याचा रस शिरक्यांत लावावा.

पिसाळलेला कुत्रा चावला तर त्यावर उपाय–कारळे, कडू वृंदा-

वन, गंजना कोई, कुटकी, पाषाणभेद, नाबशेर झाडाचा गोंद, कांदा, व मिरची एक सारखें बरोबर घेऊन त्यामध्यें गुलाबपाणी ४ चार टांक घालून तें घोड्यास पाजावें.

बोळ, गोंद बारखीं, गोंद तरसीत, तूत, डाळिंबाचीं मुळें हें सर्व शिरक्यांत कुटून पाजावें व चावलेल्या ठिकाणीं लावावें.

जखमेस औषध.—वरडीच्या (तरवटीच्या) मुळीची साल, करंजमुळाची साल व मीठ हें सारखें घेऊन वाटावें आणि जखमेवर लावावें. वर पिंपळाचीं पानें व चिरगुटें बांधावीं. असा क्रम चार दिवस करावा. नंतर त्याच दिवशीं जोंधळ्याचा डोंबरा व बंदी एकत्र करून वर बांधावें. आणि वर दहींभात बांधावा, मग चिंचेच्या झाडाची साल जाळून राख करावी. ती राख आणि लोणी एकत्र करून, जखमेवर लावावें, तीन दिवसांत बरें होईल. हें राखेचें मलम लावण्याचे अगोदर जखम तांदुळाचे कांजीनें धुवावी.

बचनाग व हरताळ हीं दोन्हीं समभाग घेऊन चूर्ण करून लिंबाचे रसांत किंवा विड्याच्या पानाचे रसांत कालवून त्याचा लेप करावा. असें एक दिवस करून मग जखमेवर दहीं-भांत बांधावा.

दालिंबा सोमल एक टांक घेऊन तेलांत खलून जखमेवर लावावें. दोन दिवस असें करून नंतर तुरटी खापरांत घालून, भाजावी, हें सहाणेवर घालून वाटून जखमेवर बांधावें. असें सात दिवस करून वर गोणपाट बांधावें. दांत लावूं देऊं नये ह्मणजे जखम बरी होईल.

पिंपळाच्या व चिंचेच्या साली खापरांत घालून भाजाव्या, आणि जाळून त्याची राख करावी. ही राख तीन दिवस जखमेवर लावावी.

वर चिरगुटें बांधावीं. आणि त्यावर दोन दिवस दहींभात बांधावा. नंतर लिंबाचे रसानें धुवावें. आणि हिंगणांच्या साळीची राख वर लावावी.

जखमेवर मीठ आणि आंबील १ दिवस लावावी. त्यावर गोंवरीनें घासून लिंबाचे रसानें धुवावें. आणि त्यावर, चुना व मोरचुद लावावा.

कोणतेहीं 'जनावराचें शिंग जाळून त्याची राख व सरडा जाळून त्याची राख व काळे रंगाची नीळ हे सर्व जिन्नस मुरदाड तेलांत खलून जखमेवर व नाळीवर लावावें. ह्मणजे लौकर बरें होईल.

धोत्र्याचा पाला व सोरमीठ, एकत्र करून कुटावें. आणि जरा चोळून लावावें. जखम पिकली असल्यास चिरून कुजलेलें मांस काढून टाकून, निर्मळ करावें, मग सालई झाडाची साल, वाळवून कुटून बारीक पूड करावी, आणि जखमेवर लावावी. ही साल न मिळाल्यास तरवडाचा पाला मिळवून त्याची पूड करावी. व ही जखमेवर लावावी. हा पाला न मिळाल्यास हिरडे मडक्यांत घालून जाळावे. नंतर त्याची राख वस्त्रगाळ करून, जखमेवर लावावी, जखम धोड्यास खाजवूं देऊं नये.

जुना कापूस नीट करून जखमेवर चिकटवावा. उत्तम अनुभवशीर आहे.

बचनाग ००३, टांकणखार ००३, सोमलखार ००३, रुईचा चीक ००९, हीं सर्व औषधें नव्या लोटींत घालावीं व रानगोवऱ्यांनीं जाळावें. व राख झाल्यावर ती राख तिळाचे तेलांत खलून जखमेवर तीन अथवा चार दिवस लावावी. यांस उतार दहींभात वाटून २ दिवस लावावा. ह्मणजे बरें होईल.

टांकणखार ॥॥४, सोमलखार ॥॥४, जवखार ॥॥४, जंगला ॥॥४, हीं औषधें कुटून आल्याचे रसामध्यें रिठ्याच्या बी प्रमाणें गोळी बांधावी. प्रातःकाळीं निर्गुडीचा पाला मूठभर, व गोळी १ मिळून पोटांत द्यावी. सायंकाळीं ओंधळ्याचें पीठ १ मूठ, ओंवा एक मूठ, व गोळी एक, दाणा खाल्लयावर सायंकाळीं देणें. बरें होईल.

घोड्यांस दंश झाला तर त्यावर उपचार—याच्या योगानें अंगाचा दाहा होतो, घाम येतो, डोळ्यांच्या पापण्याचें केस झडतात. व वरचेवर मळमूत्र करितो. फार खात नाहीं. त्यास औषध—कोष्ट, काडेचिराईत, पिंपळी, चित्रक, भद्रमोथा, हीं सर्व प्रत्येक ॥॥९ प्रमाणें घेऊन त्याचें चूर्ण करून पोटांत द्यावें. मग तांदुळ-ज्याच्या मुळ्या व कवठाचे मूळाची साल हीं दोन्ही एकत्र करून पिण्यास द्यावीं.

घोडीचे पोटांत शिंगरूं ठरत नाहीं त्यावर.

घोडीचे पोटांत शिंगरूं ठरत नाहीं त्याचें कारण असें आहे कीं, गर्भस्थान वाईट असतें. सफेत पाणी त्यांतून निघतें. त्यावर इलाज. माजूम, जायफळ, लसूण, व अंबेहळद, हीं सर्व बरावर घेऊन पांढरे दारूं-त कढवावें व तें पिण्यास द्यावें. म्हणजे पडणार नाहीं. खालीं लिहिलेलें औषधानें पडेल.—मिरची, सुंठ, केशर, हिंग, सुलेमानी साखर, व चिंच बरोबर घेऊन कढवून पिण्यास द्यावें. तें दर रोज एक रत्तल द्यावें. त्यानें पोटांतील शिंगरूं पडेल.

शिंगरूं पडणार नाहीं व वाढेल त्यावर.—काथ पांढरा अर्धे पैसाभार, निंबाचीं पानें पिकलीं छटाक, व गूळ अतपाव, एकत्र करून तीन गोळ्या कराव्या व दर रोज एक द्यावी.

पोटांत शिंगरूं मेलें तर काढण्याची रीत—रक्त काढावें. त्या पूर्वी बनफशाचें तेल मनुष्यानें आपले हातांस लावून ते हात घोडीचे योनींत घालावे. शिंगरूं बराबर झालें कीं नाहीं तें खालपासून पहावें आणि हलके हातानें काढावें. योनीचे जवळ आणावें. आणि योनि धुवावी. ती इसपरक व बनफशाचें तेल यांनीं धुवावी. ह्मणजे सहज निघून येईल.

शिंगरूं पालथें आलें तर किंवा मान वांकडी असली तर कांपून काढावें. नंतर जैतूनचें तेल घोडीचे योनींत तें कढवून घालावें. जिरें, मीठ, किंवा दारू, व हिरा हिंग घालावा. योनि बांधावी. पीठ, जिरें व जैतूनचें तेल निम्मे गरम करून तीन दिवस खाण्यास द्यावें. पोटांत शिंगरूं मरेल तर—पांढरीसाखर एकशेर, व बडीशेप अर्धशेर. बडीशेप बारीक करून साखरेंत घालून पांच शेर पाण्यांत छाणून ध्यावा. नळींत घालून पाजावें. शिंगरूं लागलेंच बाहेर पडेल.

शिंगरूं ठरण्यास उपाय.

घोडीचें फूल वांकडें असतें किंवा घोड्याचें शरीर तेढें असलें तर अरबलोक घोडीस आठ दिवसांतून दोन दिवस पाणी पिण्यास देतात. तिचे शरीरास चमेलीचें तेल व अंबर यांनीं धुऊन टाकितात. आणि घोडा देतात तेणेंकरून शिंगरूं ठरतें.

दुसरा इलाज.—शिंगरूं ठरत नसल्यास पळसाचें कांचें मूळ अर्धाशेर आणून भाजावें. अर्धाशेर कच्चें ठेवावें व गाईचे लोण्यांत तीन दिवस द्यावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—मेथी अर्धाशेर, सित झाडाचे तेलांत तीन दिवस ठेवून नंतर ती मेथी तीन दिवस खाण्यास द्यावी.

गाईचें लोणी पावशेर, बेलफळ पावशेर व खडीसाखर पावशेर, एकत्र करून सात दिवस खाण्यास द्यावें. नंतर घोड्यास चढवावें. उडदाचें पीठ अर्धाशेर, लहान मासे बारीक करून ते पिठांत एकत्र करावे. व त्याच्या सात गोळ्या कराव्या. सकाळीं दाणा पाण्याचें पूर्वीं एक द्यावी. व घोडा देते वेळेस तिळाचें तेल योनीस लावावें. अनुभव आहे.

घोडीचे योनीवर दर्द होतें त्यास.

घोडा घोडीचा एकत्र संयोग होऊन घोड्याचें शरीर मोठें असल्यानें व घोडीचें शरीर कमी असेल तर असें होतें. दोन वर्षांची घोडी असल्यास असें होतें. किंवा घोडी अशक्त असल्यानें होतें. मूत्रद्वार व गुदद्वार एक होतें.

इलाज.—सांबराचें शिंग आणून तें शरीरांत घालून हालवावें. किंवा किनारा कांपून तो रुईचे धाग्यानें शिवावा.

घोडीस मोठा घोडा दिला तर रक्त व पूं वाहतो त्यावर इलाज.

वावडिंग, गाईचे तुपांत कढवून थंड करून तें तूप कपड्यास लावून पलिता करावा आणि योनींत घालावा. एक आठवडायाप्रमाणें करावें.

घोडें जन्मते वेळेस शरीर बाहेर पडतें व त्या वेळेस रक्त व पू येतो त्यास.

असें झालें असल्यास घोडीस इजा फार होते. ओरडते. शिंगरूं बाहेर पडत नाहीं (निघत नाहीं) त्यावर उपचार. डाग द्यावा.

व वावडिंग, वच, चोक, इसगंध, इसबंध, काळाबोळ, कळुंजी, संभाळूचें पान, टाकणखार, गंधक, सेजना झाडाची साल, चित्रक, पिंपळीमूळ, हिंग, शिरसाचे झाडाचें बी व साल, प्रत्येक छटाक घेऊन दररोज दोन पैसेभार शिजवून एरंडीचे पावशेर तेलांत देणें.

घोडीचे शरीरांतून पिंवळें किंवा काळें निळें गढूळ पाणी वाहतें. घोडीवर दुसरें जनावर चढलें तर किंवा वोझ्यापासून ही असें होतें. त्याजवर उपाय, डाग द्यावा.

घोडीचे सडाची बेमारी

ही तीन प्रकारची आहेः सडांतून दूध येत नाहीं, बंद होतें; त्यावर फोड येतात; व सडाचा पडदा कमी असल्यामुळें दूध वाहतें. सडावर लेप करावा. गरम भाकरीचा मगज किंवा केशर किंवा कापसाचे सरकीचा मगज व बेदाण्याचा मगज, सारखे घेऊन बारीक करून शिरका व दारू यांत मिळवून सडास लेप करावा.

दुसरा प्रकार.—फोड होतात तेणें करून दूध नसतें. गिले अरमणी, गुलाब, व हळद या सर्वांचें मिश्रण करून लेप करावा. तो दिवसांतून दोन वेळ करावा व बनफशाचें तेल, व निलुफर याचें तेल यांत धन्याचें पाणी घालून शिजवावें व तें सडास लावावें.

दुसरा इलाज.—लालगुलाब फूल वाटून लावावें.

तिसरा प्रकार.—सडांतून दूध जातें. दूध फार असल्यामुळें किंवा शिंगरूं पीत नसल्यामुळें किंवा सडाचें तोंड मोठें असतें त्यामुळें असें होतें. त्यावर गुलेसुर्खफूल शिरका व दारू यांत मिळवून लेप करावा. अनुभव आहे.

दूध जास्त होण्याचा प्रकार पूर्वीं सांगितला आहे.

मादीचें मूत बंद झालें तर.

१ एक बत्तासा घेऊन त्यांत काळीं जिरें याची पूड घालावी. व तो बत्तासा घोडीचे शरीरांत घालावा. हुसन अह्लींचें हें औषध आहे.

१ सागवानाचें बीं, चवथा हिस्सा पाणी त्यांत घालून अर्क काढावा. आणि नळीनें पाजावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—गुलखेर (पळस) याचीं फुलें, पानें, व बीं, मुळी यांचा काढा करावा. गरम पिण्यास द्यावा. हा इलाज मादीविषयीं. अनुभव आहे.

१ दुसरा इलाज.—पिंपळी व लसूण बारीक करूनगोळ्या कराव्या. घोड्याचे किंवा मादीचे शरीरांत ठेवाव्या. अनुभविक आहे.

आणखी इलाज.—अघाड्याचें चूर्ण पाण्यांत द्यावें. अनुभव आहे.

घोड्याबरोबर घोडीनें चालावें, हत्याण करूं नये, किंवा घोड्याचा तिरस्कार करूं नये, असें करण्यास उपाय.—

तुरटी २० वीस ग्रेन एक औंस पाण्यांत मिळवून योनीवर पिचकारी द्यावी. सुगर आफ लेड एक ड्राम, ओपियम एकड्राम, व लिनसिड मिल, बरोबर गोळी करून सकाळीं व संध्याकाळीं खाण्यास द्यावी. थंड पाण्यांत घोडी उभी करावी, कमरेवर थंड पाणी टाकीत जावें. पांढरें जिरें व काथ केळींचे पाण्यांत भिजवून पाजावें.

इलाज दुसरा.—टेसुचे फूल अर्धाशेर किंवा कमी, मनुष्याचें पिसाबांत शिजवून कपड्यांत ठेवून शरीर शेकावें. नंतर निम्मे गरम झाल्यावर दोन तास शरिरावर बांधावे.

दहाशेर पाणी कढऊन (आधणाचे करून) घोड्याची शेपूट त्यांत घालावी ह्मणजे लवकी होईल. न झाली तर लोहाची सळई लाल करून बेंबीवर डाग द्यावा.

घोडीस घोडा दिला असतां गर्भ रहात नाहीं त्यावर इलाज.

घोडीस बारा कोस चालवून न्यावी ह्मणजे जोर कमी होईल. नंतर घोडा द्यावा. गर्भ ठरेल.

कथल्या गोंद एक पैसाभार, व चुन्यागोंद एक पैसाभार, दोन्ही गोंद शिजवावे, त्यांत मैदालकडी पाऊण पैसाभार बारीक करून गाईचें दूध एक शेर घेऊन त्यांत तिन्ही जिन्नस घालून नळीनें पाजावें.

पावशेर पिठीसाखर,व गाईचें लोणी पावशेर दोन्ही एकत्र करून दर-रोज सकाळीं सात दिवसपर्यंत द्यावें.आठवे दिवशीं घोडा द्यावा.गर्भ राहील.

ससाचें आंतडें गाईचे दुधांत घालून पनीर करावें; तें घोड्याचे शि-स्नांत घालावें किंवा त्यावर लावून घोडा द्यावा. गर्भ राहील.

खुब्यांत रहाणारे मांसांत लचक.

कारण—उतरणीचे जमिनीवर घसरून पडणें किंवा खालवर ज-मिनीवर घसरणें, अथवा वांकडा तिकडा पाय पडून मुरगळणें व खु-ब्यावर मार लागणें यापासून लचक भरते.

चिन्ह—पाय सुजतो व लंगडतो.

इलाज—गरम पाण्यानें शेकावें, सफेद लिन्यामेंट(सफेदाचें तेल) यानें खुबा चोळावा. टरपेंटाईन एक औंस, आमोनिया दोन ड्राम, व कापूर दोन ड्राम, व पाणी आठ औंस घेऊन त्यानें मालीस करावें. यानें बरा न झाला तर मोहोरीचें ह्मस्तर मारावें. काजूचे झाडाची साल, ओंवा, व अंबेहळद हीं बारीक करून ऊन करावें आणि दर्दावर तीन दिवस बांधावें; किंवा कडब्याचीं पानें ऊन करून बांधावांत.

खुब्याचा जोड सरकून लचक होते त्यावर.

कारण—उंच नीच जागेवर पाय पडल्यानें किंवा झटका लाग-ल्यानें होते.

इलाज—छस्तर मारावें, अंबेहाळदीचा लेप करावा, आणि रान-गौरीनें शेकावें, किंवा गरम पाण्यानें शेकावें. बेलाडोना एक ड्राम, व चर्बी एक औंस याचें मलम करून लावावें; बकऱ्याचे रक्ताचा लेप करावा. तरवटाचीं पानें, उंटाची व बकऱ्याची लेंडी मनुष्याचे लघवींत गरम करून लेप करावा.

जोड जोडण्याचे शिरांत लचक किंवा मांसाचे तंतू आंखडणें किंवा तुटणें याजवर.

कारण—उंच नीच जागेवर पिटल्यानें, मणगट लटपटल्यानें, कमताकत घोड्यापासून जास्ती मेहनत घेतल्यानें होतो.

चिन्ह—पाय सुजतो व लंगडा होतो.

उपाय—छस्तर मारावें नाहीं तर डाग द्यावा. ताजी दुखापत असेल तर ऊन पाण्यानें शेकावें.

ड्रापसी (जलोदर).

हा रोग कांहीं कारणानें पाणी जमत जाऊन होतो. हाच रोग नाहीं परंतु रोगाची खूण आहे. पोटांतून कांहीं बाहेर आल्यास चांगलें. किंवा जर इजा वाढतच चालली व घोडा दुबळा होत चालला तर हा रोग झाला ह्मणून समजावें, याचे योगानें आंत व बाहेर पाणी जमा होतें. हा रोग फारच वाईट आहे. ह्याचे योगानें घोडा मरतो, कारण आब्सा-रबंट (आंत खेचून भरणाऱ्या शिरा किंवा आंतडीं) खेंचून धरूं शकत नाहींत. कारण—कातड्याचा (त्वचेचा) व्यापार बंद झाल्यानें, किडना गुडदी) हीचें काम बंद झाल्यानें. लक्षण—लीद बंद होते, पोटां-तला अवाज ऐकूं लागल्यास ऐकूं येतो, एकादे वेळेस आपोआप फार घाणेचा जुलाब होतो, तो वाईट, घोडा मरतो मेल्याचें लक्षणें.—गुद-द्वाराचा रंग फिक्का पडतो आणि तें नरम राहतें. काळजाचे आंत पिंव-ळी वस्तु जमा होते, मेसेंटरीक ह्याचे आंत (झिल्लीची) पिंवळी वस्तु

जमा होते. मेसेंटरीक ग्लान्ड (खाल्लेल्या पदार्थांचे रस) खेंचून घेणा-रे मांसाचे गोळे खराब होतात. पाणी किंवा पू जमा होतो.

इलाज—पाणी काढण्याचे उपाय करावे. अंड व नाभी यांचे दर्म्यान भोंक पाडून पाणी काढावें किंवा टानिक (जिरणारी) किंवा डायो-रेटिक (मूत्र) होणारी दवा द्यावी, कीं, त्याच्या योगानें घाम किंवा मूत्र होईल. जन्शन एक ड्राम, व नायटर दोन ड्राम गोळी करून दिवसांतून तीन वेळ एक हप्ता द्यावी, जर मूत्र किंवा घाम फारच निघेल तर गोळी बंद करावी. व दुसरी दवा द्यावी. सल्फेट ऑयर्न एक ड्राम दाण्यांत किंवा भुस्सा यांत द्यावें. हें दिल्यापासून मूत्र किंवा घाम बंद झाला तर फिरून पाहिला दवा पोटास बारीक दोनशें भोंकें पाडावीं, त्यांच्यांतून वाहूं लागलें तर भाइलोकांचें माशाचें जाळें आणून पोटास बांधावें व त्याचेवर लेप करावा.—काळ्या धोतऱ्याचीं पानें पावशेर, चांगुणीचीं पानें, पठाणी लोद तोळा एक, ह्या सर्वांचा लेप करावा. नाहींतर धोतऱ्याचें बीं चारआणेभार, सोरा, अफू, कापूर, अजवान ह्यांची गोळी दिवसांतून दोन वेळा द्यावी. खाण्यास रानडोरलीवांगी हळदींत मिळवून द्यावी.

घोड्यास लंग्स रोग होतो त्याजवर उपाय.

ताप येतो, घोडा सुस्त होतो, बाजूच्या बरगड्याच्या शिरा उड-तात, नाडी जलद चालते, खोकला येतो, व नंतर घाम येतो, चैन पडत नाहीं, नाकपुडी तांबडी होते, मान वर करितो, कान आणि पाय फार थंड होतात, शेजेस येत नाहीं, बसला तर उठत नाहीं, त्याजवर उपचार—रक्त काढावें, एरंडेलाचा जुलाब द्यावा, पिचकारी ऊन पाण्याची मारावी. त्यांत मूठभर मीठ घालावें, बरगडीस ल्स्तर मारावें, पाय रगडावे. फ्लानेल ब्यांडेज करावा, गरम कापड अंगांवर ठेवावें, घोड्यास हवेवर बांधावें. नैटर, डिगी

टेलीस, टारटर इमेटीक व अंटीमनी यांची गोळी खोकला जाईपर्यंत द्यावी. नैटर १ औंस, डिगिटेलीस अर्धाद्राम, टार्टर इमेटीक दोन द्राम, जवसाचा मगज व पाणी मिळून गोळी करावी. एक वेळ रक्त काढून कांहीं नाहीं झालें तर एकदिवस जाऊन दुसरे दिवशीं रक्त काढावें. पौष्टिक खाण्यास द्यावें. कंठांतील शिरा किंवा कंठ सुकून कफ किंवा खकारे पडतील तर कफावरील औषध द्यावें.

कंजेकशन ऑफ लंग्ज म्हणजे फुप्फुसांतील सूज.

हा रोग आपोआप किंवा फार मेहनत केल्यानें होतो.

लक्षण—नाडी मंद चालते, दम फार मेहनतीनें घेतो, तसदी भोगतो, बेफाम होतो, दम व नाडी चालते किंवा नाहीं हें समजत नाहीं, परंतु तोंडासमोर बाटली लावली तर समजेल.

इलाज—गरम दवा द्यावी, मालीस करावें, फासण्या काढाव्या, राई, हिंग, पिंपळगाठी, वेरुसा, अलें, कुटकी, प्रत्येक तोळा प्रमाणानें घेऊन तेलांत गोळी करून पिण्यास द्यावी. अलोंज, हाळद, व काळा निमक, प्रत्येक पांच तोळे प्रमाणानें घेऊन त्याच्या दोन गोळ्या कराव्या. एक गोळी दिल्यावर पांच दिवसांनीं दुसरी द्यावी. ह्याप्रमाणें जुलाब द्यावा. छातीवर लावण्यास—राळ पावशेर, मोम (मेण) दोन, पैसेभार सिरसाचें तेल, बिब्याचें तेल, निंबाचीं पानें सर्व जिनसांत थोडें पाणी घालून वाफ द्यावी व छातीवर बांधावें.

घोड्याचें औषध १ सेंबा २ सिंगाडा ३ कुरकुरी ४ पारकिंड ५ रसुल्या ६ बैजे ७ चक्रावळी ८ जहरबाद व ९ भेंड्या इतक्यांवर हें औषध चालतें. आतां औषधाचा जिन्नस बितपशील:—

००१ आंबेहळद	००१ गजग्याचें बीज	००।, सैंधवलोण
०००१ मिरें	००१ गूळ जुना	००। पिंपळी.
०००१ सुंठ	००। कोष्ट	००।. पिंपळमूळ.

॥१ ओंवा	॥ कोळंजन	॥, कुटकी
॥१ लसूण	॥ पाषाणभेद	॥॥९ ह्मशागुग्गुळ
॥१ वेखंड	॥ पापवेल	॥ संगपलिता
॥१ काराळे	॥ संगजिरें	६ अफू वजन तोळे,
॥१ वावडिंग	॥, गंधबीड	

भेंडा या रोगास मात्र म्हशागुग्गुळ ७ तोळे घालावा. एकंदर कुटून बेचाळीस गोळ्या बांधून प्रातःकाळीं १ व सायंकाळीं १ एक देत जावी. दाणा चारा घालावा. आरोग्य होईल.

घोडा बेमार झाला असतां त्याचा बंदोबस्त ठेवणें त्याबद्दल.

दाणा चांगला, थोडा थोडा द्यावा, जबरदस्ती करूं नये, खाण्यास गाजर व शिजलेला भुसा, लिनसीड (आळशी, जवस) सातू, लिनशीड (जवसाचा) चहा, ल्सर्न ग्रास (विलायती गवत), कांजी, मका, गव्हाचा भुसा, हरभऱ्याचें सत्व.

गाजरापासून रक्त साफ होतें, लववी होईल, तीन पौंड पासून ४ पौंडपर्यंत गाजरें खाण्यास दिलीं असतां शिरांतील रक्त साफ होईल.

आळसी, खाण्यास दिल्यानें शरीरांतील पडद्यावर नरमाई व तयारी येते, व शिस्न साफ रहातें. भुसा दोन प्रकारचा आहे; एक चमकदार असतो आणि दुसऱ्याला डायजेस्टिंग ह्मणतात. हा लवकर पचन होतो.

विलायती गवत हें तापावर दिलें असतां ताप जातो. भुसा शिजविण्याची रीत. ऊन पाणी घेऊन त्यांत भुसा टाकावा आणि झांकण ठेवून त्यास वाफ आणावी, व तो थंड झाल्यावर घोड्यास खाण्यास द्यावा.

ओट या जिनसाचें पीठ थंड पाण्यांत मिळवून नंतर ऊन पाणी घालून चहा करून द्यावा.

गवती चहा.—बारीक तुकडे करून कढत पाण्यामध्यें टाकावे,

आणि झांकण ठेवून त्यास वाफ आणावी, व गरम असतांनाच घो-ड्यास पिण्यास द्यावा. जवसाचा चहाही असाच करावा.

दवा देण्यास कांहींच जिन्नस मिळत नाहीं तेव्हां--व्हिनिगर (शिरका) द्यावा ह्मणजे तो त्वचेवर सुरकाई आणितो, व यापासून घामही निघतो. दोन पैंड देऊन घोड्यास झूल बांधावी ह्मणजे घोड्यास घाम येईल.

मीठ दिल्यानें रक्त साफ होतें, कोणत्याही प्रकारचे खाण्याचे पदार्थांत तीन औंसपर्यंत द्यावें.

मिरें दिल्यानें अन्न पचन करितें, व इजाही दूर होते.

इंग्रजी औषधें, तीं कोणचे रोगांवर व कशीं द्यावींत याविषयीं.

एक्सट्र्याक्ट.—झाडपाल्याचा अर्क काढलेला असतो, त्याचा पुनः अर्क काढणें त्यास ह्मणतात.

टिंकचर.—अर्धी दारू व अर्धे पाणी घेऊन त्यांत औषध मिळविणें त्यास ह्मणतात.

आलोज.—जुलाबाचे उपयोगी आहे.

जनशन.—कोठ्यांतील पडद्यावर जोर आणितें; काळजांत किंवा दुसरे कोठें सूज असेल तर एक ड्राम अफू द्यावी, परंतु हवेचे नळींत सूज असेल तर देऊ नये.

हायड्रोजन.—ही हवा आहे, काळजांत रहाते, आकसिजन हें फार जलाल आहे, हें एकटी हवा जाळून टाकील; यास्तव एक हिस्सा आकसिझन व तीन हिस्से नायट्रोजन असावे.

क्यार्बोनेट आफ आमोनिया.–कंजंगशनयाजवर एक ड्राम नायट्रिक ईथर एक औंस पाण्यांत मिळवून दिलें असतां रक्त पातळ होतें.

स्पिरिट ऑफ नायट्रिक ईथर.—नायट्रिक इथर आणि सलफ्यूरिक आसिड या दोन्हींचे बरोबर गुण आहेत. हें पुष्कळ औषधाचे कामीं उपयोगीं पडतें.

नायट्रिक ईथर.—दारू आणि आक्सिझन मिळविल्यानें हें होतें. सल्फ्युरिक आसिड, दारू, अलकोहल; यांजवर वातल्यानें होतें. तापावर किंवा कंजंकशनवर एक औंसपर्यंत देतात. व बाहेर लाविल्यानें थंडावा आणि गरम सुजेवर लाविलें असतां आंतली गरमी बाहेर आणितें. घोड्यास रक्ताचे जुलाब होत असतील तर सलफ्यूरिक, ईथर, अथवा नायट्रिक ईथर, लायकर आमोनिया, ऑसटेट्स १ औंस; कापूर २ ड्राम, मिळवून द्यावें.

ओपियम.—(अफू) याचे दोन प्रकार आहेत. एक मिनकार्टिक आसिड व दुसरा मार्फीया; पहिल्याचा गुण शरीरांत ताकत (जोर) आणिते व दुसऱ्याचा गुण निद्रा येते. अफूपासोन टिंकचर ओपियम करितां येतें. त्यांत एक ड्राम अफू असते, टिंकचर ओपियम देण्याचा प्रकार एक औंस द्यावें व अफू देणें आहे तर एक ड्राम द्यावी.

चिराईत.— अर्ध्या औंसापासून एक औंस भुकणी करून द्यावी. ह्मणजे कुइनेलच्या अंगीं जो गुण आहे तो करील. हें तापावर उपयोगी आहे. हें सिंकोना झाडाचे सालीपासोन काढितात.

क्विनेन–हें शिकोना झाडांचें सालीपासूनकाढितात,हें तापावर देतात

सिल्यासिक आसिड—हें वेळूचे झाडांपासून काढितात, हें बहुतकरून आमवायूवर (सांधे दुखतात त्याजवर) देतात. सिल्यासिड आसिटिक आसिड, सिल्यासिड एक ड्राम, सुंठ दोन ड्राम, आळशी (जवसाचा भर्डा किंवा पीठ), व गूळ मिळवून गोळी करून द्यावी ह्मणजे बाहेर सांध्यावर जी सूज असते त्यांत गरमाई येईल.

डायल्युटसलफ्यूरिक आसिड—हा गंधकाचा अर्क आहे. हा पाण्यांत मिसळतो. हें माणसाचे किंवा घोड्याचे अंगावर पडलें तर पाण्यानें धुऊं नये, हें जर पोटांत गेलें तर अन्न पचन करितें (सुखावतें) व रक्त बंद करितें, बाहेर लाविलें असतां त्यापासून जळतें.

घोड्यास मूत्रद्वारें जर रक्त पडत असेल तर सलफरिक आसिड एक ड्राम, टिंकचर ओपियम अर्धा औंस, व पाणी एक बाटली. हें सर्व मिळवून द्यावें. खरजेवर, सलफारिक आसिड चार ड्राम व एक पिंट-पाणी मिळवून लावावें.

आरनिका—हें पहाडांतील झाडापासून होतें; यापासून टिंकचरही होतें. चमक-याजवर दोन औंस आरनिका,व टिंकचर आरनिका चार औंस हीं मिळवून जेथें चमक भरली असेल तेथें लावावें.

हाइड्रोक्लोरिड आसिड, म्युऱ्याटिक आसिड किंवा **स्पिरिट आफ साल्ट**—हें सलफारिक आसिड मिठावर घातल्यानें तयार होतें. हें पौष्टिक आहे, खाण्यास एक ड्रामपर्यंत देतात.

आईल आफ तरपैनटाईन—हें देवदाराच्या झाडांचे चिकांतून तेल काढितात. हें मूत्र होण्यास एक औंसपर्यंत देतात. हें अंगाला लागलें तर वरचें कातडें जळतें, तेव्हां कारबानेक सोडा ऊन पाण्यांत मिळवून लावावा ह्मणजे बरें होईल.यापासून जखमेस पूवगैरे होऊनतो बाहेर पडून सर्व निचर होतो. एक औंस तरपैनताईल, व तीन औंस चरबी मिळवून लावावें, पोटदुखीवर दोन औंस तरपैनताईल, ओपियम व पाणी यांत मिळवून द्यावें.

नायट्रिकसिलव्हरकॉष्टिक—हें, चांदीवर नायट्रिकआसिड घातल्यापासून तयार होतें. गुडघ्यावर पांढरे केंस असतील तर हें लाविल्यानें काळे केंस होतील; व मुरदाड मांसावर लाविल्यास तें जाळून टाकील.

कारबॉलिक आसिड—हें डामरापासून काढितात. जहरबंद तापावर २० पासून ३० तीस ग्रेनपर्यंत देतात. बाहेर लावण्याचें आहे तर एक हिस्सा पाणी किंवा तेलाच्या बरोबर मिळवून लावितात.

मेगडूगल्स डिसईन्फेक्टंट पावडर—हें वाईट जखमेवर टाकितात.

मरक्यूरी— हेंनःसुरावर भुकणी करून घातली तर भरून येईल.

क्लोराईड आफ मरक्यूरी अथवा क्यालोमेल—हें, फिक्के रंगाची लीद होते तेव्हां आर्धा ड्रामपासून एक ड्रामपर्यंत द्यावें.

सालिव्हेशन—(तोंड आणण्याला)-क्यालोमेल द्यावें; खरजेचा रोग बहुत दिवसांचा असेल तर तोंड आणण्यापासून फायदा होईल.

बेनाडाईड आफ मरक्यूरी—(एक हिस्सा पारा, दोन हिस्से आयोडाईन; यापासून होतें). एक औंस चरबी, एक स्क्रपल बेनाडाईड आफ मरक्यूरी, याचें प्लस्तर करून गरम जागेवर मारावें.

मरक्युरीयल आइंटमेंट–(पाऱ्याचा मलम)–हें पारा व चरबी मिळून तयार होतें. हें खरूज वगैरे त्वग्रोगावर चालतें.

सलफेट आफ कॉपर—हें तीन औंस, आलम तीन औंस, पाणी तीन औंस, व सलफ्यूरिक आसिड तीन औंस, मिळवून जखमेवर लाविलें असतां रक्त बंद होईल.

झिंक—क्यार्बोनेट आफ झिंक (जस्ताचे दाणे) क्यॉर्बालिक आसिड आणि झिंक यापासून होतें. क्यार्बोनेट आफ झिंक व चर्बी मिळवून थोडी फटकी घालावी आणि तें मलम सुंभ तडकतें त्यावर लावावें.

सलफेट आफ झिंक—याचा गुण सुकवण्याचा आहे. फार दिवसांची सूज असल्यास त्याजवर पाण्यांत भिजवून ब्यांडिस करून बांधावें; हें रात्रीस बांधू नये.

क्लोराईड आफ झिंक—(शिरका आणि जस्त यापासून होतें.) हें पायावर एक दिवसाची सूज आली असल्यास लावावें.

आंटिमनी—(सुरमा) यापासून उलटी होते. परंतु घोड्यास होत नाहीं. यापासून नाडी बराबर चालते, व कृमीचा नाश करिते. गाई, बैल यांजला याचें प्लस्तर लवकर उठतें. एक ड्राम आंटिमनी, व एक औंस चर्बी मिळून मलम करावें.

बटर आफ आंटिमनी—हें क्लोराईड आणि आंटिमनी या

पासून होतें. पायाच्या पुतळीवर मास येतें, व सुंभ तडतें त्याजवर लाविलें असतां बरें होतें.

इनसासेड—यापासोन विषारी पदार्थाचा नाश होतो. घोडा दाणा खात नाहीं, तोंडास चिकटा येतो, व आंबट घाण येते तेव्हां क्यॉर्बानेट आफसोडा १ औंस, नायटर २ ड्राम, क्यॉर्बानेट आफ आमोनिया अर्धा ड्राम, व पाणी एक पिंट मिळवून द्यावें.

सलफेट आफ सोडा—या पासोन जुलाब होतात. हें १ पौंड पासून १॥ पौंडापर्यंत देतात.

क्लोरेड आफ सोडियम—हें खाण्याचें मीठ आहे. ज्या घोड्याचें तोंड गरम होतें, खाणें अंगीं लागत नाहीं, कातडी वाळतें तेव्हां घोड्याचा दाणा बदलून त्यांत हें मीठ घालून द्यावें.

पोट्याशीयम-हा खार आहे. यापासोन रक्त साफ होते, १ ड्राम पासोन २ ड्रामपावेतों द्यावें, जहरबंद तापावर देतात.

नायटर (सोरा)—याला सॉल्टपिटर ही ह्मणतात. २ ड्राम पासोन ४ ड्राम पावेतों देतात. याचा गुण लघवी होते. घाम येतो, व तापाचा नाश होतो, असा गुण आहे.

आयोडियन—याचें मलम करितात, हें मलम लाविलें असतां कांहीं मास वाढलें असेल तें कमी होतें. छातींत किंवा पोटांतले असल्यास १ पासोन २ ड्रामपर्यंत देतात.

क्यालमेल (रसकापूर)—काळजावर जोर करितें. जुलाब देणें ते १ ड्राम क्यालमेल. २ दोन ड्राम आलोज, २ जिंजर, व सुंठ दोन ड्राम या सर्व जिनसा मिळवून गोळी करून द्यावी ह्मणजे शरीरांतील सर्व खराब वस्तु मलद्वारें निघून जाईल. घोड्याची ताकद पाहून जुलाब द्यावा. काळजांत कांहीं हरकत असेल तर क्यालमेलचे ऐवजीं जनशन द्यावें.

लिकर आमोनिया—आमोनिया जनावराचे नासके वस्तूपासून

काढितात त्यांत पाणी मिळविलें ह्मणजे लिकर आमोनिया होते. काळजांतील सुजेवर याचें ह्लस्तर लावण्याचे उपयोगीं आहे तेणेंकरून आंतील पाणी बाहेर येतें.

स्पिरिट आमोनिया—हें, कांहीं झाडांचे बीजांत अमोनिया मिळविला असतां त्याजला स्पिरिट आमोनिया ह्मणतात; यांत क्यार्बानेट ग्यास असतो.

डेफ्युजष्टीम्युलेट—हें सर्व शरीरांत गरमी आणितें, यापासोन रक्त पातळ होतें. १ औंसपर्यंत देतात. टिपर्णांत दिले असतां हवा निघून जाते.

आयोडाईड आफ पोव्याश—वीसपासोन तीस ग्रेनपर्यंत देतात. जबड्याचे खालचे गोळे सुजले तर आयोडाईनचें मलक करून लावावें. परंतु प्रथम तीन दिवस आयोडाईन नंतर तीन दिवस चर्बी लाविल्यापासोन बरें होतें. याचा गुण जी कांहीं वस्तु जमली असेल ती पातळ करिते.

एक स्ट्र्याक्ट बेलाडोना—टरपैनटाईल १ औंस, टिंकचर ओपियम १ औंस, सोपलिन्यामेंट१ औंस, व टिंकचर क्यापसिका १ ड्राम. मिळवून सांधे जखडतात त्यांवर लाविल्यानें बरें होईल.

डिसेंटरि—आंव आणि रक्त यांचे जुलाब होतात, तेव्हां ओपियम पावडर ॥ ड्राम, क्यांफर २ ड्राम, सलफ्यूरिकईथर १ औंस, व लिनसिड १ औंस, यांचे चहांत मिळवून द्यावें.

टिंकचर आकोनाईट—हें जास्ती दिल्यास जहर आहे. थोडें दिलें असतां गुणाकारी आहे. हें पोटदुखीवर देतात.

क्लोराईड आफ लाईम—ही घाण मारणारी वस्तू आहे. फार दिवसाचा पोटांत वायू धरीत असेल तर २ पासोन ४ ड्रामपर्यंत द्यावें. खरजेवर १ ग्यालन पाणी, १ पौंड क्लोराईड आफ लाईम मिळवून द्यावें.

क्लोरोफॉर्म—यापासून गुंगी येते व बेशुद्ध होतो. कोणतीही जखम कापण्याची असेल तर क्लोरोफॉर्म हुंगण्यास देऊन कापितात.

क्यांफर--(कापूर) लारळ झाडापासोन निघतो. १ पासोन २ ड्रामपर्यंत देतात. खोकल्यावर १ ड्राम क्यांफर १ ड्राम अफू, मिळवून द्यावी किंवा १ ड्राम बेलाडोना, मिळवून द्यावा, कापराची भुकी करणें तेव्हां एक बुंद दारूचा त्यावर सोडला ह्मणजे होती.

जेनशन--हें एका झाडाची मुळी आहे, व पौष्टिक आहे. यापासोन टिंक्चर, एक्स्ट्राक्ट, व पौडर हे तीन जिन्नस होतात. भुकी दोन ड्राम एक्स्ट्राक्ट अर्धा ड्राम, टिंकचर १ औंसपर्यंत देतात. हें कोठा कमजोर होतो, खाणें पचत नाहीं तेव्हां देतात.

क्यानपेपर.--(लाल लहान मिरची) ही पौष्टिक आहे. जेव्हां भूक लागत नाहीं तेव्हां क्यानपेपर ३ ड्राम,व आरसेणी ३ ग्रेन मिळवून सकाळ संध्याकाळ दोन वेळ दाण्यांत द्यावी.

सल्फर (**गंधक**)—मासीनें किंवा दुसरे जनावरानें जखम केली तर त्यावर गंधकाची भुकी टाकावी; तापावर १॥ ड्राम सकाळसंध्याकाळ द्यावी, जुलाबावर दिली असतां बंद होतात.

डेजिटेलीस—हवेचे नळींत सूज आली असतां २० पासून ४० ग्रेनपर्यंत देतात.

सलफेट आफ म्यागनेसिया—काळजांत कांहीं हरकत होऊन ताप आला असतां ८ औंसपर्यंत तीन वेळ देणें; जुलाब होऊं लागले तर बंद होतील.

इंडियनहेम—(भांग)—अर्ध्या ड्रामापासून एक ड्रामपर्यंत देतात. यापासून दर्द कमी होतो.

नाडीपरीक्षा.

घोड्याची प्रकृति साधारण प्रकारची चांगली असली ह्मणजे एका मिनिटांत ३९ पासून ४९ ठोके पडतात. ताप किंवा सूज आली असतां, ८० पासून ९० ठोके पडतील, केव्हां केव्हां १०० ही ठोके पडतात. नाडीपरीक्षा ही मुख्य आहे, नाडी पहाणें ती घोड्याचे खालचे जबड्याचे कण्यावर पहावी. जेथें त्रिकोणाकृतीचा आकार आहे त्याचे कांहीं अलीकडे पहावें, बोटें ठेवून एका मिनिटांत किती ठोके पडतात हे मोजावे; अशी नाडी पहाण्याची रीत आहे.

इंग्रजी नांवें.	मराठी नांवें.	पोटांत दिल्यानें काय होतें.	बाहेर लावल्यानें काय होतें.	किती देण्याचें तें वजन.
नायट्रिकम्यूऱ्याटिक आसिड	....	....	.... भाजतें.	"
सल्फ्यूरिक आसिड....	गंधकाचा अर्क.	खाल्लेली वस्तु पचन करतें.	भाजतें.	१ पासून २ ड्राम.
आलोज	काळाबोळ.	जुलाब होणारें.	जखेमवर लावण्यास.	४ पासून ६ ड्राम
आलम	फटकी.	शोषण करितें.	शोषण करतें.	२ पासून ४ ड्राम.
आमोनिया	नवसागर.	उष्ण आहे.	उष्ण आहे.	१ —— २ —
अंटिमनी सल्फेट........	....	आंतले आंत काम करतें	....	२ —— ४ —
अंटिमनी टारटरिज	उलटीचें औषध.	घाम आणितें.	गरम.	१ —— २ —
आकोनाईट पावडर	बचनागाची भुकी.	रक्ताला हलके फिरवितें.	....	२० पासून ३० ग्रेन.
टिंकचर आकोनाईट	बचनागाचा अर्क.	इजा दूर करतें.	....	०॥० ड्राम.
टिंकचर आरनिका	बचनागाचा अर्क.	घाम आणणें व रक्ताला हलके फिरवणें.	....	....
असाफोटिडा..........	हिंग.	रक्ताला हलके फिरवितें.	....	२ पासून ३ ड्राम.
बेलाडोना	....	शिरांस जोर आणितें.	रक्तालाहलकेफिरवितें.	॥० पासून १ ड्राम.

क्यालोमेल	रसकापूर.	रक्ताळा हलके फिरविते.	....	१ पासून २ ड्राम.
क्लोराईड आफ मरक्यूरी.	पाऱ्याचा खार.	जुलाब होणें.	....	....
क्यांफर..............	कापूर.	नाडीला बरोबर आणितें.	गांठ असली तर दूर होते	१ पासून २ ड्राम.
क्यांथाडिस............	विषारी माशी.	गरमी येते व लघवी होते.	....	६ पासून ८ ग्रेन.
क्याल्याच्यू........	कात.	सुखवितें.	जखम भरून येते.	१ पासून २ ड्राम.
चॉक..................	खडू.	विष दूर करतें.	जखम ओढून आणितें.	२ पासून ४ औंस.
सब असिटेट आफ कॉपर.	जंगला.	पाचक.	वाण दूर करितें.	१ पासून २ ग्रेन.
सलफेट आफ कॉपर....	मोरचूद.	पचन करतें	जाळतें.	२ पासून ४ ड्राम.
करोसिव्ह सब्लिमेंट....	पाऱ्याचें फूल.	रक्त साफ करतें.	जाळतें.	६ पासून १० ग्रेन.
क्रोटन सीड..........	जपाळाचें बीं.	जुलाब होतो.	....	१० पासून २४ ग्रेन.
" आइल..............	जपाळाचें तेल.	....	....	२० पासून ३० ग्रेन.
डेजीटेलिस............	....	गुंगी आणितें व जुलाब होतो.	....	॥० पासून १ ड्राम..
नायट्रिक ईथर........	....	जुलाब होणारें व घाम आणणारें व इजा दूर क०	....	१ पासून २ औंस
सलफ्यूरिक ईथर........	....	गरमी व गुंगी आणितें व इजा दूर करतें.	....	१ —— ३ औंस.

इंग्रेजी नांवें.	मराठी नांवें.	पोटांत दिल्यानें काय होतें.	बाहेर लावल्यानें. काय होतें.	किती देण्याचें तें वजन.
जेनशन........	तेजियाना (अरबी नांव.)	पाचक.	....	२ —— ४ ड्राम.
जिंजर....	सुंठ.	पाचक.	....	२ —— ४ ड्राम.
गंमआऱ्याबिक	गोंद.	लेप चढवतो.	....	....
आयोडाईन.........	....	....	बाहेर लावल्यानें मास	९ पासून १० ग्रेन.
बिनाडाईड आफ मरक्यूरी	....	....	ब्लिस्टर. वाढलें असेल तें कमी होतें.	....
आयोडाईड आफ पा ट्याश....	....	पाचक.	सुखवतें	२० पासून ३० ग्रेन.
सलफेट आफ आयर्न..	हिराकस.	पाचक व शोषक.	....	२ पासून ४ ड्राम.
असिटेट आफ लेड......	....	नाडी बराबर आणणें व शोषक.	....	३० पासून ६० ग्रेन.
लिनसीड...............	आळशी.	लेप चढवणें.	पेटीस (पिवकतें).	....
नायटेट्र आफ सिलव्हर.	काडीखार.	....	जाळतें (भाजतें).	....
ओपियम	अफू.	शिरांला जोर आणतें व इजा दूर करतें.	....	१ पासून २ ड्राम.

टिंकचर ओपियम........	अफूचा अंक.	शिरांला जोर आणितें व इजा दूर करतें.	....	१ —– २ द्राम.
क्यारबोनेट आफ पोट्याश.	जवखार.	जुलाब होणे व विष दूर करणें.	....	२ —– ४ द्राम.
नायट्रेट आफ पोट्याश.	सोरा.	ताप जोर करणें व लघवी करणें.	....	२ पासून ६ द्राम.
रोझिन..................	राळ.	लघवी आणणें.	....	४ —– ८ द्राम.
सोप......................	साबण.	लघवी आणणें व विष दूर करणें.	गरमी आणणें.	॥० पासून २ औंस.
स्ट्रिकनिया.............	कुचल्याचा मगज.	शिरांला जोर आणितें.	....	१ पासून ३ ग्रेन.
सलफर.................	गंधक.	रक्ताला हालके फिरवणें व जुलाब होणें.	....	१॥ द्राम.
टरपेंटाईन.............	देवद्वाराचें तेल.	लघवी व मळ होणें व इजा दूर करणें.	जुस्तर मारणें.	२ पासून ४ द्राम.
क्यारबॉनेट आफ झिंक.	,,	,,	सुखवणें.	....
क्लोराईड आफ झिंक....	,,	,,	भाजतें.	....
सलफेट आफ झिंक....	जस्तखार.	पाचक व शोषक.	सुखवणें.	१ पासून २ द्राम.

औषधांचीं नांवें.	औषधांचीं लक्षणें.	औषधें कोणकोणतीं.
पोटांतदेण्याचींऔषधें.		
ऑल्टरेटिव्ह …………	आंतलेआंत कामकरणारें औषध.	आलोज (एलवा), क्यालोमेल (रसकापूर), आंटिमनी (सुर्मा), सलफर (गंधक).
क्यांथार्टिक …………	जुलाब होणारें औषध.	आलोज (एलवा), क्रोटन (जमालगोटा), क्यालोमेल (रसकापूर), लिनसीड आईल (आळसीचें तेल), क्याशेस.
ऑंटिस्पयाझमॉडिक …..	इजा दूर करणारें औषध.	आलकोहल (उंचीदारू), सलफ्यूरिकआसिड (गंधकाचाअर्क) नायट्रिकईथर, टरपेंटाईन (देवद्वाराचें तेल), ओपियम (अफू).
आस्ट्रिजंट …………	सुकविणारें औषध.	आलम (फटकी) क्याल्याच्यू (कात).
डेम्यूलसंट …………	नरमाई आणणारें औषध.	गमआऱ्याबिक (बाभळीचा डीक) लिनसीड (आळसी).
डायोरेटिक्स …………	लघवी आणणारें औषध.	नायटर (सोरा), रेझिन (राळ), टरपेंटाईन (देवद्वाराचेंतेल).
डायफोरेटिक्स …………	घाम आणणारें औषध.	सोप (सावण), इमेटिक (उलटी करणारें औषध), नायट्रिकईथर.
फेब्रिफ्यूज …………	ज्वर नाहींसा करणारें औषध.	नायटर (सोरा), क्यांफर (कापूर), टारटारइमेटिक (उलटीचें औषध), क्यालोमेल (रसकापूर), स्वीट स्पिरिट आफ नायटर (सोऱ्याचा अर्क).

…लस्टिम्यूलेंट्स	उष्णता आणणारें औ०	आयोडाईन, क्यालोमेल (रसकापूर).
…ाईन्स	इजा कमी करणारें औ०	भांग.
…म	बेशुद्ध करणारें औषध.	क्यांफर (कापूर), ओपियम (अफू) बेलाडोना.
....	नाडी बरोबर चालविणारें औषध.	टारटरइमेटिक (उलटी आणणारें औंषध) बेलाडोना, आकोनाईट (बचनाग), डेजिटेलीस (रानहावरी).
.....	उष्णता आणणारें औषध.	अल्कोहल (उंचदारू), आमोनिया (नवसागर), सलफ्यूरिकईथर.
टानिक..................	खाल्लेलें अन्न जिरविणारें औषध.	जेनशन, काडेचिराईत, कुटकी, चिराईत, सलफेट आफ आयर्न, (हिराकस), सलफेट आफ कॉपर (मोरचूद).
ऑनत्यासिडस	विष नाहींसें करणारें औषध.	क्यॉर्बानेट आफ पोट्याश (जवखार),क्यॉर्बानेट आफ सोडा (पापडखार), क्यॉर्बानेट आफ लाईम (खडू).
बाहेर लावण्याचीं औ०		
ऑनटिसेपटीक्स	दुर्गंधी नाहींसें करणारें औषध.	चारकोल (कोळसा), क्लोराईड आफ झिंक, नायटर (सोरा), क्लोराईड आफ लाईम (तांबडी चुन्याची पूड), क्यॉर्बालिकआसिड.
आस्ट्रिंजंट्स	सुकवणारें औषध.	आलम (फटकी), क्यात्याच्यू (कात).
ब्लिस्टर्स	प्लस्तर.	क्यांथार्डिस (माशी), बेनाडाईड आफ मरक्यूरी, लिकर आमोनिया (आमोनिया), मस्टार्ड (राई).

औषधांचीं नांवें.	औषधांचीं लक्षणें.	औषधें कोणकोणतीं.
कॉस्टिक...............		म्यूरिआटिक आसिड,नायटर आणि सलफ्यूरिक आसिड (गंधकाचाअर्क), सलफेट आफ कॉपर (मोरचूद), क्लोराईड ऑफ झिंक, करोसिव्हसब्लिमेंट, नायट्रेट आफ सिलव्हर(काडीखार).
डिसक्यूयेनट्स..........	गांठ बसविणारें औषध.	साल आमोनिया (नवसागर), क्यांफर (कापूर), आयोडाईन, सोपलिन्यामेंट (साबणाचा मलम).
डिसईनफेक्ट्स	दुर्गंधी नाहींसें करणारें औषध.	क्लोराईड आफ लाईम (लाल चुन्याची पूड), क्यॉर्बालिक आसिड.
इमॉलियंट्स	नरमाई आणणारें औ०	फोमेनटेशनस (शेकणें), पोलटीस (पिकविणारें पोटीस). स्वीट आईल (गोडेंतेल).
रिफ्रिजंट्स	थंड पडणारें औषध.	नायटर (सोरा), शूगर आफ लेड, कोल्डवाटर (थंडपाणी).
रुबिफिसियंट्स	रक्त आणणारें औषध.	ब्लिस्टर (छस्तर), लिन्यामेंट आफ आमोनिया, टरपेंटाईन (देवद्वाराचें तेल).
डिटर्येजंट्स	जखमा साफ करणारें औ०	व्हरडिग्रीज (कलंक), सलफेट आफ कॉपर (जंगला).

आणि आएन्टमेंट आफ टर्पेनटाईन (देवद्वाराच्या तेलाचें

(...), सोल्यूशन आफ सलफे-